१९३६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ८
REFBK-0001267

# महाराष्ट्र-कवि-चरित्र

## भाग ४ था.

लेखक व प्रकाशक

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, संपादक 'ज्ञानांजन'

व भरतपुरचा वेढा, नेपाळवर्णन, सं. प्रणयानंद

नाटक, इसापनीति इ. पुस्तकांचा कर्ता

('ज्ञानांजन' ऑफिस, भांगवाडी, मुंबई नं. २)

REFBK-0001267

———o———

हें पुस्तक गजानन भास्कर वैद्य, बी.ए.

ठाकुरद्वार, मुंब

# अर्पणपत्र

श्रीमंत राजश्री माधवराव मोरेश्वर

ऊर्फ

बाळासाहेब पंत अमात्य हुकुमत पन्हा

संस्थान गगनबावडा

यांस

हा ग्रंथ अत्यंत कृतज्ञतापूर्वक समर्पण करितों.

श्रीमंतांचा नम्र सेवक,

ग्रंथकर्ता.



# दोन शब्द.

महाराष्ट्र कविचरित्राच्या प्रस्तुत भागांत समाविष्ट झालेलीं चरित्रें उपलब्ध जुन्या माहितीच्या आधारानें लिहिलीं आहेत. कै. तात्याबुवा चोपडेकर वैद्य, उमरावती; भगवद्भक्त रा. महादेव रामकृष्ण देशपांडे, सालोडहिरापूर व रा. सा. गोविंद सखाराम सरदेशाई बी. ए. बडोदें ह्या सद्गृहस्थांची प्रस्तुत भाग लिहिण्याचे कामीं पुष्कळच मदत झाली, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

पहिल्या तीन भागांप्रमाणेंच ह्या चौथ्या भागासही गगनबावडा संस्थानचे सुविद्य व सहृदय अधिपति **श्रीमंत माधवराव मोरेश्वर ऊर्फ बाळासाहेब पंत अमात्य** यांनीं द्रव्यरूपानें उत्तेजन दिलें, त्याबद्दल मी श्रीमंतांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील.

मुंबई.
१८–४–१६.

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.



वरील श्लोकांत वर्णिलेला 'विख्यात राजा कोकाट्या यशवंतराव' ह्याचें नांव इतिहासांत कोठें आढळत नाहीं; यावरून शिवाजीच्या जन्मकालीं जे कित्येक मराठे सरदार मोंगलांच्या आश्रयानें उदयास आले होते त्यांपैकीं हा यशवंतराव कोकाट्या एक असावा व तो नागेश कवीचा आश्रयदाता असल्यामुळें त्यानें त्यास 'विख्यात राजा' ही पदवी कृतज्ञतापूर्वक अर्पण केली असावी असें वाटतें. या कोकाट्या यशवंतरावाचें नांव एरवीं जें अगदीं अप्रसिद्ध राहिलें असतें, तें नागेशकवीनें त्याचा उल्लेख केल्यामुळें, महाराष्ट्र वाङ्मयांत कायमचें राहून गेलें. हा सत्संगाचा परिणाम होय.

हा कवि आपल्या काव्यांत नागेश, नागदेव, नागजोशी, नागेश्वर इत्यादि शब्दांनीं आपल्या नांवाचा उल्लेख करितो. अहमदनगराजवळ भिंगार नामक गांव आहे, तें या कवीचें वास्तव्यस्थान होय. तेथें याचे वंशज अद्याप आहेत. गांवाच्या अगदीं शेवटास याचें रहातें घर आहे व गांवाशेजारींच एक लहानसा ओढा आहे, त्याचे कांठीं या घराण्यांतील पुरुषांच्या समाधि आहेत. यातील कोणती समाध कोणत्या पुरुषाची हें कोणासही सांगतां येत नाहीं किंवा आपल्या गांवांत कोणी कवि होऊन गेला याबद्दल गंधवार्ताही नागजोशांच्या वंशजांस किंवा भिंगारकरांस नाहीं. हल्लीं (इ. स. १९०४) कवीच्या घरीं त्रिवेणीबाई या नांवाची सुमारें ऐशीं वर्षांची वृद्ध बाई आहे. तिला वार्धक्यामुळें असावी तशी स्मरणशक्ति नाहीं, परंतु पूर्वजांचीं नावें सांगतांना '**कों**डजोशी, **ना**गजोशी, **मोर**जोशी, **नर**सिंह जोशी वगैरे नांवें व त्यांच्यासंबंधाची कांहीं अव्यवस्थित माहिती आणि 'अमावास्येच्या दिवशीं चंद्र दाखविला.' इत्यादि ठराविक आख्यायिका ही बाई सांगते. तिच्या दोन्ही मुलांस इतकीही माहिती सांगतां येत नाहीं.

नागजोशांच्या तीर्थरूपांचें नांव मोरजोशी व आईचें नांव जानकी. मोरजोशांस तीन मुलगे होते. मल्हारी, त्र्यंबक व नागेश. या कुटुंबाची वृत्ति ग्रामजोशाची व ग्रामलेखकाची होती. गांवचें जोशीपण अजूनही यांच्या वंशांत आहे. ह्यांचें आडनांव मुळे, हे वत्सगोत्री माध्यंदिन शाखेचे यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण. त्रिभांडेश्वर हें यांचें आराध्य दैवत होय. एका काळीं, हें घराणें विद्वत्तेसंबंधानें फार प्रसिद्ध असावें असें दिसतें. मोरजोशी हे चांगले ज्योतिषी असून ते स्वतः पंचांग वर्तवीत असत. कोकाटया यशवंतरावाचा ह्या घराण्यास आश्रय होता. मोरजोशांसही काव्यरचनेचा थोडासा नाद होता, असें त्यांच्या घरच्या कागदपत्रांवरून दिसतें.

नागेश कवीनें (१) चंद्रावळीवर्णन, श्लोक ३२२, (२) सीतास्वयंवर श्लोक, ४१९. (३) रुक्मिणीस्वयंवर आणि (४) रसमंजरी हे चार ग्रंथ लिहिल्याची माहिती मिळते. ह्यांपैकीं चंद्रावळीवर्णन काव्यसंग्रहांत व सीतास्वयंवर महाराष्ट्रकवि मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालें आहे. रुक्मिणीस्वयंवर कै. वा. दा. ओक यांनीं पाहिलें होतें. पण त्याची प्रत अद्याप मिळाली नाहीं. रसमंजरीचीं कांहीं पत्रें महाराष्ट्रकविकर्त्यांनीं पाहिलीं आहेत, पण तें संपूर्ण काव्य अद्याप उपलब्ध झालें नाहीं. त्रिवेणीबाईच्या सांगण्यावरून असें समजतें कीं, त्यांच्या घरांतल्या पुष्कळ पोथ्या कोणी महाबळेश्वरकर शास्त्र्यानें महाबळेश्वरास नेल्या होत्या, त्या तेथून वांईस गेल्या आहेत. यावरून पुढें मागें वांईप्रांतीं या कवीची बरीच कविता सांपडेल, असा संभव दिसतो.

नागेश कवीचा नक्की काल समजला नाहीं, तथापि त्याच्या सीतास्वयंवराची एक प्रत पंढरपुरास मिळाली, तिच्या शेवटीं शके १६१६ हा काल दिला आहे. यावरून हा कवि इसवी सनाच्या सतराव्या

# अनुक्रमणिका.

| चरित्र | पृष्ठ |
|---|---|
| १ नागेश | १ |
| २ विप्र नारायण | २० |
| ३ विठ्ठल चित्रकवि | २८ |
| ४ आत्माराम स्वामी | ६५ |
| ५ सदानंद स्वामी | ८५ |
| ६ भगवंतात्मज | ११२ |
| ७ श्रीरघुपति महाराज | ११९ |
| ८ गणपतराव साधु | १३८ |
| ९ शिवकल्याण | १४७ |



स्थळप्रत

# महाराष्ट्र कविचरित्र भाग ४.

## नागेश कवि.

ह्या कवीसंबंधानें थोडीशी माहिती ‘महाराष्ट्रकवि’ मासिकपुस्तकांत रा. भावे यांनीं दिली आहे. कवीनें आपल्या काव्यांच्या शेवटीं आपला व आपल्या आईबापांचा नामनिर्देश केला आहे, त्यावरून व ह्या कवीच्या एका काव्याच्या प्रतीच्या शेवटीं शके १६१६ हा काल दिला आहे त्यावरून हा कवि वामनपंडितांपूर्वी होऊन गेला व अनेकवृत्तात्मक काव्यरचनेसंबंधानें तो बराच प्रसिद्ध होता, असें वाटतें. चंद्रावळीवर्णन नामक काव्याच्या शेवटीं कवि ह्मणतो:—

पिता मोरजोशी महाख्यात आहे
तथा जानकी नाम मातेसि आहे ।
अहो थोरल्या दोन्हि बंधूंसि साचें
असे नाम मल्हारिचें त्र्यंबकाचें ॥ १ ॥
तया धाकुटा तोच नागेश पाहे । कवित्वीं जया ज्ञान संपूर्ण आहे॥
तयाच्या मुखें ग्रंथ संपूर्ण झाला।जनां वाचितां फार आनंद झाला २
कोकाटच्या यशवंतराव जगतीं विख्यात राजा असे ।
त्याचा पुण्यकृती पुरोहित बरा तो मोरजोशी वसे ॥
तत्पुत्रें लघुकोमलामलपदीं पद्मावळी गुंफिली ।
श्रीनागेश कवीश्वरें सभवरें चंद्रावळी वर्णिली ॥ ३ ॥
गणेशास आधीं नमस्कार केला। तयानंतरें प्रार्थिलें शारदेला।
करा जोडुनी वंदिलें सद्गुरूसी। बरा ग्रंथविस्तार केला त्वरेसी॥४॥

शतकाच्या तृतीय पादांत विद्यमान असावा, असें दिसतें. नागेश कवींचें अध्ययन किती झालें होतें, हें समजण्यास मार्ग नाहीं. पण त्याच्या कवितेवरून संस्कृत भाषेशीं व साहित्यशास्त्राशीं त्याचा बराच परिचय असावा, हें अगदीं स्पष्ट दिसतें. ह्या कवीस ग्रंथसंग्रहाची फार आवड होती; ह्यानें आपल्या हातानें लिहून ठेवलेल्या अनेक पोथ्या याच्या घरीं अद्याप आहेत. ह्या पोथ्यांचीं सुटीं पानें पोत्यांत भरून ठेविलीं आहेत, यामुळें आजमितीस त्यांतून एकही ग्रंथ पुरा निघत नाहीं. या पोत्यांत 'स्वप्नफलां' संबंधानें एक पोथी आहे, ती सचित्र आहे. यावरून नागेश कवीस चित्रकलेचीही थोडी फार माहिती होती असें दिसतें. ह्या कवींचीं काव्यें एका काळीं फार प्रसिद्ध होतीं; 'गणेश बोले बहु आदरानें । नेला असे उंदिर मांजरानें ॥' वगैरे पद्यें अद्यापही महाराष्ट्रांत सर्वत्र ऐकूं येतात.

नागेश कवीच्या अंगीं कवनशक्ति साधारण बऱ्यापैकीं होती, पण चित्रकाव्यरचनेच्या नादीं लागल्यामुळें, तिचा ठसा चांगलासा उठला नाहीं; तरी पण त्याची काव्यरचना साधी असून कित्येक ठिकाणीं ती फार सुरस व बहारीची उतरली आहे. चित्रकाव्याच्या दृष्टीनें पाहिल्यास, याची काव्यरचना विठ्ठल कवीच्या रचनेच्या खालोखाल चांगली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा कवि वामनाच्या पूर्वींचा असून, त्यानें अनेक वृत्तांत यमकमय काव्यरचना केली आहे. यावरून संस्कृत वृत्तें मराठींत पहिल्यानें वामनपंडितांनीं आणलीं, हें निबंधमालाकारांचें विधान चुकीचें आहे, असें स्पष्ट म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाय, प्रसिद्ध कवि 'विठ्ठल' याचा 'रासक्रीडा' नामक एक श्लोकबद्ध ग्रंथ रा० राजवाडे यांस मिळाला आहे; त्या ग्रंथाचा समाप्तिकाल शके १५३६ (इ. स. १६१४) हा आहे. यावरून

वामनापूर्वी चांगलीं पन्नास पाऊणशें वर्षें, अनेकवृत्तात्मक महाराष्ट्र काव्यरचना चालू होती, हें अगदीं स्पष्ट होत आहे. असो. नागेश कवीची यमकरचना पाहिली म्हणजे या कवीस मराठी भाषेचेंही ज्ञान चांगलें होतें, असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. चार चार पांच पांच अक्षरांचीं यमकें तर त्याच्या काव्यांत सर्वत्र आढळतात. मात्र, यामुळें भाषाशुद्धीकडे थोडेंसें दुर्लक्ष होऊन शब्दांची ओढाताण झाली आहे, हें विसरतां कामा नये.

नागेश कवीच्या शिष्यमंडळीपैकीं कित्येकांनीं मराठींत काव्यरचना केली असावी असें दिसतें, पण ही रचना उपलब्ध नाहीं. नागेश कवि हा फक्त 'कवि' होता. तो साधू होता असें मानण्यास त्याच्या काव्यांत तरी निदान कांहीं आधार सांपडत नाहीं. त्याच्या सीतास्वयंवर काव्यांतील कांहीं श्लोक थोडेसे अश्लील आहेत.

प्रस्तुत नागेश कवीशिवाय, आणखी दोन नागेश कवि महाराष्ट्रांत होऊन गेले; त्यांपैकीं एकाची कविता उमरावती येथें एका देवालयांत आहे व दुसऱ्याची तंजावर येथील 'सरस्वतीमहालां'त आहे, असें समजतें.

नागेश कवीच्या काव्यांतले कांहीं उतारे पुढें दिले आहेत. त्यांवरून त्या काव्याचें स्वरूप वाचकांस समजेल. हे उतारे 'चंद्रावळीवर्णन' व 'सीतास्वयंवर' या दोन काव्यांतुन घेतले आहेत.

'चंद्रावळीवर्णनाच्या' आरंभींच कवि म्हणतो:—

### श्लोक.

कर्ता अहंभाव नसेच पाहें ।
हरि स्वसत्ता वदवीत आहे ॥
जें जें हरीच्या रुचिलागिं देतें ।
तें तें स्वयं मद्वचनास येतें ॥ ६ ॥

जें जें हरीनें मज बोलवावें ।
तें तें स्वभावें मग म्यां वदावें ॥
तेथें करी कोण विकल्पवांच्छा ।
वळी असे केवळ ईश्वरेच्छा ॥ ७ ॥

चंद्रावळीस्वरूपवर्णनः—

श्लोक.

असें वदोनी, मग सुंदरीनें
अभ्यंग केला अति आदरानें ॥
पुसोनियां सर्वहि अंगनेला ।
ते नेसली सुंदर लाल शेला ॥ ३० ॥
तोडवंद अति सुंदर भासे ।
त्यावरी अरुण वस्त्र विकासे ॥
आदरें करुनियां मग बाळी ।
लेतसे बहुत सुंदर चोळी ॥ ३१ ॥
घातली सखिजनीं मग वेणी ।
लेइली अति मनोहर लेणीं ॥
काय वर्णन करूं, अति शोभे ।
देखतांच मुनिचें मन लोभे ॥ ३२ ॥
वेणी त्रिवेणीसम भासताहे ।
याकारणें ते त्रिगुणात्म पाहे ॥
आधीं फरा केतकिपत्र साजे ।
त्यानंतरें राखडि ते विराजे ॥ ३३ ॥
गंगावनीं गुंफित फार लेणीं ।
श्रोणीतटीं चुंबित रम्य वेणी ।

भासे जशी श्यामल सर्पिणी ते ।
दंशावया कृष्ण वनासि जाते ॥ ३७ ॥
जडित कनकमाळा मोतियांचीच जाळी ।
तरुणजनमनातें देखतां फार जाळी ॥
तदुपरि कडदोरा शोभतो मध्यदेशीं ।
जर कमर झणाणी नाद तो किंकिणीसी ॥ ५६ ॥
बाहू बहू शोभति बाजुबंदीं ।
त्या तोळबंड्या अति रम्य रुंदी ॥
वांके चुडे कंगणियांसि घाली ।
त्या आंवळ्यांचे सर थोर ल्याली ॥ ४७ ॥
सकंकणें पाटलिया सुवाळे ।
दोरे जवे हातसरा निराळे ॥
कांचेचिया बांगडिया सुरंगा ।
स्थळीं स्थळीं शोभति त्या दुरंगा ॥ ४८ ॥
ल्याली कसी आणिक रम्य भूषा ।
तांबूलशोभा वदनीं विशेषा ॥
करीं धरूनी मुकुरासि लक्षी ।
ते लेतसे अंजन खंजनाक्षी ॥ ५३ ॥
चंद्रावळी मानसमोहना ते ।
मानें गुमानें मथुरेसि जाते ॥
तिच्यापुढें काय करील रंभा ।
जंभारिनारी न करील दंभा ॥ ६९ ॥
भ्रम करी मकरोपरि चंचला ।
मन हरी न हरी अशि कोकिला ॥

रसरसी सरसीरुहलोचनी ।
गजगमा जसि मानसमोहनी ॥ ७१ ॥
स्तनभरें नभ रे उचलीतसे ।
निजघनें जघनें भुलवीतसे ॥
सुवदनावदनासि विलोकितां ।
जनमनीं नमनीं मग शांतता ॥ ७३ ॥
कमळ कोमळ गंध मनोहरी ।
भ्रमर भोंवति गुंजति त्यावरी ॥
चतुर सादर ते अवलोकिली ।
सुरजनीं रजनीशमुखी भली ॥ ७४ ॥
चंद्रावळी चंद्रमुखी सुकेशी ।
देवांगनामाजि जशी सुकेशी ॥
नेत्रें करी भंजन खंजनाचें ।
मोठें मनोरंजन तें जनांचें ॥ ७५ ॥
भ्रमकरें दशधा विधु काचला ।
नखमिसें चरणीं मग वांचला ॥
द्विथलि सोडुनि ते निजशुभ्रता ।
चरणि सेवितसेच सुरक्तता ॥ ७६ ॥
मृदुल उंच नखीं उपमा नसे ।
सकळ माणिकरंग फिका दिसे ॥
सुनख अंगुळियांवरि शोभती ।
उरग पंचफणापरि भासती ॥ ७७ ॥
किंवा गमे पंचशरें जगातें ।
जिंकोनियां ठेवियलें शरातें ॥

कीं पादपद्मींहुनि पंचगंगा ।
निघालिया भासति त्या सुरंगा ॥ ७९ ॥
सरस पाउल–रंग विराजतो ।
तदनु बाळरवी मग लाजतो ॥
पदरुहीं सरसीरुह जिंकिलें ।
ह्मणवुनी कमळीं जळ सेविलें ॥ ८० ॥
सरळ अंगुलि देखत साजते ।
कमळताल चळाचळ कांपते ॥
अरुण पाउल–रंग विलोकिला ।
अरुणही पळतां मग खंजला ॥ ८१ ॥
घोटीं तिचीं वर्तुळ रम्य भारी ।
स्थिरावले कीं पुरुषार्थ चारी ॥
निर्लोम त्या पोटरिया सुरेखा ।
सुवर्णवर्णि कमनीय देखा ॥ ८३ ॥
विमळवर्तुळ जानु विराजल्या ।
कनकदंड तशा उरु चांगल्या ॥
कदळिची उपमा उरुतें नसे ।
बहुत शीतळ ते कदळी वसे ॥ ८४ ॥
किंवा नवी नवरसां उतरावयाची ।
ते कूपिका मज गमे स्मरवैद्यकींची ॥
किंवा गमे मदनमोहनयंत्र आलें ॥
त्याच्या बळें सकळही जग वश्य झालें ॥ ८९ ॥
नितंबबिंब प्रभुच्या भयानें ।
संकीर्ण तो मध्यम देश जाणें ।

महाभयें क्षीण विशेष झाला ।
स्वगौरवालागिं भुलोनि गेला ॥ ९४ ॥
शिशुत्वसंराज्य बुडोनि गेलें ।
मध्यांगदेशांतरिं दैन्य आलें ।
किंवा कुचांनीं परचक्र केलें ।
गुरुत्व मध्येंच लुटोनि नेलें ॥ ९५ ॥

चंद्रावळीस्वरूपवर्णनाचे एकंदर श्लोक १४२ आहेत. नुसतीं दागिन्यांचींच नांवें १०० पेक्षां अधिक आहेत. इतकें विस्तृत स्त्रीसौंदर्यवर्णन मराठींत दुसरें नाहीं. या वर्णनांत शब्दालंकार व अर्थालंकार यांचीं बहुतेक उदाहरणें सांपडतील. 'सीतास्वयंवर' काव्यांत, सीतेच्या वर्णनप्रसंगीं नागेश कवीनें हेच श्लोक उतरून घेतले आहेत; आणि एका अर्थीं तें बरोबरच आहे. कारण, हे श्लोक रचतांना कवीनें बहुतेक सगळे मराठी व संस्कृत वर्णनपर शब्द उपयोगांत आणिले असल्यामुळें, दुसरे श्लोक रचण्यास कवीपाशीं शब्दसामग्रीच शिल्लक असण्याचा संभव नाहीं ! हे १४२ श्लोक वाचकांनीं मूळ काव्यांतून अवश्य वाचावे, अशी शिफारस करितों.

चंद्रावळी व तिच्या सख्या गोरस विकण्यासाठीं मथुरेस जाण्यास निघाल्या, त्या वेळच्या देखाव्याचें वर्णन:—

## श्लोक.

चंद्रावळी चालत मध्यदेशीं ।
सभोंवत्या भोंवति त्या सुकेशी ॥
विंबाधरा त्या चतुरा उदारा ।
त्या देखिल्या होय मना विदारा ॥ ९६ ॥

रुळत चंचल अंचळ भूवरी ।
उसळतो नलयध्वनि अंबरीं ॥
निजगुजें वदती मग सुंदरा ।
दिसतसे बहु धन्य वसुंधरा ॥ ५७ ॥
मदभरें मग गौळणि चालती ।
थरथरां स्तनमंथर हालती ॥
कितिक त्या गजगामिनि डोलती ।
झणझणा कळकिंकिणि वाजती ॥ ५८ ॥
भरलिया दुरड्या शिरिं गोरसें ।
सुख करीत जनां निज गोरसें ॥
पदसरोरुहिं घुंगुरु वाजती ।
श्रवण होउनि लोक नवाजती॥ ५९ ॥
स्तनजघनभरानें सुंदरी नम्र झाल्या ।
श्रम किमपि न वाटे मध्य वाटेसि आल्या ।
अभिनवरसरागें गायनें गाति तानें ।
नव नवल पहातां देव येती विमानें ॥ ६० ॥
सुवदना हरिचें वन पावल्या ।
तरुतळीं क्षण एक विसांवल्या ॥
तरु समग्र विशेष विराजती ।
निजभवें विभवें हरि सेविती ॥ ६१ ॥
अति रसाळ रसाळ विराजती ।
वितत ताल तमालहि साजती ॥
मलयमारुत शीतळ वाजती ।
कलरवीं किणि कोकिल कूजती ॥ ६२ ॥

विससिते कसि ते वरि नीरजें ॥
अति सुगंधित हो अवनी रजें ॥
मनिहुनी यमनेमहि सांडिला ।
मुनिवरीं नवरीं जप मांडिला ॥ ६३ ॥
ललत खेळत त्या ललनासवें ।
मदन तृप्त तया वदनासवें ॥
मुनिजनीं निजनीतिस टाकिलें ।
सुवदना वदनांबुज चिंतिलें ॥ ६४ ॥
हळुहळू मलयानिळ वाजिला ।
मधुकरीं मधुर ध्वनि योजिला ॥
विचरताति वधूंसह सारसें ।
मदन माजत तो सहसा रसें ॥ ६५ ॥
बहुत गर्जति त्या शुकसारिका ।
पतिसवें मिळती आभिसारिका ॥
जळ पहा अमृतास समानसें ।
सुख करी बहुधा रस मानसें ॥ ६६ ॥
फुलभरी ऋतुसा रस माजला ।
तरि भरें बहु सारस माजला ॥
अति सुगंधित येत सदा गती ।
असति तेथ तयासि सदा गती ॥ ६७ ॥

ह्या श्लोकांवरून कवीची वर्णनशैली बरीच उच्च दर्जाची आहे, असें दिसतें. शब्दालंकारांकडे फारसें लक्ष्य न देतां अर्थगौरवाकडे विशेष लक्ष्य दिलें असतें, तर हींच वर्णनें याहून अधिक सुरस उतरलीं असतीं यांत शंका नाहीं, कारण कवीची प्रतिभा बरीच उज्वल आहे.

चंद्रावळीवर्णनाच्या १९६ ते २१३ या श्लोकांत कवीनें श्रीकृष्णाच्या संवगड्यांचीं नांवें दिलीं आहेत, .तीं वाचतांना हंसूं आल्याशिवाय राहत नाहीं. खालील श्लोक पहा:—

दोंदा सदां दोंदिल वाढवीतो ।
हा वांकुडा लांकुडसा रहातो ॥
कुडा कुडें कार्य करीत आहे ।
धोंड्याच धोंडा तरि घालताहे ।
लाख्यास लक्षी वहुसाळ चाळा ।
चांदा सदां चांदणिया निराळा ।
पेंद्यास कांहीं करुणाच नाहीं ॥
धना धना चिंतित सर्व पाहीं ॥

काळा तो कमळा कराल करळा वाळा बुळा आंधळा ।
भोळा नीळ धुमाळ ताल सरळा तोळा तिळा तांदळा ॥
काळा कोकिळ कावळा खुळखुळा धाळा विरोळा तुळा ।
हिंदोळा पिवळा विशाळ बरळा वाचाळ तो पिंगळा ॥
कैसा तो नरसा विसा अणि पिसा दासा वसा लांवसा ।
मासा कापुससा भुसा अणि पिसा पोसा दसा पोरसा ॥
थोटा थोरकटा जळाळ चिकटा गाटा गट्टू थीवटा ।
खोटा हाततुटा करी खटपटा मोठा दुटा धाकटा ॥

गोपिकांचीं नांवें:—

चंद्रावळी आणिक रंगमाळा ।
पद्मावती सोमकळा सुशीळा ॥
तरंगिका चारु कुरंगनेत्रा ।
रंभा प्रभा रूपवती पवित्रा ॥

चंपावती चंपकपत्रनेत्रा ।
चंद्रप्रभा चंद्रमुखी सुनेत्रा ॥
हारावती हार तरंगितांगी ।
मनोहरा मानसरंगभंगी ॥
पुष्पावती कुंदसमान दंती ।
सुरम्य रम्या रमणीय कांती ॥
बिंबाधरा मोहन मर्दितांगी ।
मदालसा ते सुरसा सुरंगी ॥
जयंतिका कामुक वैजयंती ।
जया पताका विजया जयंती ॥
पीनस्तनी सुंदर पीवरोरू ।
रंभोरु वामा कमनीय भेरू ॥
हंसस्वरा हंसगतावतंसी ।
हंसावरा मानसराजहंसी ॥
रत्नावळी रत्नकळा रसाळा ।
कामालया कामकळा सुशीळा ॥
सुवर्णवल्लीवरि मंजरी ही ।
रंभावती भोगवती सती ही ॥
गानप्रिया गायन गर्वितांगी ।
सुगायनातें सुरत प्रसंगीं ॥
आनंदिनी नंदनिका सुकेशी ।
कृशोदरी मंजुळ मंजुभाषी ॥
सारावती चंपकवल्लि गा ती ।
चांपेइका ते तरते पहाती ॥

गोपी कुंजवनांत येऊन दाखल झाल्या त्या वेळीं गोपाळांनीं त्यांची निष्कारण थट्टा करण्यास आरंभ केला, त्या वेळच्या त्यांच्या व गोपिकांच्या उत्तरप्रत्युत्तरांची कवीनें जी मालिका दिली आहे, तिचा वास थोडासा उग्र आहे.

पुढील चारच श्लोक पहा:—

भाग्या म्हणे 'भागति पाय तूझे ।
कडेवरी येउनि वैस माझे' ॥
भागी म्हणे 'पाय तुझाच टांगो ।
मेल्या कडेला तरि आग लागो' ॥
'मी कुब्ज गे ये कुबडीस जोडा ।
देईन हीलागुनि लाल घोडा'॥
'मेल्या जळाल्या वदसील काई? ।
घोड्यास इच्छील तुझीच आई' ॥
'एकाक्षि हे काजळ फार ल्याली ।
एकाक्ष मी यास्तव नेत्र घाली' ॥
'जळो तुझा तो तरि एक डोळा।
तोडील तूझा तरि काळ लोळा' ॥
'खुणाविते हे मजलागिं बोटें ।
हिनेंच केलें जग सर्व थोटें' ॥
'तूं थोंट गांठा बहुसाल खोटा ।
तुझ्या घरा होतिल तीन वाटा' ॥

ह्या चार श्लोकांचे स्वरूप बरेंच सौम्य आहे. दुसरे कांहीं श्लोक तर इतके अश्लील आहेत कीं भर शिमग्यांतही त्यांचा उच्चार अंगावर शहारे उभे करील! नागेश कवीची वृत्ति फार विनोदी होती असें

दिसतें, पण कित्येक ठिकाणीं ही वृत्ति बीभत्स रसाच्या पल्वलांत अशी बुड्या मारूं लागते कीं, त्याच ठिकाणीं ती आतां जलसमाधि घेईल तर बरें होईल असें वाटल्याशिवाय रहात नाहीं.

श्रीरामचंद्रानें शिलारूपी अहल्येचा पादस्पर्शानें उद्धार केला, हें ऐकून कांहीं लोकांस असें वाटलें कीं, आपणही एक शिळा घेऊन रामाकडे जावें, म्हणजे त्याच्या पादस्पर्शानें त्या शिळेची सुंदर स्त्री होईल. मग त्या स्त्रीशीं आपण विवाह करावा! अशा विचारानें, शिळा घेऊन निघालेल्या लोकांत, 'पहिली बायको जिवंत असतां दुसरी बायको करण्याचें कारण काय?' असा प्रश्न निघाला असतां, कांहीं लोकांनीं आपल्या द्वितीय विवाहाचीं जीं कारणें सांगितलीं, त्यांचा नमुना पहाः—

### श्लोक.

'माझे घरीं वाइल पाहिली ते ।
ते पायली अन्न उभ्याच खाते ॥
निर्लज्ज मोठी, गळताति कक्षा ।
मला असे सुंदरिची अपेक्षा' ॥
'एकाक्ष कार्यास अदक्षता ही ।
नाकास पाहों तरि ठाव नाहीं ॥
प्रत्युत्तरें दे, वचना न साहे ।
या कारणें अन्य वधूस पाहें' ॥
'अदंत माझे घरिंचीच पाहें ।
नांवें मृगाक्षी परि अंध आहे ॥
हातीं खुळी लंगित फार चाले ।
ऐसे वधूनें मज काय चाले?"

'दे मला भाकरी घेतसे चाकरी ।
मी करीना जरी लाथ मारी तरी ॥
कोण आहे घरीं दाद माझी करी ?'
स्रग्विणी नोवरी आजि कां नो वरीं ? ॥
' अंगीं खर्वडता, पदास पृथुता, वक्त्रीं वसे प्रेतता ।
कंठीं घर्घरता,कटीस पृथुता, वक्षस्थळीं शून्यता ॥
नाकीं उद्धसता, वदे कठिणता, चित्तांत निःशंकता ।
हस्तीं तस्करता, असे गुण जिचे ते नावडे तत्वता ॥
अंगीं कोमलता, करीं कमलता, वाणीस पीयूषता ।
पायीं पद्मयुता, महाचतुरता, वक्षस्थळीं पूर्णता ॥
नाकीं सुंदरता, मुखीं विमलता, नेत्रांस आकर्णता ।
चित्तीं निर्मलता, असे गुण जिचे ते आवडे तत्वता ॥

रावणाचें उग्र स्वरूप पाहून सीतास्वयंवरार्थ जमलेल्या राजे लोकांची कशी गाळण उडाली, तें वर्णन पहा:—

कोणी वदे सत्य म्हणे तिजा रे ।
" आम्हांसि येतें बहुसाल शारें ॥
त्याची असे आजिच झाक पाळी " ।
म्हणोनि बांधे पटका कपाळीं ॥ ३५६ ॥
कोणा मनीं विंशति नेत्रशंका ।
वस्त्रांत येते मग मूत्रशंका ॥
' आम्हासि पाहा अति शैत्य झालें ।
या कारणें वस्त्र भिजोन गेलें ' ॥ ३२७ ॥
" दोघी स्त्रियांच्या बहुसाल संगें ।
मी फार कामी रतिरंग रंगें॥

या कारणें हें दुरूनीच पाहें
नाहीं तरी हें धनु काय आहे ?" ॥ ३२८ ॥
"धनुष्य आधीं धरितां मरावें ।
सीतेसि कोणें मग हो वरावें ? ॥
पोटांत झाला बहु शूळ पाहा
धावोनियां साधक वैद्य वाहा ॥ ३२९ ॥

रावणाचें घमेंडखोरपणाचें भाषण:—

बिंदूचे परि सिंधु मानित असें; पृथ्वीस वांधों पुडी ।
मेरू सर्षपतुल्य भासत असे, आभास घालीं घडी ॥
दिक्चक्रें घटिकेंत आक्रमितसें, वायूस मुष्टीं धरीं ।
कैलासापुरि कंदुकापरि करीं, देवांसि बांधीं घरीं ॥३३१॥
पुष्पें आणित इंद्र चंद्ररविला दीपप्रचर्या घडे ।
ब्रह्मा वेद पढे, जळाधिप जळें आणोनि घाली सडे ।
वारा झाडितसे स्वयें, पचन तें वैश्वानराला पडे ।
द्वारा पाळित काळ, रांड सटवी ते वंदिखानीं रडे ॥३३२॥
विघ्नें वारितसे गणेश; नगरी विष्णू समुद्रांतरीं ।
शेषाचा मणि मंडपांतरिं रुता ईशान वेत्रा धरी ।
इंद्राणीप्रमुखा करीति सदनीं योषांस वेणीफणी ।
हें तों कांचिट केवढें मजपुढें कैसें चढेना गुणीं ॥ ३३३ ॥
आकाशास महीतळीं धरिन मी पृथ्वी नभोमंडळीं ।
मृत्यूची मुरडीन थोर नरडी घालीन पायातळीं ॥
कूर्माचें कवटीस काढुनि दिवा लावीन त्या भीतरीं ।
तारामौक्तिक वोढुनी मग तुरा खोवीन वेगें शिरीं ॥ ३३३

ब्रह्मांडासि करीन दोन शकलें भेदोनियां मी नखीं ।
काढीं दिग्गज-कातडी उचटुनी लावीन त्यांचे मुखीं ॥
काळाचे भुजदंड ते कुडपुनी वाजे दमामा झणीं ।
आतां कांचिट रोकडें धडफुडें मोडीन येक्या क्षणीं॥६३६॥

इतक्या श्लोकांवरून नागेशकवीच्या नैसर्गिक काव्यशक्तीची व त्याच्या उज्वल प्रतिभेची वाचकांस चांगली ओळख होईल असें वाटतें.

रुक्मिणीहरण नामक एक काव्य महाराष्ट्रकवि मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालें आहे. त्याच्या दोन हस्तलिखित प्रती मला कोल्हापुर येथें मिळाल्या. दोन्ही प्रतींत 'सामराजकविविरचित रुक्मिणीहरण काव्य' असा उल्लेख प्रत्येक सर्गाच्या शेवटीं आहे, पण काव्यांत कवीनें आपला नामनिर्देश कोठेंही केलेला नाहीं. हें काव्य फार सरस असून त्याचा रचनाकाल वामनाच्या पूर्वीचा दिसतो. याचे आठ सर्ग असून, श्लोकसंख्या ११४० आहे. या काव्यांत अश्लीलपणा कोठेंही नाहीं, पण त्याची एकंदर रचना थेट नागेशकवीच्या काव्यरचनेसारखी आहे. वृत्तें तींच व बहुतेक शब्दही तेच! अशा स्थितींत, नागेश कवीचें रुक्मिणीस्वयंवरावर एक काव्य आहे असें म्हणतात तें काव्य हेंच असावें कीं काय, अशी बळकट शंका येते. तथापि 'सामराज गोसावी' या नांवाचे एक सत्पुरुष कवि महाराष्ट्रांत होऊन गेले आहेत, असें एका जुन्या पत्रव्यवहारावरून समजतें, व यामुळें या बाबतींत निश्चयात्मक असें विधान करणें बरोबर होणार नाहीं हें सांगावयास नकोच.

# विप्रनारायण.

कीं हे शब्द रत्नाचे सागर ।
कीं हे मुक्तांचें मुक्त सरोवर ॥
नाना बुद्धीचे वैरागर ।
निर्माण जाले ॥ दासबोध–श्रीसमर्थ.

विप्र नारायण कवीचा नक्की काल कोणता हें समजण्यास आज कांहींएक साधन उपलब्ध नाहीं. ह्या कवीच्या अश्वमेधपर्वाची जी मराठी पोथी कै. त्र्यंबक गुरुनाथ काळे यांनीं कृपा करून मला पहावयास दिली होती ती शालिवाहन शके १६७६ श्रीमुखनामसंवत्सरे या सालीं भगवंत लक्ष्मण नामक गृहस्थानें लिहिलेली आहे. ग्रंथाची भाषा व रचनाशैली पाहतां, हा कवी मुक्तेश्वरानंतर व श्रीधरापूर्वीं होऊन गेला असावा, असें वाटतें. ह्याच्या जैमिनी अश्वमेध ग्रंथाचे अध्याय ५६ व ओवी-संख्या ६४२८ आहे. कै. त्र्यंबक गुरुनाथ काळे यांनीं आपल्या समालोचकाच्या पहिल्या वर्षाच्या ९ व्या अंकांत या कवीची थोडीशी माहिती दिलेली आहे. ती देतांना, प्रस्तुत कवीचा जैमिनी अश्वमेध ग्रंथ महाभारताच्या अश्वमेधपर्वावर मराठी टीका आहे असा त्यांचा समज झालेला दिसतो; पण वस्तुतः प्रस्तुत ग्रंथाचा व्यासकृत महाभारताशीं कांहीं एक संबंध नसून, जैमिनीकृत अश्वमेधपर्वाचें तें मराठी भाषांतर आहे. याच ग्रंथावर मराठींत आणखी दोन ग्रंथ उपलब्ध आहेत, ते श्रीधरकृत* ‘ जैमिनी अश्वमेध ’ व नामापाठककृत अश्वमेध हे होत. मिळून एकंदरींत जैमिनी अश्वमेधावर मराठींत निरनिराळ्या तीन कवींनीं तीन ग्रंथ लिहिले असून, त्यांपैकीं फक्त

* पांडवप्रतापकर्त्या श्रीधराहून हा श्रीधर भिन्न दिसतो.

श्रीधरकृत अश्वमेध मात्र प्रसिद्ध झाला आहे व बाकीचे दोन अद्याप अप्रकाशित आहेत. विप्रनारायणाचा अश्वमेध हा ग्रंथ श्रीधरांच्या ग्रंथाइतका सरस नसल्यामुळें त्या मानानें त्याची प्रसिद्धिहीं कमी आहे. अश्वमेधाशिवाय दुसरा एखादा ग्रंथ विप्रनारायणानें लिहिला आहे कीं काय, यासंबंधानें कांहीं एक माहिती उपलब्ध नाहीं. या कवीनें स्वत:संबंधानें आपल्या 'अश्वमेध' ग्रंथाच्या शेवटच्या अध्यायांत जी माहिती दिली आहे, ती येणेंप्रमाणें:—

## ओंव्या.

हा जैमिनीचा वाग्विलासु। परिक्षितीसुतातें सांगती सौरसु।
तेणें उद्धार जाले अनेकांसी। पातकापासोनी ॥ ८२ ॥
त्याच मुनिकाव्याची टीका। महाराष्ट्र केली ऐका।
विप्रनारायणु कुळदीपक। गोपिनाथाचा ॥ ८३ ॥
गोपजी दामोदराचा सुतु। नाथाजी नामें विख्यातु।
तेणं प्रार्थुनी यदुनाथु। केली महा........ ॥ ८४ ॥
तापी नदीचे महातीरीं। तीन कोस ग्राम महाक्षेत्रीं।
हत्याहरण तीर्थ पवित्रीं। जाला ग्रंथ हा ॥ ८५ ॥
सरोवरनाम हत्याहरण। ताल ग्राम नामाभिधान
तेथ स्नान केलिया पतित पावन। पावती पुण्यातें ॥ ८६॥
ऐसिया पुण्यक्षेत्रीं वासु। पूर्वजांसहित निवासु।
प्रपितानाम पुण्यांशु। दादाजी नागनाथ ॥८८ ॥
महाधर्माची राशी। ज्याचा कीर्तिविस्तार स्वदेशीं।
त्याचा पुत्र गुणयेज्ञपयेसी (?)। गोपाजी दामोदर ॥ ८९ ॥
तो देवतार्चनशीळ। ज्याचे हृदयीं गोपाळ ॥
ज्याचे पुत्रें हे वाग्रत्नमाळ। ओंवी लिहितां प्रसंग ॥ ९० ॥

**यजुर्वेद माध्यंदिनी शाखा । वसिष्ठ गोत्र प्रत्यक्ष देखा ।**
**तेथें जन्म झाला देखा । नारायणातें ॥ ९१ ॥**

वरील ओंव्यांपैकीं ८८व्या ओंवींतील 'प्रपिता' या शब्दाचा अर्थ 'आजा' असा घ्यावा लागतो, कारण त्यापुढें कवीनें आपल्या बापाचा व स्वतःचा मात्र उल्लेख केला आहे. यावरून कवीची जी * वंशावळ ठरते ती येणेंप्रमाणें:-

१ नागनाथ
|
२ दादाजी ऊर्फ दामोदर
|
३ गोपीनाथ, गोपजी ऊर्फ नाथाजी
|
४ विप्रनारायण.

---

*कै. काळे यांनीं नागनाथापासून विप्रनारायणाची पिढी पांचवी होती, व नाथाजी हा विप्रनारायणाचा जनक होता असें लिहिलें आहे. पण वरील ओंव्यांकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास असें दिसून येईल कीं, नाथाजी हा गोपीनाथाचा मुलगा नसून, गोपीनाथाचेंच नाथाजी हें दुसरें नांव होतें. 'गोपीनाथाचा विप्रनारायणु' असें कवीनें स्पष्ट म्हटलें आहे; अर्थात् गोपीनाथ हा विप्रनारायणाचा आजा नसून बापच होता, असें स्पष्ट दिसतें. शिवाय 'प्रपिता' या शब्दाचा अर्थ जर 'पणजा' असा घेतला तर 'पूर्वजांसहित निवासु' या पदाचा अर्थ बरोबर लागत नाहीं. कारण 'विप्रनारायणा'नें हा ग्रंथ लिहिला त्या वेळीं त्याचा पणजा जिवंत असेल, हें संभवनीय दिसत नाहीं. अर्थात् 'प्रपिता' या शब्दाचा अर्थ, प्रस्तुत ठिकाणीं, आजा असाच घेतला पाहिजे, हें उघड आहे.

वरील ओंव्यांपैकीं शेवटच्या ओंवीवरून, हा कवि यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचा असून, त्याचें गोत्र वसिष्ठ होतें, हें उघड होत आहे.

कवित्वाच्या दृष्टीनें पाहतां, या कवीची कविता मध्यम प्रतीची दिसते. भाषेवरून पाहतां, हा कवि मोठा पंडित होता असें दिसत नाहीं. त्याची कविता जितकी साधी आहे, तितकीच त्याची भाषाही साधी आणि सुलभ आहे. आतां त्याच्या अश्वमेध ग्रंथांतील कांहीं सुरस वेंचे येथें देऊन हा लेख पूर्ण करितों.

हंसध्वज राजाचा महाभगवद्भक्त व शूर पुत्र सुधन्वा याचा अर्जुनानें वध केला, त्या वेळीं जो हाहाकार उडाला त्याचें वर्णनः—

ओंव्या.

दुःख दाटलें त्रिभुवनीं । देव पाहात होते विमानीं ।
ते मूर्च्छित जाले गगनीं । आपण इंद्रादिसमवेत ॥ १३२ ॥
दुःखें न चाले दिनमणी । वायो चळेना दुःख करोनी ।
खेचर भयातें सोडोनी । रुदन करिती रणांगणीं ॥ १३३ ॥
शिळा फुटती महादुःखें । वनें सुकती तेणें शोकें ।
नर अश्व गज न घेती उदकें । दुःखेंकरोनियां ॥ १३४ ॥
दिवसा तुटती तारांगणें । कळाहीन जाला शशि जाणें ।
उभय सैन्यामध्यें दारुण । करूणाशब्द होती ॥ १३५ ॥
नगरींत गेली मात । कीं देह त्यागिला राजसुतें ।
सर्वां जालें दुःख बहुत । तें वदवेल कवणासी ? ॥ १३६ ॥
राजभुवनींचिया राजांगना । शब्द करिती देखा करुणा ।
स्रवे जळ नेत्रीं पूर्ण जाणा । तेणें ओघ वाहती ॥ १३७ ॥

रडतां श्रमली महानगरी । मग हाहाकार करिती अवधारीं ।
हें काय केलें गोविंद मुरारी । रत्न निमालें माझें ॥ १३८ ॥

*　　　*　　　*

पृथ्वी दुःखानें जळाली । तेणें शेषाची फडी हालवली ।
आणि कूर्मपृष्ठी तापली । ऐसा जाला आकांत ॥ १४२ ॥

—विप्रनारायणकृत अश्वमेध (अध्याय ११.)

सत्पुरुष सुधन्व्याच्या मृत्यूनंतर सृष्टिदेवीनें जें भयानक स्वरूप धारण केलें, त्याचें वर्णन:-

ओंव्या.

आधींच कृष्णपक्षींचा अंधार । वरी वायो सुटला महाथोर ।
धुळीनें व्यापिलें अंबर । आकांत सर्व प्रवर्तला ॥ १५१ ॥
उडों लागलीं कलेवरें । वायोचक्रीं पडिलीं आवारमंदिरें ।
नेत्रीं फुटले तुषार । तये वेळीं ॥ १५२ ॥
उडों लागले अश्वरथ । देखोनि शंकित जाला पार्थ ।
हा प्रळयकाळ जगन्नाथ ! । आजिच केला ॥ १५३ ॥
पिंगळे बोलती अशुभ शब्दीं । भालुवा भुंकती महानादीं ।
गीध बैसोनि वीरस्कंधीं । नेत्र खाती वीरांचे ॥ १५४ ॥
उलुक सैन्यांत फिरती । तेणें झडपती महाघातीं ( ? ) ।
मेघ वर्षला तये रातीं । शोणिताचा ॥ १५५ ॥

चालिले शोणितांचे खळाळ । प्रेतें वाहती महास्थूळ ।
वीर बुडती महा खोल । वाहों लागलें शोणित ॥ १५६ ॥
नग्न धांवती लांवा । आला वेताळांचा थवा ।
भूतपाळीं म्हणती ' देवा ! । ऐसेच हो प्रतिदिनीं ' ॥ १५७ ॥
आली औट कोटी भूतावळी । मेद मांस खातां सर्व धालीं ।
म्हणती धन्य धन्य वनमाळी । आजी वहुतां दिवसां भोजन १५८
सैरावैरा धांवती यक्षिणी । सगळ भक्षिती डांकिणी ।
विदारिती पिशाचवाणी । महावीरांतें ॥ १५९ ॥
ऐसीं नानापरी भूतें अमित । परिसोनि पावलीं त्वरित ।
मेदमांस आणि शोणितें । सकळ तृप्त जालीं ॥ १६० ॥
मग तृप्त जालियावरी । गोंधळ खेळती अवधारीं ।
दिवटिया घेवोनी करीं । एकेक अंवरीं उसळती ॥ १६२ ॥
उदो उदो करिती भूतें । म्हणती भोजन दिधलें जगन्नाथें ।
आजी जो नये येथें । तो मुकला भोजना ॥ १६३ ॥

ज्या मूळ पोथींतून वरील वेंचे उतरून घेतले आहेत, ती पोथी फारच अशुद्ध असल्यामुळें आणखी कांहीं वेंचे येथें देतां येत नाहींत ही निरुपायाची गोष्ट आहे. तथापि शेवटच्या अध्यायांतल्या पुढील ओंव्या बऱ्याच शुद्ध व वाचनीय आहेत असें वाटल्यावरून त्यांचा संग्रह येथें केला आहे. अश्वमेधाचें कार्य पूर्ण झाल्यावर, धर्मराजानें भगवान् श्रीकृष्णाची स्तुति केली, ती पुढील ओंव्यांत वर्णिली आहे.

......जाली समाप्ती । पांडवीं पूजिला जगत्पती ।
पोडशोपचारीं श्रीपति । पूजा केली अनंताची ॥ १ ॥
करीं घेवोनि पुष्पांजळी । पांच बंधु समेळीं ।
कुंतीसहवर्तमान ते काळीं । चरणीं मस्तक ठेविला ॥ २ ॥

म्हणती सर्वोत्तमा गुणप्रसन्ना। अच्युतानंता भक्तवत्सल नारायणा।
अनाथनाथा मधुसूदना । विश्वंभरा तूं ॥
दयासिंधु कोटि कंदर्पा । विधिविबुधांचिया मायबापा ।
आम्हां दीनांतें निःपाप । केलें गरुडध्वजा ॥ ४ ॥
सत्कर्मांचिया राशी । भेदोनि गेलिया एकवीस स्वर्गांसी ।
त्याचें फळ द्यावया हृषिकेशी। जालासि आमुचा साहकारी ॥५॥
आणि तुझे आज्ञेचे फुलारें । तेणें शोभविती विधिचीं शिरें ।
तो तूं आमुचे आज्ञेनें नृपवरें (?) । वर्तसी कमळनयना ॥ ६ ।
आणि तुझे इच्छेनें चिंतामणि । ब्रह्मांड होतील लक्षक्षोणी ॥
तों तूं आमुचे वचनें चक्रपाणि । वर्तसी निरंतर ॥ ७ ॥
तुझ्या ध्यानरूपें ध्यानस्थ । मूर्ति आव्हानूनि हृदयांत ॥
कपिलासारखे महंत । कोटि युगें तप करिती ॥ ८ ॥
तो तूं आमुचे सदनीं । बंधुतुल्य वर्तसी चापपाणी ।
तरी आम्हांतुल्य कोण त्रिभुवनीं । भाग्यवंत आहे ? ॥ ९ ॥
आसनीं भोजनीं शयनीं। नित्य सन्निध वससी सारंगपाणी ।
आमुचे शक्तीपुढें ठेंगणी । अमरावती सत्य ॥ १० ॥
हे क्षितिपति भूपाळ । दिनकरातुल्य प्रतापमल्ल ।
आणि पुण्यश्लोकांचे अचळ । जैसे मेरू ॥ ११ ॥
ते तुवां आमुचा प्रीतीकरूनी । द्विपद्विपींचे मुगुटमणी ।
यश अर्जुनातें देवोनी । यज्ञ सिद्धीतें पावला ॥ १२ ॥

शेवटीं कवीनें श्रोत्यांस विनंति* केली आहे:—

---

* ज्या पोथीवरून हे उतारे घेतले आहेत, ती पोथी शा. शक १६७६ या वर्षीं भगवंत लक्ष्मण नामक गृहस्थानें लिहिली असून त्यानेंही ग्रंथाच्या शेवटीं कांहीं ओंव्या रचून घातल्या आहेत:—

‘ अश्वमेध कथा सुरस । संपूर्ण केलें फार सायासें ।
तेथें न पडे हस्तदोश । शोध करावा ॥

जोडूनियां दोनी पाणी । श्रोतयांची करीं विनवणी ।
म्यां कौतुकें केली रचनी । ग्रंथ अश्वमेधाची ॥ ९२ ॥
प्रसंगोप्रसंगालागुनी । पहिलीच केली विनवणी ।
कीं अवाच्य वाणी अशक्त मनीं । बुद्धि दुर्बळ माझी ॥ ९३ ॥
कोठें असेल अशुद्ध बोल । तुम्हीं शुद्ध करावा ज्ञानशीळ ।
माझा अवगुण तात्काळ । न करावा तुम्हीं ( ? ) ॥ ९४ ॥
तुम्ही महाधैर्याचे सागर । तुमचें उदर सखोल प्रचुर ।
हें जाणोनि शरणागत सत्वर । जालों तुमतें ॥ ९५ ॥

या ओंव्यांवरून कवीची शालीनता उत्तम प्रकारें व्यक्त होते.

• महिपतिकृत भक्तलीलामृताच्या ४७ व्या अध्यायांत एका ' नारायणभट्ट ' नामक साधूचें चरित्र दिलें आहे. हा साधु तापी नदीच्या तीरीं " थारनेर" नामक गांवीं रहात असे. प्रस्तुत चरित्रनायक विप्र नारायण हेही तापीतीरवासीच होते. तेव्हां महिपतींनीं वर्णिलेले ' नारायणभट्ट ' व अश्वमेधाचा कर्ता ' विप्रनारायण ' हे दोन्ही मिळून एकच व्यक्ति होती कीं काय, असा प्रश्न उत्पन्न होणें साहजिक आहे; पण विश्वसनीय माहितीच्या अभावीं या प्रश्नाचें उत्तर देतां येणें कठिण आहे.

---

चित्त देवोनि वदतां जन । कोप न करावा मजकारणें ।
चुकली मुकलिया नीट करणें । शब्द न ठेवावा श्रोतेजन ॥ '

फार सायासानें लिहून काढलेल्या ह्या ग्रंथांत हस्तदोष आढळणार नाहीं; तथापि, कोठें तरी चूकभूल झालेली आढळल्यास वाचकांनीं ती दुरुस्त करावी असें वरील ओंव्यांत भगवंत लक्ष्मण लिहितो; पण या त्याच्या विधानांपैकीं पहिलें अगदीं खोटें व दुसरें केवळ अशक्य आहे. कारण, हा सगळा ग्रंथ हस्तदोषांनीं भरलेला आहे व तो दुरुस्त करण्यापेक्षां त्याची नवी प्रत करणेंच अधिक सुलभ जाईल,

# विठ्ठल चित्रकवि.

**विठ्ठल कविच्या भलता लंघूं न शकेचि चित्र कूटातें ।**
**प्रवलतरहि पर जेंवी श्रीरामनिवास चित्रकूटातें ॥ १ ॥**

**सन्मणिमाला–मोरोपंत.**

'विठ्ठल' या नांवाचे कवि महाराष्ट्रांत चार पांच होऊन गेले असल्यामुळें, त्यांच्या कवितेसंबंधानें मोठा घोटाळा झाला आहे. १कऊपूरकर विठ्ठल, २ बीडकर चित्रकवि विठ्ठल ३ विठ्ठल दीक्षित, ४ केरीकर विठ्ठल, ५ आजरेकर विठ्ठल, ६ आणि विठोबा अण्णा दफ्तरदार इतके 'विठ्ठल कवि' तर सुप्रसिद्धच आहेत. काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालेली कविता बीडकर, केरीकर व दीक्षित या तीन विठ्ठलांची होय. वरील सहा कवींपैकीं, चित्रकाव्यासंबंधानें ज्याची विशेष प्रसिद्धि आहे, त्या बीडकर विठ्ठल कवीचें चरित्र प्रस्तुत लेखांत दिलें आहे.

बीडकर विठ्ठल हे मुक्तेश्वर व रामदास यांचे समकालीन होते. याच्या उपलब्ध काव्यांचा रचनाकाल अनुक्रमें येणेंप्रमाणें:—रुक्मिणीस्वयंवर शके १५९६; सीतास्वयंवर शके १५९९; रसमंजरी शके १६०१; व द्रौपदीवस्त्रहरण शके १६०२. या कवीनें स्वत:संबंधाची पुढील माहिती आपल्या कवितेंत दिली आहे:—

**" श्रीमत्कौशिक गोत्र वास्ति नगरीं गौरीपुरीं जाणिजे।**
**मुख्य स्थानक बीड नीड तरफेमध्यें नृपें राहिजे ॥**
**श्रीमद्रुक्मिणिचें स्वयंवर निकें संपूर्ण हें वाचिजे ।**
**ऋग्वेदोत्तम आश्वलायन महाशाखांबुधी जाणिजे ॥**
**वर्णी विठ्ठल दुग्धसागरकुलालंकार चूडामणी ।**
**पद्यें प्राकृत सप्त सर्ग तिनशें त्रेपन्न चिंतामणि ॥**

**व्यापारी हरिभक्त विठ्ठल कवी प्रार्थीत नारायणा ।**
**संरक्षीं सकलांसि ग्रंथ पढती गोवर्धनोद्धारणा ॥**

रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं ‘ सरस्वतीमंदिर ’ मासिक पुस्तकांत कळपुरकर विठ्ठलाची जी थोडीशी माहिती प्रसिद्ध केली होती, ती वाचून पाहतां, ‘ बीडकर विठ्ठल ’ व ‘ कळपूरकर विठ्ठल ’ ही एकच व्यक्ति असावी कीं काय, असा बळकट संशय मनांत उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाहीं. कळपूरकर विठ्ठलाच्या **रासक्रीडा** ग्रंथाचा रचना काल ( शके १५३६ ) व त्यानें दिलेली स्वतःची माहिती यांचा बीडकर विठ्ठलाच्या कालाशीं व माहितीशीं फारसा मेळ पडत नाहीं, ही गोष्ट जरी येथें कबूल केली पाहिजे, तरी त्या दोघांच्या कवितेंत इतकें विलक्षण साम्य आहे कीं, त्यामुळें त्यांची एकरूपता गृहीत धरण्याचा मोह क्षणभर तरी मनांत उत्पन्न होतो ! कळपूरकर विठ्ठलानें स्वतःची माहिती दिली आहे ती येणेंप्रमाणें:—

**नारायणाचीं अगणीत नामें ।**
**निःकाम घ्यावीं अथवा सकामें ॥**
**आहे असा निश्चय विठ्ठलाचा ।**
**हा ग्रंथ केला हरिराधिकेचा ॥**
**गणपतिवरदानें स्फूर्ति अद्भुत आहे ।**
**मृदुपदरचनेचें श्लोकसाहित्य पाहें ॥**
**कुज म्हणतिल वाचा काय भाषा मराठी ।**
**परि सुरस जनांतें प्रीति होईल मोठी ॥**
**रात्रंदिवा वामनमूर्ति चिंतीं । तेणें अविद्या वसती दिगंतीं ॥**
**दृष्टीस दूजें अणुही न दीसे । सर्वास्थळीं ईश्वर एक भासे ॥**

शब्द मान्हाष्ट्र कांहीं घडेना जना ।
हे पुराणींच बोलेति आणा मना ॥
बोलती मूर्ख वाक्यें अशीं सर्वथा ।
याचिलागीं मियां बोलिली हे कथा ॥
दर्शनाग्नि नयन स्थिर पाहें । सर्व पद्यरचना इतुकी हे ।
जाणती चतुर ते रस याचा । ईश्वरार्पण वदे कवि वाचा ॥
गोत्र श्रीवत्स ज्याचें श्रुति तरि दुसरी जीवनस्तंभ शाखा ॥
व्यापारी वृत्ति ज्याची द्विरदगुरु असे त्यासि संतुष्ट देखा ॥
आचारें शुद्ध आहे सकळ कळपुरीं सर्वदा वस्ति ज्याची ।
तेणें हा ग्रंथ केला प्रकट तरि असे विठ्ठल ख्याति ज्याची ॥

ह्या सहा श्लोकांत निरनिराळीं पांच वृत्तें आहेत. आतां बीडकरांचे श्लोक पहा:—

विभक्ती मी कोशादिक न समजें नाटक निकें ।
मराठी हे वाणी, नसति अभिधानें सुरसिकें ॥
मराष्ट्रं होत्सातें चतुर जन हें मान्य करिती ।
मनाच्या उल्हासें रचिन तरि मी नाटकरिती ॥
टिका मूळाधारें प्रथम धरिली संस्कृतकथा ।
सभेमध्यें श्रोते परिसतु महाराष्ट्र उलथा ॥
श्रीमद्रुक्मिणिचें स्वयंवर निकें साहित्यपद्योत्तरीं ।
वाची श्रीपति पत्रिका उकलुनी चातुर्यवर्णाक्षरीं ॥
श्लोकाची रसवृत्तिशुद्ध रचना वित्पन्न ते जाणती ।
वर्णी विठ्ठलदास सर्ग पहिला म्हाराष्ट्र हे पद्धती ॥

वरील श्लोकांशीं हे श्लोक ताडून पाहिल्यास, दोन्ही काव्यें एकाच कवीनें रचलीं असावींत, असें वाटल्याशिवाय राहात नाहीं. विशेषतः

महाराष्ट्र भाषेची तरफदारी सारख्याच शब्दांनीं दोन्हींकडे केलेली आढळते; ' मियां, ' ' करिजेती, ' ' बोलेति' इत्यादि शब्द दोन्ही काव्यांत आढळतात. शिवाय, बीडकर विठ्ठलाच्या ' विद्वज्जीवन ' काव्यांत कृष्णलीलेचें वर्णन फार आहे. कै. वामन दाजी ओक यांनीं काव्यसंग्रहांत बीडकर विठ्ठलासंबंधानें लिहितांना 'यानें कृष्णलीलावर्णनपर आणखी बरीच कविता केली असावी असें हरिदासांच्या कीर्तनांतील प्रसंगोपात्त कानीं पडणाऱ्या चुटक्यांवरून दिसून येतें ' असें म्हटलें आहे, यावरून ह्याच कवीनें ' रासक्रीडा ' ग्रंथ लिहिला असावा असें अनुमान सहज होतें.

येथपर्यंत कळपुरकर व बीडकर हे दोन्ही कवी मिळून एकच व्यक्ति होती, असें दाखविणाऱ्या सदृश स्थलांचा विचार केला. पण त्याबरोबरच विसदृश स्थलांचाही विचार केला पाहिजे हें उघड आहे. ही विसदृशता कवींच्या वास्तव्यस्थानांत व गोत्रांत दिसून येते. कळपुरकरानें आपलें गोत्र कौशिक व वास्तव्यस्थान कळपूर दिलें आहे. बीडकरानें आपलें गोत्र वत्स व वास्तव्यस्थान गौरीपूर दिलें आहे. बीडकराचें आडनांव क्षीरसागर; कळपूरकरानें आपलें आडनाव दिलेलें नाहीं. कळपूरकराच्या रासक्रीडा ग्रंथाचा रचनाकाल व बीडकराच्या रुक्मिणीस्वयंवराचा रचनाकाल यांत ६० वर्षांचें अंतर आहे! उलट पक्षीं, दोन्ही कवींची वृत्ति 'व्यापारी' होती; भाषा, वृत्तवैचित्र्य, शब्द-रचना इत्यादिकांवरून पाहिल्यास दोघांच्या काव्यरचनेंत बिलकुल फरक दिसत नाहीं. तेव्हां हें कोडें कसें उलगडावयाचें, हें वाचकांनींच ठरवावें.

बीडकर विठ्ठलानें लिहिलेल्या ग्रंथांपैकीं पुढील ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत:– १ रुक्मिणीस्वयंवर, २ पांचालीस्तवन, ३ सीतास्व-

यंवर, ४ रसमंजरी, ५ द्रौपदीवस्त्रहरण ६ विद्वज्जीवन, ७ बिल्हण-चरित्र ८ फुटकळ पदें. वरील ग्रंथांपैकीं रसमंजरी हा ग्रंथ शहागड येथें लिहिला आहे, यावरून प्रस्तुत कवि व्यापारासाठीं निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन रहात असे, हें उघड दिसतें. काव्यसंग्रहांत २६५ श्लोकांचें एक द्रौपदीवस्त्रहरण विठ्ठलकृत काव्यांत छापलें आहे पण तें काव्य विठ्ठलकृत नव्हे असें काव्यसंग्रहकारानींच मागाहून सांगितलें आहे. हें काव्य कचेश्वरांचें असावें असें वाटतें. काव्याचे शेवटीं कवीचा नामनिर्देश नाहीं, कारण तें अपूर्ण आहे, परंतु काव्याची ठेवण थेट कचेश्वरांच्या काव्यरचनेसारखी आहे. हें काव्य कचेश्वरांचेंच आहे, असें मला अगदीं खात्रीपूर्वक वाटतें.

बीड हा गांव मोंगलाईंत पैठणच्या आग्नयेस ५० कोस आहे. विठ्ठल कवीनें पांचालीस्तवन काव्यांत स्वतःसंबंधानें लिहितांना 'अनंताच्या पुत्रें' असें म्हटलें आहे, यावरून त्याच्या बापाचें नांव अनंत होतें, हें स्पष्ट होत आहे. विठ्ठल कवि मोठे विद्वान् असून त्यांस संस्कृत व प्राकृत भाषांचें ज्ञान फार चांगलें होतें. विशेषतः साहित्यशास्त्रांत त्यांची गति विलक्षण होती. भारतरामायण, रघुवंशादि काव्यें व हनुमन्नाटकादि नाटकें त्यांनीं लक्ष्यपूर्वक वाचलीं होतीं. त्यांचें छंदःशास्त्रनैपुण्य व चित्रकाव्यकौशल्य, त्यांच्या सीतास्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर, विद्वज्जीवन इत्यादि काव्यांत उत्तम प्रकारें प्रकट झालें आहे. बहुतेक सगळीं संस्कृत वृत्तें छंदःशास्त्रनियमानुसारें मराठींत आणण्याचा पहिला प्रयत्न विठ्ठल कवींचा दिसतो. तत्कालीन वाचकांचा संस्कृत वृत्तांशीं विशेष परिचय नसल्यामुळें त्या त्या वृत्तांचीं नांवें त्यांस तेथल्या तेथें कळावीं, या हेतूनें प्रत्येक श्लोकांत त्याच्या वृत्ताचें नांव मोठ्या खुबीनें गोवून टाकलें आहे. पुढील श्लोक पहाः—

आतां वसंततिलका सखि नाम याचें।
सिंहोन्नता कलियुगीं मत कश्यपाचें ॥
उद्धर्षिणी मग वरी कथिली ललामें।
या द्वापरांत मधुमाधवि युक्त नामें ॥

चापे केतकि मोगरे सुरतरू जाईजुई शेंवती।
वेणू वेत कणेर मंद पवनें हेलाविती मालती।
भूपाळें मधुमाधवें वनलता साऱ्या प्रफुल्ला महा।
वल्लीचें ऋतुचें स्वयंवर पटा शार्दूलविक्रीड हा ॥

त्यासवें मागुते सस्य वर्षाऋतु।
ते मेघ धारामृतें वाढवीले ॥
वृत्त हें पैं भलें दंडका वर्णिलें।
सत्कवी विठ्ठलें पद्य केलें ॥

जल कंबुशे बहु पंक होय वाटे।
नद नदी यांप्रति पूर फार दाटे ॥
धन दुर्दिनोत्तम मानला समग्रा।
रस निपजे सखि ! वृत्त पुष्पिताग्रा ॥

यमुना वन माजविलें शरिरें।
निजवैभव दाखविलें चतुरें।
नवपल्लव शोभति ते बरवे।
सखि ! तोटकवृत्त जगीं मिरवे ॥

नदि यमुनेचें स्थिर बहु पाणी।
क्षिति वनितेची सरळ सुवेणी।
नगपरिवेष्टित वल्लि पवित्रा।
शशिवदना या कुसुमविचित्रा ॥

सखियांस वदे व्रज गोरटी ।
भ्रमता न पवे हरि संकटीं ॥
श्रमली न चले पद येथुनी ।
जन हो परिसा अतिशायिनी ॥
कुंडमंडपिं दिव्य उन्नत पादपीं तप योजिलें ।
क्षेत्र हृद्गन पुण्यपावन मंत्रसाधन मांडिलें ॥
पद्मलोचन तापमोचन हेंचि चिंतन ते करी ।
छंद हा विबुधप्रिया वरि निश्चयात्मक वैखरी ॥

विठ्ठल कवीची छंदःशास्त्रांत चांगली गति होती, तथापि क्वचित् स्थलीं भाषेच्या व छंदःशास्त्राच्याही चुक्या त्याच्या काव्यांत आढळतात. कदाचित् लेखकप्रमादामुळेंही या चुक्या अस्तित्वांत आल्या असतील. कित्येक ठिकाणीं कवीनें आपणास 'सत्कवि', 'सत्कविराज' 'विठ्ठलदास' इत्यादि विशेषणें लावून घेतलीं आहेत यावरून, व त्यांच्या एका ग्रंथाचें नांव 'विद्वज्जीवन' असें आहे त्यावरून, कवीस आपली कीर्ति व्हावी अशी इच्छा होती हें उघड दिसतें. कांहीं ठिकाणीं—

म्यां पूर्वार्जित साधिलें न तुमचे शास्त्रार्थ ना पाहिले ।
श्रीसारस्वतकाव्यनाटकरसालंकार ना देखिले ॥
छंदोग्रंथ निरीक्षले न यमकें चित्रें विचित्रें तुकें ।
दोषां सर्व क्षमा करा चतुर हो द्या धैर्य मातें निकें ॥

असे शालीनतेचे उद्गार आढळतात, कांहीं ठिकाणीं—

छंद बंध वचनें अनुपम्यें ।
काव्यरीति वचनें ननु रम्यें ॥

असेंही म्हटलें आहे. एकंदरींत कवीची वृत्ति जरी प्रापंचिक दिसते, तरी हरिगुणवर्णन हाही त्याच्या काव्यरचनेचा एक हेतु होता, हें पुढील श्लोकांवरून उघड होतें:—

कमलनयन कान्हा जो उभा कुंजशाई ।
मुरलि मधुर नादें जो वळी लक्ष गाई ॥
शतहिमरुचि लोपे गोपिका मध्यभागीं ।
हृदयिं धरिं मना तूं लुब्ध जो रासरंगीं ॥
वाणी पवित्र रघुनाथचरित्र गातां ।
तें आइका पतित पावन होय आतां ॥
हे पंडितांस विनती करणें न लागे ।
'घ्या हो ! सुगंध' मधुपांप्रति कोण सांगे ? ॥

आपल्या ग्रंथावरून शकुन पाहण्याची पद्धत विठ्ठल कवींनीं सांगितली आहे ती येणेंप्रमाणें:—

'धान्याचे बहु ढीग सत्य वरुते त्री त्यांतळीं मांडणें ।
पूर्वीं पुस्तक पूजणें शकुन पैं त्यानंतरें पाहणें ॥
तीं ठायीं तिन पोफळें वरि फुलें चिंतूनियां ठेवणें ।
आदौ सर्ग तथा दशा दशकिंचा श्लोक क्रमें देखणें ॥'

विठ्ठलकवीची उपलब्ध झालेली एकंदर कविता सुमारें १६०० आहे. यांतील बहुतेक कविता प्रौढ, प्रासादिक आणि प्रसन्न अशी आहे. ठिकठिकाणीं संस्कृतांतील कल्पनांची झांक मारते व काव्याची एकंदर रचनाही संस्कृताच्या पद्धतीवरच केली आहे. 'सर्ग' व 'उल्लास' यांचा उपयोग करण्यांत कवीनें हीच गोष्ट ध्वनित केली आहे. केवळ व्यापारी वृत्तीनें राहणाऱ्या या गृहस्थाची प्रवृत्ति काव्यरचनेकडे कशी झाली, याचें मोठें आश्चर्य वाटतें. कवीनें कोणा सत्पुरुषाचा उपदेश घेतला असावा, असें पुढील श्लोकरचनेवरून दिसतें:—

'ज्ञाता श्रीगुरु रत्नपीठ भुवनीं चिद्रत्नसिंहासनीं ।
हस्ताब्जीं वरदा भयें प्रियतमा शांति क्षमा आसनीं ॥

**सालंकार उदार पुस्तक पुढें शिष्या प्रबोधीतसे ।**
**वाक्यें ‘ तत्त्वमसीति ’ विठ्ठलकवी साष्टांग वंदीतसे ॥ ’**

संस्कृत नाटकें व काव्यें यांच्याशीं आमच्या जुन्या मराठी कवींचा बिलकुल परिचय नव्हता, हें ‘ निबंधमालाकारां’चें विधान चुकीचें आहे, हें सिद्ध करण्यास विठ्ठलकवीचेंच एक उदाहरण पुरे आहे. काव्यसंग्रहकारांनीं विठ्ठलकृत कवितेवर खालील अभिप्राय दिला आहेः—

“ याची कविता संस्कृत काव्याच्या धाटणीवर केलेली दिसते. याची वर्णन करण्याची शैली बरीच मनोरम आणि सरळ आहे. याच्या काव्यांत साधारण वाचकास आनंद देणारीं अशीं स्थळें अनेक आहेत. याची कविता श्रेष्ठ प्रतीची अशी जरी गणितां आली नाहीं तरी तींत मार्दव, वृत्तवैचित्र्य आणि सौष्ठव असल्यामुळें तिला मोहकत्व प्राप्त झालें आहे. कोठें वृत्तसुखार्थ कवीनें व्याकरणशुद्धतेकडे विशेष लक्ष पुरविलें नाहीं असें दिसतें, पण तो ज्या कालीं उदय पावला त्या कालाकडे दृष्टी दिली असतां, तें क्षम्य होय असें म्हटलें पाहिजे. ”

विठ्ठल कवीकृत उपलब्ध काव्यांची यादी मागें दिलीच आहे; येथें त्या काव्यांच्या सामान्य स्वरूपाचें दिग्दर्शन करितों.

[ १ ] रासक्रीडा हा ग्रंथ अद्याप प्रसिद्ध झाला नसल्यामुळें त्याच्यासंबंधानें विशेष कांहीं लिहितां येत नाहीं. तरी पण हा ग्रंथ रसाळ असून त्यांत वृत्तवैचित्र्य फार आहे, असें, रा. राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलेल्या त्यांतील कांहीं पद्यांवरून दिसतें. [२] सीतास्वयंवराचे सर्ग ७ व पद्यें ३६३ आहेत.

**“मेघश्याम अनंगधाम चपला सीता भजावी बुधीं ।**
**चौं हातीं वरदाभयें प्रतिधनुर्बाणीं क्रमें आयुधीं ॥**
**आत्माराम समस्त काम पुरवी वाचे सदां गाइजे ।**
**सालंकार उदार हास्य हृदयीं सद्विठ्ठलें ध्याइजे ॥ १ ॥**

हा विठ्ठलकृत सीतास्वयंवरांतील श्लोक महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं आहे. ह्या काव्यांतील अहल्योद्धार, सीतावर्णन, रावणगर्वपरिहार, शिवधनुष्य-भंग इत्यादि प्रसंग फार चांगले साधले आहेत. ह्यांतील कांहीं श्लोक पुढें देतों:—

गौतमऋषींनीं अहल्येस शाप दिल्यावर, तिचें व तेथील अरण्याचें स्वरूप एकदम कसें पालटून गेलें व तो उदासवाणा देखावा पाहून गौतमास किती वाईट वाटलें, तें वर्णन:—

होता ऋषी गौतम पाठिमोरा ।
तात्काळ शापें मळरूप घोरा ॥
वर्षें शिळा साठिसहस्र झाली ।
कुंडाग्निनें पर्णकुटी जळाली ॥ ३६ ॥
झाडिलें मग मृगासन तेणें ।
शापिलें विपिन यास्तव एणें ॥
श्वापदें पळति वृक्ष जळाले ।
कोरडे नदि सरोवर झाले ॥ ३७ ॥
परित्यागिलीं रम्य नीडें पवित्रें ।
तरू शुष्क झाले समूलाग्रपत्रें ॥
न राहे वनामाजि मुंगी न माशी ।
गतक्रोध वैराग्य ये गौतमासी ॥ ३ ॥
मेरूशृंगातें तपातें निघाला ।
ऐसा शक्रें घातला त्यासि घाला ॥
पश्चात्तापें क्रोधशांत्यर्थ झाला ।
तोयस्पर्शें अग्नि जैसा विझाला ॥ ३९ ॥

शांता रसाजवळि वीर कदा न राहे ।
सूर्योदया तिमिर देखुनि काय राहे ? ॥
धर्मापुढें दुरित राहिल हें घडेना ।
श्री आलियावरि दरिद्र जसें उरेना ॥ ४० ॥
म्हणे 'म्या कसा आपुला घात केला ।
शुचिस्नात आलों स्वगुंफे भुकेला ॥
पुढें इंद्र येवोनि कापट्यवेषें ।
सती भोगिली लिंपिली पापलेशें ॥ ४१ ॥
यदर्थीं अहल्येस संतोष नाहीं ।
वृथा शापिली म्यां न जाणोनि कांहीं ॥
नव्हे इंद्र सामान्य देवाभिमानी ।
न जाणोनि केली तपोपुण्यहानी ॥ ४२ ॥
कौमारदेहीं सुरतानुरागी ।
चंद्राग्नि गंधर्व तिघे विभागी ॥
एकेक संवत्सर दोनि भोगी ।
दुर्बोध याचा धरि कोण योगी ॥ ४३ ॥
मनश्चंद्रमा अर्यमा नेत्र ज्याचे ।
मुखापासुनी भूत इंद्राग्नि त्याचे ॥
जगत्प्राण जो प्राण संपूर्ण गात्रीं ।
विराटस्वरूपी हरी देहमात्रीं ॥ ४४ ॥
होणार तें तों न टळे प्रमाणीं ।
बोलोनि गेले मुनि वेदवाणीं ॥
ब्रह्मादिकां भोग घडे अनिच्छा ।
बळी असे केवळ ईश्वरेच्छा ॥ ४५ ॥

श्रीरामपादस्पर्शानें पूर्णस्वरूप पावलेली अहल्या श्रीरामास म्हणते:-

रामा कैवल्यधामा न कळसि निगमा नेति वामांगि रामा ।
जिव्हे श्रीरामनामावळि जपत उमाकांत चित्ताभिरामा ॥
देशी मोक्षार्थ कामामृत पद परमानंद तूं पूर्णकामा ।
नाना अन्याय सामाविशि तव महिमा जाणसी तूंचि रामा ॥

श्रीरामलक्ष्मणाची मनोहर जोडी पाहून आनंदित झालेल्या जनकानें विश्वामित्रास त्यांचें वृत्त विचारिलें, तेव्हां—

तदुपरि मुनि सांगे 'राज्य यांचें अयोध्ये ।
कुमर दशरथाचे, वीर हे चंड योद्धे ॥
दिनकर कुळ यांचें शिष्य होती वसिष्ठा ।
करणि रघुपतीची आइकें श्रीवरिष्ठा ॥ ३७ ॥

रक्षिला मख रघूमत्तें वरा । ताटिका उडविली दिगंतरा ॥
मूळपत्र तुमचें विलोकिलें । म्यां तदा शुभ मुहूर्त साधिले ॥
चालतां विपिन दाट लागलें । ते स्थळीं नवल वर्तलें भलें ॥
शापिलें निजकलत्र गौतमें । तारिलें पदरजें रघूत्तमें ॥

घेतां नाम समस्त काम पुरवी श्रीराम तो हा असे ।
आत्माराम गुणाभिराम भगवान् सर्वांतरीं जो वसे ॥
राया ! तारक ब्रह्म चिद्घन तुतें भेटावया आणिला ।
विष्णूचा अवतार सप्तम तुवां भाग्योदयें देखिला ॥ ३९ ॥

याचा बंधु सुमित्र यासम सखा शेषावतारी स्वयें ।
दोघे वीर पराक्रमी त्रिभुवनामध्यें बळी निश्चयें ॥
लीलाविग्रहि वेदनीतिमहिमा प्रत्यक्ष तो हा स्वभू' ।
ऐसें उत्तर आइकोनि हृदयीं संतोपला तो प्रभू ॥ ४० ॥

रावणाचें स्वरूप आणि भाषण:—

“वृक्षाच्या लांब शाखा कर चरण तसे पर्वतातुल्य माथा ।
दाहा तोंडें कराळें सचकित नृपती देखती लंकनाथा ॥
मोठा आजानुबाहो रजनिचरपती बोलता काय झाला ।
सालंकारें विराजे नवजलदतनू दर्प सर्वां नृपांला ॥ ८ ॥

दुर्गा गणेश गुह नंदि शिवःसभेला ।
कैलास ज्यां भुजबळें श्लथरूप केला ॥
तो मी धरीन पडतां नभ वामबाहें ।
कोदंड खंडिल असा नृप कोण आहे ? ॥ ९ ॥

ज्यां नाहीं नृप जिंकिला रणभुमीं तो कोण आला असे ?
माझा दर्प सुरेश्वरा भय बहू शेषासि माझें असे ॥
भूची घालिन मी घडी उतरडी पाडीन मीं स्वर्गिंच्या ।
पाताळें उकलूनि बांधिन सऱ्या लंकेचिया दुर्गिंच्या ॥ १० ॥
विद्या सत्कुळ भाग्यकीर्ति सकळीं संपन्न मी भूतळीं ।
दंडीं खंडिन ये क्षणीं भुजबळें कोदंड भूमंडळीं ॥
पाहा मत्पुरुषार्थ, गर्जुनि उभा राहोनि तेथें करी ।
तों सीता उपरीवरी सहसख्या पाहे सभा सुंदरी ॥११॥ सर्ग ४

सीतेनें केलेलें श्रीरामस्वरूपवर्णन;—

माथां कोटीर साजे जडित फणिमणी तेच दिक्प्रांत माजे ।
कर्णीं श्रीकुंडलीं जे माणि लखलखती ज्यांसि चंद्रार्क लाजे ॥
नाना रत्नीं विराजे पदक हृदयिचें रावणालागिं डाजे ।
ब्रीदांचा घोष गाजे निबिड पदयुगीं तोडरीं बद्ध राजे ॥२७॥

भाळीं त्रिपुंड्र करवर्तुळ दंड दोन्ही ।
सामुद्रिकीं सकळ लक्षणयुक्त चिन्हीं
आपाद मस्तक रुळे नव वैजयंती ।
कंठीं नवीन तुळसीस्रज भाग्यवंती ॥ २८ ॥

क्वणितकिंकिणी क्षुद्र घंटा नितंबीं ।
महारत्नकांची निनादें विलंबी ॥
करीं चाप नाराच तो देख दृष्टीं ।
शरीं अक्षयी बांधला तूण पृष्टीं ॥ २९ ॥

इंद्रनीळ मणिकीळ सांवळा । कांतिकोटि कुसुमेश पूतळा ।
कंकणें जडित मुक्तहस्तकीं । रत्नपुंज अवतंस मस्तकीं ॥ ३० ॥
निर्धनासि धन जेंवि सांपडे । जानकीस नयनीं तसा पडे ॥
अंतरीं मदनमूर्ति रंगली । बाह्य दृष्टिसि समाधि लागली ॥ ३१ ॥

सर्ग ४

रावणाचा धनुष्य उचलण्याचा प्रयत्नः---

'लंकेचा नृप कास घालुनि पुढें चापाकडे चालिला ।
भूभूळीं भुज मर्दिले भुजबळें मूर्धा बळें तोलिला ॥
देखे त्र्यंबकचाप कांप सुटला साटोप आरंभिला ।
दावी भाव सितावरास सकळी धैर्यें उभा राहिला ॥ ४ ॥

तें इंद्रवज्रासम तुल्य भासे । लंकेश भूधूलि भुजांसि घांसे ॥
स्पर्शें सिताच्या बळहीन केलें । कोदंड तोली मग धैर्य गेलें ॥४५॥
देशावरीं संचित फार केलें । तें तस्करीं द्रव्य हिरोनि नेलें ॥
झाला तसा न्याय दशाननातें । लज्जा नृपांची धिर दे मनातें ॥४६॥

ओढी चाप विसां भुजीं न गवसे तों मांडखुंटी वसे ।
जानू टेकुनि भूमिसी भुजबळें तोलूनि पाहातसे ॥
हालेना तिळमात्र, याउपरि तें कोदंड आलिंगिलें ।
पोटीं धाक न माय कंप सुटला गुल्फावरी आणिलें ॥ ४७ ॥
झोले तोले प्रतापें धरित विसभुजीं आणिलें जानुदेशीं ।
टेंका पृथ्वीसि ज्याचा शिथिल डळमळी नावरे साक्षपेंसी ॥

सर्वांगीं स्वेद दाटे धनुष उचललें वायु त्या साह्य झाला ।
त्याच्या झोकें उताणा क्षितिवरि पडला नाद धात्रीं विझाला
मेरूचा खचला कडा तडकला भूगोल ढांसाळला ।
सूर्याचे रथिचा तुरंग कचला ऐसा निधा दाटला ॥
नेणों मेघ गडाडिला समय तो लंकेश्वरा वर्तला ।
सीतामानस फार तांडव नटें नाचे महा हर्षला ॥ ४९ ॥
टाळी एकाचि पीटिली जनपदीं पौरांगना हांसती ।
झालासे कलका महा गलवला नादें दिशा घूमती ॥
सीता हास्य करीतसे गदगदां भीती प्रभू अंतरीं ॥
झालें विघ्न विटंबिलें सखि म्हणे श्रीरामचंद्रा वरीं ॥ ५० ॥
जैसें वज्र हिमालयावरि पडे कोदंड तैशापरी ।
भारें रावण खालता दडपला मुद्रा जडे खेचरी ॥
तोंडीं रक्तहि धूलि त्यांत भरली आरक्त झाली तनू ।
चक्रन्याय उरोदरावरि फिरे वज्रोपमा तें धनू ॥ ५१ ॥
ज्या चापें त्रिपुरें विशाळ नगरें निर्दाळिलीं शंकरें ।
तें क्रोधें करिं घेउनी उचलितां दुर्विघ्न झालीं पुरें ।
रक्ताच्या उलट्या वमे भडभडां प्राणांत आरंभिला ।
तेव्हां त्या जवळी प्रधान निखरा देखोनि धाविन्नला ॥ ५२ ॥

सीतास्वयंवरावर पुष्कळ मराठी कवींनीं कविता केली आहे, त्या सर्वांत वरील प्रसंगाचें वर्णन विठ्ठलकवीच्या इतकें दुसऱ्या कोणत्याही कवीस साधलेलें नाहीं.

३. रुक्मिणीस्वयंवर काव्याचे सर्ग ७ व श्लोकसंख्या ३९३ आहे. या काव्यांत वृत्तवैचित्र्य व चित्रकाव्य अधिक आहे, तरी पण एकंदर काव्य चांगलें उतरलें आहे.

रुक्मिणीची पत्रिका घेऊन सुदेव ब्राह्मण द्वारकेंत गेले, त्या प्रसंगाचें वर्णन व श्रीकृष्णसुदेवसंभाषणः—

केला प्रवेश नगरांत जवें सुदेवें।
बोले अपूर्व रचिलें स्थल वासुदेवें॥
सिंहासनीं मदनमूर्ति उदार जेथें।
आला त्वरें करुनियां द्विजराज तेथें॥ ४७
चित्स्वरूप नटलें जनीं वनीं।
नाठवे हरिविणें दुजें मनीं॥
देखिली मदनमूर्ति लोचनीं।
जे उदार भवबंधमोचनी॥ ४८॥
देखिला द्विज सुदेव माधवें।
हर्षयुक्त अति दीनबांधवें।
गौरवें बसविलें निजासनीं।
लाभ तो बहुत मानिला मनीं॥ ४९॥
आपणासि सुर जेंवि पूजिती।
अर्चिला द्विज तसा बऱ्या रिती॥
भोजनादि उपभोग देउनी।
बैसले स्थळ विविक्त सेवुनी॥ ५०॥
धरूनि हस्तांबुज वाग्विलासें।
पृच्छा किजे मंद उदार हास्यें॥
कथा निवेदा सुरसा अपूर्वा।
सुवृत्त जाणा 'विपरीतपूर्वा'॥ ५१॥
अहो सुदेवा परिसा द्विजोत्तमा।
विचारितां ब्राह्मण देवसत्तमा॥

सर्वांगीं स्वेद दाटे धनुप उचललें वायु त्या साह्य झाला ।
त्याच्या झोकें उताणा क्षितिवरि पडला नाद धात्रीं विझाला
मेरूचा खचला कडा तडकला भूगोल ढांसाळला ।
सूर्याचे रथिचा तुरंग कचला ऐसा निधा दाटला ॥
नेणों मेघ गडाडिला समय तो लंकेश्वरा वर्तला ।
सीतामानस फार तांडव नटें नाचे महा हर्षला ॥ ४९ ॥
टाळी एकाचि पीटिली जनपदीं पौरांगना हांसती ।
झालासे कलका महा गलवला नादें दिशा घूमती ॥
सीता हास्य करीतसे गदगदां भीती प्रभू अंतरीं ॥
झालें विघ्न विटंविलें सखि म्हणे श्रीरामचंद्रा वरीं ॥ ५० ॥
जैसें वज्र हिमालयावरि पडे कोदंड तैशापरी ।
भारें रावण खालता दडपला मुद्रा जडे खेचरी ॥
तोंडीं रक्तहि धूलि त्यांत भरली आरक्त झाली तनू ।
चक्रन्याय उरोदरावरि फिरे वज्रोपमा तें धनू ॥ ५१ ॥
ज्या चापें त्रिपुरें विशाळ नगरें निर्दाळिलीं शंकरें ।
तें क्रोधें करिं घेउनी उचलितां दुर्विघ्न झालीं पुरें ।
रक्ताच्या उलट्या वमे भडभडां प्राणांत आरंभिला ।
तेव्हां त्या जवळी प्रधान निखरा देखोनि धाविन्नला ॥ ५२ ॥

सीतास्वयंवरावर पुष्कळ मराठी कवींनीं कविता केली आहे, त्या सर्वांत वरील प्रसंगाचें वर्णन विठ्ठलकवीच्या इतकें दुसऱ्या कोणत्याही कवीस साधलेलें नाहीं.

३. रुक्मिणीस्वयंवर काव्याचे सर्ग ७ व श्लोकसंख्या ३९३ आहे. या काव्यांत वृत्तवैचित्र्य व चित्रकाव्य अधिक आहे, तरी पण एकंदर काव्य चांगलें उतरलें आहे.

रुक्मिणीची पत्रिका घेऊन सुदेव ब्राह्मण द्वारकेंत गेले, त्या प्रसंगाचें वर्णन व श्रीकृष्णसुदेवसंभाषणः—

केला प्रवेश नगरांत जवें सुदेवें।
बोले अपूर्व रचिलें स्थल वासुदेवें ॥
सिंहासनीं मदनमूर्ति उदार जेथें।
आला त्वरें करुनियां द्विजराज तेथें ॥ ४७
चित्स्वरूप नटलें जनीं वनीं।
नाठवे हरिविणें दुजें मनीं ॥
देखिली मदनमूर्ति लोचनीं।
जे उदार भवबंधमोचनी ॥ ४८ ॥
देखिला द्विज सुदेव माधवें।
हर्षयुक्त अति दीनबांधवें।
गौरवें वसविलें निजासनीं।
लाभ तो बहुत मानिला मनीं ॥ ४९ ॥
आपणासि सुर जेंवि पूजिती।
अर्चिला द्विज तसा बऱ्या रिती ॥
भोजनादि उपभोग देउनी।
बैसले स्थळ विविक्त सेवुनी ॥ ५० ॥
धरूनि हस्तांबुज वाग्विलासें।
पृच्छा किजे मंद उदार हास्यें ॥
कथा निवेदा सुरसा अपूर्वा।
सुवृत्त जाणा 'विपरीतपूर्वा' ॥ ५१ ॥
अहो सुदेवा परिसा द्विजोत्तमा।
विचारितां ब्राह्मण देवसत्तमा ॥

परंतु त्याची स्थिति भिन्न देखणें ।
सुवृत्त वंशस्थ वदेल लक्षणें ॥ ५२ ॥

असंतुष्ट त्या इंद्र तोषूं शकेना ।
गृहीं कामधेनू तयाचे दुभेना ॥
अहंकार ज्याहीं असे दग्ध केला ।
स्वयें त्याचिया दर्शनाचा भुकेला ॥ ५३ ॥
असंतुष्ट संपत्ति एका असोनी ।
सदां तुष्ट लक्ष्मी कितेकां नसोनी ॥
समाधान चित्तीं जयाच्या सुदेवा ।
असे वंद्य त्याची करीं पादसेवा ॥ ५४ ॥
तुह्मीं आपुलें कार्य सांगा सुदेवा ।
पुरी कोण ? कोठूनि आलेति देवा ? ॥
अटव्यें वनें चालतां भागलेती ।
किमर्थ द्विजा या स्थळा पातलेती ? ॥ ५५ ॥

सर्ग पहिला.

ह्या उताऱ्यांतील श्रीकृष्णोक्तींत ग्रथित केलेले विचार किती उदात्त आहेत ! सुदेवाचा आदरसत्कार करण्यांत श्रीकृष्णानें दाखविलेली विनम्रता व प्रदर्शित केलेले विचार पाहून, त्याच्या स्वभावाचें समर्पक चित्र रेखाटण्यांत कवीनें बरीच कुशलता व्यक्त केली आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. केवळ चित्रकाव्यापेक्षां विठ्ठलकवीच्या कवितेंत खरें कवित्वही पुष्कळ आढळतें, असें मी पूर्वीं म्हटलें आहे, त्याचें हें एक उदाहरण आहे.

रुक्मिणीपत्रिकेंतील कांहीं श्लोक पुढें दिले आहेत:—

सुवर्णाचें पत्राक्षर कमलपत्राक्ष उकली ।
प्रभा काश्मीराची द्युति हिमकराची प्रगटली ॥
उडंगें आकाशीं रजनि अवकाशीं उगवती ।
तशा बिंदू रेखावळि घन सुरेखा मिरवती ॥ १ ॥
अनंता श्रीकृष्णा नमन तव साष्टांग चरणा ।
अनंत ब्रह्मांडोदरपति परित्राणकरणा ॥
मुकुंदा मंदारा यदुपति उदारा गुणनिधी ।
करी वेदोनारायण भजन गंगाधर विधी ॥ २ ॥
घनश्यामा रामा भुजगपति पर्यंकशयना ।
यजी पद्मा वक्षावरि तवपदें पद्मनयना ।
पुनः प्रेमा नामामृत इश विपस्ताप नुरवी ।
रसीक व्यासर्पी सहजचि वदे वर्धन कवी ॥ ३ ॥
तुझ्या सौंदर्याचा त्रिभुवनिं ठसा एक न दिसे ।
पदप्राप्तीसाठीं सुरवर महेंद्रादिक पिसे ॥
त्रितापध्वंसेति श्रवण करितां कीर्तिगरिमा ।
कळेना वेदांता स्तुतचरणराजीवमहिमा ॥ ४ ॥
मुकुंदा ! जो रूप द्रविण कुळ विद्या वय धरी ।
नरांमध्यें पंचानन न वरि या कोण नवरी ? ॥
न पावेति व्रीडावति कुलवती उत्कट तपें ।
वराका मी तेथें तुज वरिन कैसेनी पडपें ? ॥ ५ ॥
मनोवाचाकाया हरि ! तुझिच जाया भरंवसा ।
तुझ्या अर्धांगातें वरिल दमघोषात्मज कसा ॥
मृगेंद्राच्या लाभें फळ कवळु गोमायु तरुणा ।
घडेना कल्पांतीं मुनिजनपरित्राणकरणा ॥ ६ ॥

दयाळा ! माझें त्वां भजनिं मनसर्वस्व हरिलें ।
निरातंका चैद्या गमन परवां लग्न धरिलें ॥
न येणें एकाकी प्रगट गुज कोणा न करणें ।
समारंभें यावें जंव न पडती सूर्यकिरणें ॥ ७ ॥
खटाटोपें यावें नृप मगध चैद्यादि मिळती ।
प्रतापें जिंकावे रसनवकुळींचे क्षितिपती ॥
उद्यां लग्नाआधीं मथुनि रणसिंधू बळनिधी ।
बळात्कारें पाणिग्रहण करणें राक्षसविधी ॥ ८ ॥
समाधानें पाणिग्रहण न घडे कौंडिणपुरीं ।
किजे लग्न द्वारावतिस विधिनें मंगळतुरीं ॥
न मानी आशंका मज म्हणसि अंतःचरपुरें ।
बलात्कारें नेतां खवळतिल बंधू उपवरें ॥ ९ ॥
पित्यानें गोपाळा वचन शिशुपाळा न दिधलें ।
न चाले ताताचें करि निजसुताचें म्हणितलें ॥
परश्वींचे लग्नीं स्वप्रभु सुहृद संलग्न दिवसीं ।
उद्यां येईं नेईं तुज वरिन येईन सरसी ॥ १० ॥
कृपापारावारा ! कुकुरपरिवारा सजुनियां ।
त्वरें पावें चिंतामणि ! भुवनचिंता त्यजुनियां ॥
महालक्ष्मीनाथा ! करिं मज अनाथावरि दया ।
नुपेक्षीं दातारा ! चुकविं दुरितारातिविषया ॥ ११ ॥
रमाकांता ! झाली लिखित लिहितां तांतडि मला ।
नसे शाई दौती प्रचुर मज संदेह गमला ॥
कळावें ना कोण्हा हितगुज विचारूनि वहिलें ।
कनिष्ठेनें नेत्रांजनघनरसें पत्र लिहिलें ॥ १२ ॥

सर्ग दुसरा.

खालील वृत्तवैचित्र्य पहा:—

देशपरत्वें प्राकृत लेणें ।
भूषणिं रत्नें द्योतत तेणें ॥
केवळ पद्मा भूभुजबाळा ।
शोभित कंठीं चंपकमाळा ॥ २७ ॥
अंगुलीस नवरत्नमुद्रिका ।
शोभवी नृपसुता वितंद्रिका ॥
भूषणें चरणिंचीं कलस्वरें ।
गर्जती मणियुतें घनस्वरें ॥ २८ ॥
जांबूनद लेणीं ल्याली हरिणाक्षी ।
व्यंजनस्तन दोनी बिंबाधर साक्षी ॥
शोभे मदनाची माता नृपबाला ।
हारावलि कंठीं मध्यें मणिमाला ॥ २९ ॥
मुद राखडी प्रभुत मंडित वेणी ।
उभि राहिली जडित लेउनि लेणी ॥
करकंणादि रशना विहारिणी ।
नृपनंदिनी मधुर मंजुळवाणी ॥ ३० ॥
अनंग जाळिला भवें मग स्वभूसि वैभवें
सुतप्रदान शांभवें दिलें तया मनोभवें ॥
शरासनीं स्वसंभवें क्षुर प्रयोजिलें जवें ।
प्रपंचचामरा जवें विजीति दूत लाघवें ॥ ३१ ॥
भिल्लीमार्गें लागला शूळपाणी ।
वृंदाकामें व्यापिला चक्रपाणी ॥
रंध्रें देहीं लाधला वज्रपाणी ।
ऐसा योद्धा पुष्पकोदंडपाणी ॥ ३२ ॥

स्मरशरें भिनले परिसा रथी ।
गजतुरंगम यापरि सारथी ॥
मदनमूर्च्छित ते जगतीतळीं ।
अजपरात्पर तेज गती तळीं ॥ ३३ ॥
तुरें शंख भेरी नफेऱ्या तुसारे ।
वळें गर्जती वाजवीती तुतारे ॥
दिशाचक्र धूमांधकारें दिसेना ।
भ्रमें भ्रांत निभ्रांत चैद्यादि सेना ॥ ३४ ॥

बहुतेक संस्कृत वृत्तांचा असा उपयोग दुसऱ्या कोणत्याही मराठी कवीनें केलेला नाहीं. वृत्तशास्त्रावर रामजोशी व निरंजनमाधव यांचे स्वतंत्र ग्रंथ आहेत; पण त्या शास्त्रांतील सगळयाच वृत्तांचा उपयोग त्यांनीं आपल्या ग्रंथांत केलेला नाहीं. विठ्ठलकवीच्या काव्यांत जशीं बहुतेक संस्कृत वृत्तें आढळतात तशीं शुद्ध मराठी वृत्तें मुळींच आढळत नाहींत. दिंडी, अभंग, ओवी, साकी इत्यादि वृत्तें विठ्ठलकवीनें उपयोगांत आणिलीं नाहींत, याचें कारण, त्यास आपली कविता संस्कृत पद्धतीवर रचावयाची होती, हेंच असावें असें वाटतें. रुक्मिणीस्वयंवर काव्यांतले आणखी वेंचे देण्यास स्थलावकाश नाहीं. हें काव्य बरेंच रसाळ आहे व तें वाचकांनीं एकवार अवश्य वाचावें, अशी शिफारस करून पुढें वळतों.

२. 'विद्वज्जीवन' हें काव्य फार सुरस आहे. यांत श्रीकृष्णलीलेचें सुंदर वर्णन केलें आहे. याचे उल्लास ७ व श्लोक २६१ आहेत. साहित्यशास्त्र, चित्रकाव्य व केवळ काव्य ह्या तीन्ही दृष्टींनीं हें काव्य अवश्य वाचण्यासारखें आहे. अलंकारिक भाषा, सुंदर व कोमल शब्दयोजना, वृत्तवैचित्र्य, कृष्णलीलावर्णन, कवीचा भक्तिपूर्ण प्रेमळपणा यांच्या योगानें सदर काव्यास अत्यंत सौंदर्य प्राप्त झालें आहे. रसिकांनीं हें काव्य अवश्य अवश्य वाचावें. अशा प्रकारचें काव्य मराठींत दुसरें नाहीं. नमुन्यासाठीं थोडेसे श्लोक येथें देतों:—

## श्रीकृष्णमूर्तिवर्णन.

कमलनयन कान्हा जो उभा कुंजशाई ।
मुरलि मधुर नादें जो वळी लक्ष गाई ॥
शतमिह रुचि लोपे गोपिका मध्यभागीं ।
हृदयिं धरिं मना तूं लुब्ध जो रासरंगीं ॥ १ ॥
हरित वसन कांसे कोटि विद्युत्प्रकाशें ।
नटवर वपु भासे रासरंगीं उभासे ॥
गवळणि गुण वाचे वर्णिती माधवाचे ।
हरित मन जनाचें मालिनीमाजि नाचे ॥ २ ॥
कर्णीं रत्नमणी मृगांक तरणी तेजोप मोठें गणी ।
केयूरें रमणीय कौस्तुभमणी कांसे झणत्किंकिणी ॥
सौवर्णाभरणीं मनोहरमणी जो शोभला भूषणीं ।
तो खेळे तरुणीसवें शिशुगणीं गोपाळचूडामणी ॥ ३ ॥
माया पिच्छ जटीं विचित्र मुगुटीं रत्नें महागोमटीं ।
कांसे पीत धटी मणी मणगटीं मूर्ति स्वयें धाकुटी ॥
वंशी ओष्ठपुटीं सुरेख भ्रुकुटीं खेळे कलिंदीतटीं ।
भक्तीं ते प्रगटी, अभक्त निवटी स्वस्थान दे शेवटीं ॥ ४ ॥
कांसे सोनसळा दिसे झळफळा रंगीत माळा गळां ।
भाळीं पीत टिळा नवीन विपुळा माळा गळां पुष्कळा ॥
कानीं पद्मकळा प्रफुल्ल सकळां गंधें सुगंधागळा ।
खेळे पद्मदलायताक्ष सकळा वेष्टीत कामाकुळा ॥ ५ ॥

मंगलाचरणः—

संध्यारागपरागचर्चित वपू आरूढ जो उंदिरीं ।
भाळीं चंद्र विशाल वर्ण धवला चंद्रार्क नेत्रोदरीं ॥

चक्रांभोजगदांकुशादि धरिले हे आयुधें चौंकरीं ।
ध्यातां नाभलगांविंचा गणपती निर्विघ्न भक्तां करी ॥ ६ ॥

पाशकार्मुकशरांकुशासनीं ।
जे धरी दुरित घोर शासनीं ॥
ते भजोनि शिखिवाहन शारदा ।
वेदशास्त्रजननी विशारदा ॥ ७ ॥

सद्गुरूसि शरणागत जावें ।
तो म्हणेल तितकें समजावें ॥
तेंचि बीज हृदयांत जपावें ।
साधकें मग तयांत लपावें ॥ ८ ॥

जो गोवर्धनपर्वतातळवटीं वेष्टीत गोपावळी ।
ज्याचे वेणुरवें हळाहळ निवे दुष्टांसि जो निर्दळी ॥
ज्यातें वल्लवयोषिता मधुवनीं आलिंगिती चुंबिती ।
तो कल्याण कवींद्र विठ्ठल म्हणे हो श्रोतयां श्रीपती ॥९॥

वरील सहाव्या श्लोकांत ज्याचा उल्लेख आहे, तो 'नाभलगांव' बीड गांवापासून सात आठ कोशांवर लिंब नामक जो गांव आहे, तोच असावा. येथील गणपति 'लिंब्याचा गणपति' या नांवानें प्रसिद्ध आहे.

पुढील श्लोकांत, स्वतःसंबंधानें कविराज विठ्ठल म्हणतातः—

छंदज्ञान निघंट नाटक रसालंकार काव्यक्रिया ।
जो जाणे गुरुदेवतावरकृपा सारस्वप्रक्रिया ॥
त्याचें शुद्ध कवित्व मान्य चतुरांमध्यें सभामंडळीं ।
वर्णी विठ्ठलदास तो कवि जगद्वंद्य स्वयं भूतळीं ॥ १२ ॥

वाग्देवी ! उदरानिमित्त सदरा म्यां पाहिल्या सुंदरा ।
पैं नोहे जठराग्निशांति विदुरा आला कलौपाहरा ॥
गर्भांधा बधिरापुढें श्रम पुरा तूं पावलीसी गिरा ।
हा माते अपराध तो कविवरा सर्व क्षमावा बरा ॥ १३ ॥
माझी स्फूर्ति सरस्वती मज म्हणे ' बाळा कवी विठ्ठला ।
मद्वत्सा श्रमलासि ऐक सखया सांगेन जें मी तुला ॥
झाला ताप शमेल या हरिकथापीयूषपानें तुझा ।
भक्ताचे पुरवी मनोरथ हरी संदेह नाहीं दुजा ॥ १४ ॥
श्रीसी गुप्त हरी सुधाब्धिजठरीं गेलासि मेरूदरीं ।
धाके शीत हरी हिमालयगिरीं चंद्रप्रभा अंबरीं ॥
झाला क्षीरसरित्पती शिव तरी दिग्वासलीला धरी ।
दाते यापरि वैखरी स्तुति करी भूभार पृथ्वीवरी ॥ १५ ॥
जिव्हे ! तूं नटवी तुझे अनुभवीं श्रीमंत सन्मानवी ।
होती लुब्ध परंतु एकहि तुला कोणीच ना गौरवी ॥
सत्कीर्ती बरवी जगांत उरवी व्युत्पन्नता बोलवी ।
सत्संगें नटवी पवित्र पदवी देशील ज्या सत्कवी ॥ १६ ॥

व्यर्थ कां श्रमसि साधका मना ।
सोडिं हे विषयभोगकामना ॥
द्रव्यलोलुप धरी जसा धना ।
तूं करीं हरिपदाब्जसाधना ॥ १८ ॥

यत्नें कल्पलते सुरायपुरिचें आळें बरें बांधिलें ।
साक्षेपें सुरधेनुच्या पयरसें म्यां सर्वदा सिंचिलें ॥
ते वल्ली रुइचीं फुलें प्रसवली झाली निराशा मना ।
हे वांच्छा पुरवील कोण कविची श्रीपांडुरंगाविना ॥ १९ ॥

विद्वज्जीवन, उल्लास १.

— — —

वरील श्लोकांवरून कवीच्या सांपत्तिक व मानसिक स्थितीसंबंधानें बरीच कल्पना करितां येते. छंदज्ञान, निघंट, रस, अलंकार, काव्य-क्रिया, व्याकरण इत्यादि विषयांशीं कवीचा फार परिचय असल्यामुळें, तो मोठा विद्वान् होता असें दिसतें. त्याचें ' शुद्ध कवित्व ' तत्का-लीन चतुरसभामंडळांत मान्य होतें व त्यामुळें कवीस ' जगद्वंद्यता ' प्राप्त झाली होती. कवींद्र, व्युत्पन्न, कविराज इत्यादि विशेषणें कवीनें आपल्या नांवामागें आपल्या काव्यांत सर्वत्र लाविलीं आहेत. कवीचें रासक्रीडा हें काव्य शके १५३६ त पूर्ण झालें. त्यानंतर बरींच वर्षें कवीनें व्यापारउद्योग केला असावा, पण त्यांत म्हणण्यासारखी द्रव्य-प्राप्ति न झाल्यामुळें व कवीची पत्नी वृद्धपणीं त्यास सोडून गेल्या-मुळें, ह्या सगळ्या संसारतापांतून मुक्त होण्याकरितां हरिगुणवर्णनाकडे कवीनें आपलें लक्ष वळविलें असावें. ' माझ्या कवित्वाची श्रीमंत लोक स्तुति करितात, पण ( यथाशक्ति द्रव्य देऊन ) माझा गौरव करण्याची बुद्धि मात्र एकासही होत नाहीं ' असे उद्गार कवीनें काढिले आहेत. " कल्पलतेस रायपुरीचें आळें बांधून आणि कामधे-नूचें दूध घालून मी तिची जोपासना केली, पण तिला शेवटीं रुईचीं फुलें येऊन माझी निराशा मात्र झाली, अशा स्थितींत श्रीपांडुरंगावां-चून माझी इच्छा पूर्ण करण्यास कोण समर्थ आहे ? " ह्या उद्गारां-वरून, कवीनें ज्या मनुष्यासाठीं व्यापारउद्योगाचे इतके परिश्रम केले, तो मनुष्य शेवटीं मूर्ख व दुष्ट निघाला असावा, असें वाटतें.

विद्वज्जीवन हा ग्रंथ श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधाधारें कवीनें रचिला हें पुढील श्लोकांवरून स्पष्ट होतें:—

ज्या नामें शतकोटि दग्ध दुरितें जैसीं तृणें पावकें ।
ज्या नामें गणिकेसि मोक्ष वरिता यानें विमानादिकें ॥
ज्या नामें तरला अजामिळ चमत्कारास तो पावला ।
जेणें उद्धरिला गजेंद्र मजही त्याचाचि लागो ळळा ॥२६

विद्वज्जीवन पुण्यपावन कथा वैय्यासकें आपणें ।
श्रीमद्भागवतीं परीक्षितिप्रती सांगीतली मी म्हणे ॥
जी गीर्वाण महापुराण दशमोस्कंधोत्तराची टिका ।
भापा प्राकृत हे मराष्ट्र कविता व्युत्पन्न हो आइका ॥ २७

श्रीमद्रामचरित्र तेंचि परिसा मंदाकिनी मद्दिरा ।
श्रीमत्कृष्णकथा सुनील यमुना आली त्रिवेणीतिरा ॥
श्रीमत्काव्य सरस्वती प्रगटली श्रीविठ्ठलाची कळा ।
श्रीमद्रुक्मिणिकांत दैवत भजा ग्रंथ प्रयागागळा ॥ २८ ॥

उल्लास पहिला.

श्रीराम आणि श्रीकृष्ण यांची तुलना कवीनें केली आहे. ती अत्यंत सुरस आणि अवश्य वाचनीय आहे:—

श्रीरामें विपिनांत अंहमलिना स्त्री ताटिका कल्पना ।
श्रीकृष्णें सदनांत दैत्यललना संहारिली पूतना ॥
काकुत्स्था रणिं नागपाश जडले, जैसा फणी चंदना ।
मातेनें मनमोहनासि उखळीं केलें कटीबंधना ॥ ३२ ॥

रामें उद्धरिली शिला पदरजें जी शापिली गौतमें ।
कृष्णें वेणुरवें स्वयें उठविली विप्रांगना विक्रमें ॥
रामें उद्धरिली द्रुमप्रियतमा भावें अटव्यांतरीं ।
कृष्णें पैं यमलार्जुनासि चरणें उद्धार केला घरीं ॥ ३३ ॥

रामें प्रस्तर तारिले कपिवरें हे ख्याति रामायणीं ।
गोगोवर्धन माधवें उचलिला गोगोपसंरक्षणीं ॥
रामें रावणकुंभकर्ण समरीं कैसेच निर्दाळिले ।
कृष्णें चाणुर मल्ल कंस मथुरेमध्यें जिवें घेतले ॥ ३४ ॥
कांतारीं रघुनाथ रोदन करी सीता न देखे पुढें ।
दैत्यारी नवनीत मागत रडे, नेणेति गौळी मुढें ॥
श्रीरामें दशकंधरासि समरीं चिद्रूपडें दाविलें ।
श्रीकृष्णें निज विश्वरूप नयनीं पार्थाचिया घातलें ॥ ३५ ॥
काकुत्स्थासि कलत्र एक हरितें सोळा सहस्रा सती ।
लंकादान विभीषणा, मधुपुरी श्रीउग्रसेनाप्रती ॥
वैकुंठासि रघुत्तमें सकळही नेली अयोध्यापुरी ।
कृष्णें द्वारवतीसि सर्व मथुरा नेली क्षणाभीतरीं ॥ ३६ ॥
रामें राक्षस मारिले यदुवरें संहारिलें दानवां ।
श्रीरामें मृत वानरां उठविलें, कृष्णें व्रजीं वल्लवां ॥
श्रीरामें कपिपुंगवांसह वनीं क्रीडा करी काननीं ।
कृष्णें गोपसमागमें विचरतो वृंदावना जाउनी ॥ ३७ ॥
रामें विप्रसुता अकाळमरणापासूनि संरक्षिलें ।
गोपाळें यमलोक शोधुनि गुरूपुत्राप्रति आणिलें ॥
श्रीरामें दशकंठ मारुनि सुरां बंदींतुनी सोडिलें ।
श्रीकृष्णें पितरांसि कंसदनापासूनि दूराविलें ॥ ३८ ॥
रामें दिव्य वनीं विहार करितां सीता सवें गोरटी ।
कृष्णें रासविलास गौळणिसवें केला कलिंदीतटीं ॥
रामें त्यागिलि मैथिली लुटविलीं अंतःपुरें माधवें ।
दोघे तारक पूर्ण ब्रह्म जन हो ध्यावे गिरागौरवें ॥ ३९ ॥

विठ्ठल कवीची कविता सरस, संस्कृत आणि प्रसन्न अशी आहे; चित्रकाव्य म्हणून तिची योग्यता कमी आहे, असें कांहीं लोक समजतात, पण मला तसें वाटत नाहीं; व आतांपर्यंत दिलेले उतारे वाचून वाचकांचीही विठ्ठल कवीच्या काव्यासंबंधाची कल्पना माझ्या मतास अनुकूल अशीच होईल, याबद्दल मला शंका वाटत नाहीं. विठ्ठलकृत विद्वज्जीवन काव्य फार सुंदर आहे, तें वाचकांनीं अवश्य वाचावें अशी विनंति करून, कवीच्या इतर काव्यांशीं वाचकांचा थोडासा परिचय करून देतों.

४. बिल्हणचरित्र. या काव्याचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. यांतील कथाभाग असा आहे:—पूर्वी काश्मीर देशांत प्रवरपूर नगरानजीक खोनमुख नामक एक गांव होतें; तेथें गोपादित्य महिपतीनें खिस्तापूर्वी चवथ्या शतकांत धर्मशील असे कांहीं कौशिक गोत्री ब्राह्मण मध्यदेशांतून आणविले. ह्या ब्राह्मणांत मुक्तिकलश नामक एक मोठा विद्वान् ब्राह्मण होता. त्याचा पुत्र राजकलश यास ज्येष्ठकलश या नांवाचा पुत्र झाला. तो मोठा व्युत्पन्न असून, पातंजल महाभाष्यावर त्यानें एक टीका केली आहे. ह्या ज्येष्ठ कलशास तीन पुत्र होते. इष्टराम, बिल्हण व आनंद. हे तिघेही पुत्र फार सुंदर आणि विद्याकलासंपन्न होते. त्यांची तत्कालीन सत्कवींत गणना होत असे. ह्या तिघां पुत्रांपैकीं बिल्हण हा आपल्या तारुण्यावस्थेंत, पुष्कळ देश पाहण्याच्या हेतूनें, काश्मीर देशांतून बाहेर पडला. मथुरा, वृंदावन, कनोज, काशी, प्रयाग, धार, सोमनाथपट्टण, सेतुबंध इत्यादि स्थलें पाहून व त्या त्या ठिकाणच्या विद्वत्समूहाकडून सन्मान मिळवून, दक्षिणेंतील चलुक्यांची राजधानी कल्याण शहर, तें पाहण्यासाठीं बिल्हण तेथें गेला. तेथें कर्नाटकाचा राजा कुंतलेंदु त्रैलोक्य-

मल्ल व त्याचा पुत्र विक्रमांकदेव यांनीं त्यास पुष्कळ द्रव्य देऊन 'विद्याधिपति' ही पदवी सन्मानपूर्वक अर्पण केली. ह्या ठिकाणीं राहून बिल्हणानें 'विक्रमांकदेवचरित' या नांवाचें एक महाकाव्य रचिलें. 'बिल्हणचरित्र' नामक खंडकाव्यांत या कवीसंबंधानें जी माहिती मिळते ती येणेंप्रमाणें:—

"गुर्जर देशाचा राजा वीरसिंह हा अणहिल्लपट्टण नगरींत राज्य करीत असतां, त्याला 'शशिलेखा' नामक एक कन्या झाली. ती मुळचीच फार सुंदर होती, व तारुण्यदशा प्राप्त झाल्यावर तर तिचें सौंदर्य फारच खुलत चाललें. मुलीच्या शिक्षणासंबंधानें वीरसिंह नेहमीं चिंताकुल असे. पुढें एके दिवशीं काश्मीरचा बिल्हण कवि त्या नगरांत आला असतां, राजपुरोहितांनीं त्यास राजाच्या भेटीस नेलें. बिल्हणाचें अनुपम विद्याकौशल्य पाहून व त्याची मधुर कविता ऐकून राजानें त्यास पुष्कळ द्रव्य दिलें आणि आपली कन्या शशिलेखा हिच्या अध्यापकाच्या जागीं त्याची प्रार्थनापूर्वक योजना केली. तिनेंही आपला गुरु बिल्हण याची शुश्रूषा करून मनापासून अभ्यास केला व थोड्याच दिवसांत अनेक विद्याकलांचें ज्ञान संपादन केलें. पुढें एके दिवशीं, पुष्पमालादिकांचा घमघमाट सुटला आहे, अशा रम्य महालांत बिल्हणानें शशिलेखेस कामशास्त्राचें शिक्षण देण्यास प्रारंभ केला असतां, बिल्हणाचें रूप, यौवन, विद्या, विनय, इत्यादिकांनीं मोहित झालेल्या शशिलेखेचें प्रेम त्या कविवरावर जडलें व नाना प्रकारच्या शृंगारचेष्टांनीं त्याचें चित्त तिनें आकर्षित केलें. कवीनेंही काममोहित होऊन, गुप्त रीतीनें गांधर्वविधीप्रमाणें तिचें पाणिग्रहण केलें. पुढें, त्या उभयतांचे पुष्कळ दिवस मोठ्या सुखांत गेले. कांहीं दिवसांनीं, संभोगचिन्हांकित राजकन्येची एकंदर पालटलेली

स्थिति पाहून साशंक झालेल्या द्वारपालांनीं तो सगळा गुप्त प्रकार समजून घेऊन राजास निवेदन केला. राजानें बिल्हणास सुळावर चढविण्याचा एकदम हुकूम केला. त्याप्रमाणें मारेकऱ्यांनीं त्यास वधस्थानीं आणून मृत्यूपूर्वी आपल्या आराध्य देवतेचें स्मरण करण्यास सांगितलें. परंतु बिल्हणाचें मन त्या राजकन्येवर अत्यंत लुब्ध असल्यामुळें त्यानें मृत्यूची बिलकुल पर्वा केली नाहीं, व उलट 'अद्यापि तां कनकचंपकदामगौरीम्' इत्यादि पन्नास श्लोकांत शशिलेखेच्या सौंदर्याचें व तिच्याशीं केलेल्या शृंगारचेष्टांचें वर्णन केलें. पुढें ही गोष्ट राजाच्या कानीं गेल्यावर, आपल्या कन्येच्या ठायीं बिल्हणाचें अतिशय प्रेम आहे हें लक्षांत घेऊन, व राणी, मंत्री व प्रजाजन यांच्या विनंतीकडे लक्ष्य देऊन, त्यानें बिल्हणास आपली मुलगी दिली. नंतर मोठ्या वैभवांत व शशिलेखेच्या समागमांत बिल्हणानें आपलें आयुष्य घालविलें व मोठमोठीं अनेक सुंदर काव्यें रचून आपली कीर्ति अजरामर करून ठेविली. हा सगळा अत्यंत मनोहर कथाभाग बिल्हणचरित्र काव्यांत वर्णिला आहे. त्याचें प्राकृत भाषांतर विठ्ठलकवींनीं केलें आहे. हें काव्य फारच सुंदर आहे व तें साग्र वाचल्याशिवाय त्याचें माधुर्य कळणें शक्य नाहीं. तथापि थोडेसे श्लोक पुढें दिले आहेत, त्यांवरून सदर काव्याच्या स्वरूपाची कांहींशी कल्पना वाचकांस होईल असें वाटतें.

### वसंततिलक वृत्त.

तो बोलला वचन चंद्रकले सुशीले ।
जाली तुला सकळ व्युत्पति राजबाळे ॥
नाहीं तुला शिकविलें स्मरशास्त्र पाहीं ।
अभ्याभितां विदित होइल सर्व तेंही ॥ १९ ॥

ते बोलतां परम सद्गद मंद वाचे ।
पादारविंद धरिलें कवि बिल्हणाचें ॥
तें कामशास्त्र तुमचेनि मुखें वदावें ।
त्यानंतरें स्वनगराप्रति शीघ्र जावें ॥ १६ ॥
शोभे निकें तनु तिचें महके सुगंधें ।
कर्पूरधूपमणिमंडित पाचबंधें ॥
शृंगारिलें लखलखाट दिसे दिगंतीं ।
सौदामिनी लवत तेज पडे दिगंतीं ॥ १७ ॥
शृंगारकानन गमे निज मन्मथाचें ।
देखोनि चित्त रमलें कवि बिल्हणाचें ॥
आमंत्रिला त्वरित मन्मथ तो शरीरीं ।
आरंभिलें 'रतिरहस्य' म्हणे विचारीं ॥ १८ ॥
नानासनें नयनवर्तन हास्यगोष्टी ।
कंदर्पसिंधु विपरीत कला प्रतिष्ठी ॥
हें सांगतां परम व्याकुळ कामबाणें ।
जाली म्हणे विविध शास्त्र विधिप्रमाणें ॥ १९ ॥
हें देखुनी खवळलें मन आवरेना ।
होणार जाण सहसा लिहिलें टळेना ॥
दैवीं कळाघटित तेंच विचारिलेंसे ।
गांधर्व लग्न सदनीं मग लाविलेंसे ॥ २० ॥
यानंतरें खचित रत्नपलंग सेजे ।
क्रीडा करी प्रथम कामसुखासि लाजे ॥
आलिंगनीं दृढ तिला धरितांच झाडी ।
संघट्टनीं बहुत भी परि मी न सोडी ॥ २१ ॥

* * * *

तल्पीं सुगंध सुमनें मणिरत्नमंचीं ।
क्रीडा कुतूहल करी तनया नृपाची ॥ २४ ॥
पद्मानना बहुत भी मृगशावकाक्षी ।
मातंगकुंभयुगुलस्तनभार साक्षी ॥
रक्तप्रवालरुचिराधरबिंबशोभा ।
कुंदोपमा दशनपंक्ति हिरावली भा ॥ २५ ॥

बिल्हणकवीस वधस्थानीं नेल्यावर, त्यानें राजकन्येचें वर्णन केलें, ईश्वरस्मरण केलें नाहीं ! बिल्हण म्हणतो:—

अद्यापि ते कनकचंपकवर्णगोरी ।
उत्फुल्ल पद्मनयना तनुरोमहारी ॥
सुप्तोत्थिताच शयनीं मदविव्हलांगी ।
विद्या जशी गति तशी स्मरतों प्रसंगीं ॥ १ ॥
अद्यापि चंद्रवदना नवयौवनांगी ।
पीनस्तनी मजपुढें उभि हेमरंगी ॥
माझी तनू स्मरशरें पिडितांचि वेगीं ॥
गात्रें सुशीतल करी सुरतप्रसंगीं ॥ २ ॥
अद्यापि ते शरदपुष्पदलायताक्षी ।
वक्षोज वर्तुलघटद्वय मी निरीक्षीं ॥
आलिंगितां सुरस घे मधुराधराचा ।
जैसा मिलिंद रस घे नवपंकजाचा ॥ ३ ॥
अद्यापि नाकलमतनू तिचि तेजराशी ।
चुंबावया रुळत कुंतल गंडदेशीं ॥
तें वारितां ध्वनि उठे करकंकणाची ।
तेणेंकरोनि मुरकुंडि वळे मनाची ॥ ४ ॥

अद्यापि ते सुरतजागरघूर्णमानें ।
वक्त्रा विलोकन करी सुरताभिमानें ॥
शृंगारसारनलिनी गजराजगामी ।
सल्लज्ज नम्रवदना शयनीं स्मरें मी ॥ ५ ॥
अद्यापि ते मदनमंजिर वैजयंती ।
म्यां देखिली विरहव्याकुल मध्यरातीं ॥
आलिंगिली करलता पसरोनि तीसी ।
सर्वात्मना विसर तो न पडो मनासी ॥ ६ ॥

ही सगळी कथा संस्कृतांत बिल्हणकवीनें स्वतःच सांगितली असल्यामुळें, ती अत्यंत हृदयंगम उतरली आहे. विठ्ठलकृत मराठी भाषांतरही बरेंच सुरस आहे; एकंदर वर्णन फार बहारीचें आहे; पण भाषेच्या कांहीं चुक्या तशाच राहून गेल्या आहेत. 'केलांगिकार'=केला+अंगिकार 'कन्यार्पिजे'=कन्या+अर्पिजे, असले समास ह्या व विठ्ठलकृत इतर काव्यांतही आढळतात, ते व्याकरणदृष्ट्या बरोबर नाहींत. असो.

९. 'रसमंजरी.' हें काव्य भानुदासकृत संस्कृत रसमंजरीचें भाषांतर होय. याचे उल्लास ३ व श्लोक १२७ आहेत. हें काव्य विठ्ठल कवीनें शहागड येथें शके १६०१ त रचिलें. ह्या भाषांतराचे एकंदर १३९ श्लोक आहेत असें कवि म्हणतो; पण उपलब्ध झालेल्या दोन प्रतींत फक्त १२४ च श्लोक सांपडतात. यावरून ह्या काव्याचे १५ श्लोक हल्लीं उपलब्ध नाहींत हें उघड होतें. भैरव नामक एका महाराष्ट्र कवीनें मराठी रसमंजरी केली आहे, तिचे श्लोक १४० आहेत; यावरूनही विठ्ठलकृत रसमंजरींत १५ श्लोक कमी आहेत, ही गोष्ट सिद्ध होते. रसमंजरी हा शृंगारशास्त्रावरील एक ग्रंथ आहे.

त्यांत मुग्धादि सोळा नायिका व त्यांचे पोटभेद, प्रोषितभर्तृकादि नायिकावस्थानवक व त्याचे पोटभेद व नायिकातारतम्य, सखीकर्म, दूतीकर्म, पतिभेद, नायकभेद, सात्त्विक भावाष्टक, श्रृंगारभेद इत्यादि विषयांचें वर्णन आहे. हें भाषांतर कित्येक ठिकाणीं चांगलें उतरलें आहे; तरी पण ह्यांत कांहीं दोषही आहेत. विठ्ठलकृत रसमंजरीशीं भैरवकृत रसमंजरी वाचकांनीं अवश्य ताडून पहावी.

६. 'पांचालीस्तवन' या काव्याचे २३ श्लोक आहेत. वस्त्रहरणप्रसंगीं द्रौपदीनें जो श्रीकृष्णाचा धांवा केला तो यांत दिला आहे. हें लघुकाव्य बरेंच गोड आहे.

७. **पदें.**—काव्यसंग्रहांत निरनिराळ्या विठ्ठल कर्त्यांचीं १२३ पदें छापलीं आहेत, त्यांपैकीं बीडकर विठ्ठलाचीं कोणतीं व किती हें सांगतां येणें कठीण आहे. विठ्ठल कवीस देवीची उपासना होती असें पुढील दोन पद्यांवरून वाटतें—

**प्रणमित जगदंबे कल्पवल्लीकदंबे ।**
**कवि तुज न विसंबे प्रेम पोटीं झळंबे ।**
**मजवरि जरि अंबे त्वत्कृपादृष्टि तिंबे ॥**
**तरि रस अविलंबें काव्यसाहित्य बिंबे ॥ ३ ॥**

सीतास्वयंवर, सर्ग पहिला.

## पद.

**मज तारिं गे अंबे जगदंबे भवानी ॥ ध्रु० ॥**
**लसत्सरसिजाननारविंदनेत्रे गे ।**
**चलत्कुंडले सुकुंतले सुगात्रे गे ।**
**लसन्नासिके हरप्रमोदपात्रे गे ।**

अति जडमति विनवुं मी किति ।
तुज भगवति चलकलगति अंबे ॥ १ ॥

ह्या पदाचे आणखी दोन चरण आहेत, पण विस्तारभयास्तव ते येथें दिले नाहींत. विठ्ठल कवीचें आणखी एकच पद येथें देतों:—

हरि आला आजि घराला गे । ध्रु० ॥
मुरलीवाला धरि वनमाला ।
मृगमद भाला कीं लक्षुनि त्याला ।
हा जीव निवाला ॥ १ ॥
नील तमाला कृतशुभगाला ।
निरखुनि झाला प्रमोद मनाला ।
विविध करणाला ॥ ३ ॥
पदनिरतांला दे अमृताला ।
वंदुनि त्याला विठ्ठल धाला ।
कीं तन्मय झाला ॥ ३ ॥

श्रीरामाचा पुढील पाळणा* तर प्रसिद्धच आहे; किंबहुना हा पाळणा म्हटल्याशिवाय महाराष्ट्रांत रामनवमीचा उत्सव होत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल:—

जो जो जो जो रे कुळभूषणा । दशरथनंदना ।
निद्रा करि बाळा मनमोहना । रामा लक्ष्मणा ॥ ध्रु०
पाळणा लांवविला अयोध्येसी । दशरथाचे वंशीं ।
पुत्र जन्मला हृषिकेषी । कौसल्येचे कुशीं ॥ १ ॥
रत्नजडित पालख । झळके अमोलिक ।
वरती पहुडले कुळदीपक । त्रिभुवननायक ॥ २ ॥

---

* हा पाळणा येथें उतरून घेतला त्या दिवशीं रामनवमी होती हा योगायोग विलक्षण होय.

हालवी कौसल्या सुंदरी । धरुनि ज्ञानदोरी ।
पुष्पें वर्षिलीं सुरवरीं । गर्जति जयजयकारीं ॥ ३ ॥
विश्वव्यापका रघुराया । निद्रा करिं बा सखया ।
तुजवर कुरवंडी करूनियां । सांडिन आपुली काया ॥४॥
येउनि वसिष्ठ सत्वर । सांगे जन्मांतर ।
राम परब्रह्म साचार । सातवा अवतार ॥ ५ ॥
याग रक्षुनियां अवधारा । मारुनि रजनीचरां ।
जाइल सीतेच्या सैंवरा । उद्धरि गौतमदारा ॥ ६ ॥
पर्णिल जानकी सुरूपा । भंगुनियां शिवचापा ।
रावण लज्जित महाकोपा । नव्हे पण हा सोपा ॥ ७ ॥
सिंधुजलडोहीं अवलीला । नामें तरती शिळा ।
त्यावर उतरोनी दयाळा । नेसी वानरमेळा ॥ ८ ॥
समूळ मर्दूनी रावण । स्थापिल विभीषण ।
देव सोडवील संपूर्ण । आनंदेल त्रिभुवन ॥ ९ ॥
ऐसीं चरित्रें अपार । करील मनोहर ।
इतुकें ऐकूनि उत्तर । हांसले रघुवीर ॥ १० ॥
राम भावाचा भुकेला । भक्ताधीन जाला ।
दास विठ्ठलें ऐकिला । पाळणा गाईला ॥ ११ ॥

हा पाळणा फारच सुंदर आहे आणि आज २५० वर्षें सगळें महाराष्ट्र तो मोठ्या प्रेमानें गात आहे. विठ्ठल कवीची सगळी कविता नष्ट होऊन हा एवढा पाळणाच शिल्लक राहिला, तरी तो कवीचें नांव महाराष्ट्रांत अजरामर करून ठेवील, यांत संशय नाहीं. कोणत्याही कवीचें एखादें पद्य सर्वतोमुखीं होण्याइतकें लोकप्रिय व्हावें, हें त्या कवीचें मोठें भाग्य होय.

८. कूटसंग्रह.–हीं विठ्ठलकवीचीं कुटें असंख्य आहेत, असें एके ठिकाणीं वाचलेलें आठवतें. हीं कुटें केरीकर विठ्ठलाचीं आहेत असें कोणी म्हणतात, पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. ह्या कुटांची भाषा व त्यांचा मोरोपंतांनीं केलेला उल्लेख ह्यांवरून तीं बीडकर विठ्ठलकृतच आहेत, याबद्दल शंकासुद्धां घेण्याचें कारण नाहीं. ह्या कुटांचा नमुना पहाः–

**कोणे एक वनीं विचित्र पुतळा जेवावया बैसला ।**
**पात्रीं जेवण जेवितां अतिबळें पात्रेंचि तो भक्षिला ॥**
**त्याची जे वनिता वनांत फिरतां सूर्यास प्रार्थी सदा ।**
**बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासिचा वायदा ॥**
**रामाचा जनिता तथा यमपिता हे दोघे बंधू कसे ।**
**सूर्याची भगिनी यमाचि जननी हें नातें ऐसें कसें ॥**
**सूर्याचा पुतण्या यमासि म्हणतो 'मी बाप तूझा सदा'।**
**बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासिचा वायदा ॥**

हीं कुटें सोडविण्यास सहा महिन्यांची मुदत दिली आहे, ती फार आहे, असें कोणी म्हणेल असें वाटत नाहीं !

विठ्ठल कवीस गायनशास्त्राचीही माहिती होती असें त्यांच्या पदांवरून व एके ठिकाणीं 'गायक विठ्ठल सारिगमपधनी' असा उल्लेख आहे त्यावरून वाटतें.

९. द्रौपदीवस्त्रहरण.—ह्या काव्याचे श्लोक ४३ आहेत. हेंही काव्य वाचनीय आहे. त्याचा शेवटचा श्लोक असा आहे:—

**महा माघीं रौद्रीं दृग नभ कला शालिवहनें ।**
**पदें पद्यें त्रेतालिस कवि विठ अर्थगहनें ॥**

**विडाखालीं गौरीपुरिं कृत कथा पुण्यकरणी ।**
**करू कल्याण श्रीयमनसभलागः शिखरणी ॥**

हें संबंध काव्य शिखरिणी वृत्तांत असून, त्याचें लक्षण कवीनें शेवटच्या श्लोकांत सांगितलें आहे.

विठ्ठलकृत काव्यांतले बंध फार मौजेचे आहेत. द्वादशदलकमलबंध, पट्टिशबंध, व्यजनबंध, चामरबंध, मालाबंध, अष्टदलबंध, वापीबंध, धनुर्बाणबंध, अश्वबंध, उष्ट्रबंध, इत्यादि बंधांचीं सचित्र उदाहरणें काव्यसंग्रहांत विठ्ठलकृत काव्यांच्या शेवटीं दिलीं आहेत तीं वाचकांनीं अवश्य पहावीं.

एकंदरींत विठ्ठल कवीची कविता बरीच सुरस आणि प्रासादिक असून, त्याचें चित्रकाव्यकौशल्य, संस्कृत काव्यपद्धति, कूटसंग्रह इत्यादिकांमुळें महाराष्ट्र वाङ्मयांत विठ्ठल कवीस एक स्वतंत्र स्थान प्राप्त होणें अवश्य आहे, असें मला वाटतें.

---

# श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी सिंदखेडकर.

## श्लोक

**अगुणाय गुणाढ्याय स्वात्मनेऽनंतरूपिणे**
**शुद्धाय स्वप्रकाशाय आत्मारामाय ते नमः ।**

आत्मारामस्वामींचे गुरु श्रीमत्परमहंस निर्मलानंद स्वामी यांचा जन्म आणि समाधि यांजबद्दल विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. मात्र त्यांचे कांहीं आत्मानात्मविचाराचे आणि सांप्रदायाचे ग्रंथ व कांहीं स्फुट पदें मात्र आहेत. यापरता दुसरा विश्वसनीय आधार नसल्यामुळें त्यांची विशेष माहिती देतां येत नाहीं, ही निरुपायाची गोष्ट आहे. आतां त्यांचे सच्छिष्य श्रीमत्परमहंस श्रीआत्मारामस्वामी चरित्रनायक यांचेबद्दलची

अल्प माहिती मिळाली, त्यावरून ते पूर्वाश्रमीं खानदेशांतील चाळीसगांवचे राहणारे होते, असें कळतें. त्यांचे पूर्वजांचा व गोत्रवंशाचा पत्ता लागत नाहीं. त्याचप्रमाणें श्रीआत्मारामस्वामीचे जन्मशकाचा वगैरेही शोध लागत नाहीं. मात्र हे पूर्वाश्रमीं चाळीसगांवीं रहात होते. एवढी माहिती मिळते. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण व तीव्र ब्रह्मचारी होते. यांनीं आपले वृद्धावस्थेंत श्रीनिर्मलानंद परमहंसस्वामींपासून संन्यासदीक्षा घेतली; व आनंदसांप्रदायाप्रमाणें आपला मठ सिद्धपूर—ज्यास हल्लीं शिरपूर असें म्हणतात ( हा गांव वाशीम तालुक्यांत वाशीमपासून दोन कोसांवर आहे ) तेथें स्थापन केला, अशाबद्दलचा दाखला त्यांचेच शिष्य श्रीमत्परमहंस सदानंद यांच्या एका पदावरून मिळत आहे. तें पद पुढें लिहिलें आहे:—

## पद.

पहा तें सिद्धपूर ।। पुण्यभूमी अपार ।।
बुद्धगंगा वाहे ।। सत्रावी सार ।। धृ० ।।
सिद्धपुरीं राहे । आत्माराम नांदताहे ।
ईशान कोणीं । आशापुरी देवी पाहे ।। १ ।।
सिद्धसंत मेळा पूर्ण । होय ज्ञानघन पुराण ।
पूर्णावतार पूर्णानंद पूर्ण । जय जयानंद भाषण ।। २ ।।
निजतेजीं प्रकाशला ।। सदानंद एकमय झाला ।।
आनंदीं राहिला ।। सर्वकाळ ।। ३ ।।

श्रीसमर्थ रामदास तुकारामप्रभृति साधुवृंद ज्या वेळीं दक्षिणेंत उदयास येऊन आपले सामर्थ्यानें हिंदुधर्माचें रक्षण करीत होतें त्या वेळीं म्हणजे शके १६०० चे सुमारास आमचे चरित्रनायक खानदेश व वऱ्हाड येथें उदयास येऊन वऱ्हाडांतील वाशिमाजवळील शिरपूर येथें रहात असत. यांनीं आपल्या अलौकिक सामर्थ्यानें

आनंदसांप्रदाय प्रसिद्ध करून पुष्कळ लोकांस स्वधर्माचरणाकडे वळविलें; आणि आपल्या योगबलानें व भक्तिबलानें हिंदुमुसलमानांत ऐक्य करून जातिभेदभाव मोडून सर्वांसही उपदेश देऊन श्रीशाहा दत्ताचे चरणीं भक्तजनांस तल्लीन करून सोडलें; आणि औरंगजेब बादशहास आपल्या शिष्याकडून शुद्धीवर आणवून देवगड—ज्यास दौलताबाद म्हणतात—तेथें राहण्यास सांगितलें; व त्या औरंगजेबाला त्यांनीं अल्ला व आलम एकरूप आहे असें सिद्ध करून दाखविलें. ह्या आत्मारामपरमहंसांनीं हिंदु धर्मावर महदुपकार करून ठेविला तो हा कीं, हजारों हिंदु यवनधर्माचे दीक्षेपासून वांचविले. तत्संबंधाचा इतिहास सदानंदांचे चरित्रांत येणार आहे.

श्रीआत्मारामस्वामी यांनीं श्रीमाहूर येथें अत्युग्र तपश्चर्या केली. त्या वेळीं परम कारुणिक भक्तरक्षक श्रीदत्तात्रय प्रभु परम कृपाळू होऊन श्रीआत्मारामस्वामींना त्यांनीं प्रत्यक्ष दर्शन दिलें व असें सांगितलें कीं, कलियुगांत मी दोन दृश्य अवतार घेऊन पराविद्येचा गुह्य उपदेश व गुह्य अवताररहस्य सांगून बसवा जंगम, आनंद प्रभू, बेदरबादशहा, सलावतखान, जनार्दन, एकनाथ, आणि आनंदप्रभूप्रभृति सद्भक्तांस आनंदमार्गाचा उपदेश केला आहे. ह्या संतपरंपरेपैकीं निर्मलानंद परमहंस स्वामी हयात आहेत. त्यांच्याकडे जाऊन त्यांचा उपदेश घेऊन जीवन्मुक्त हो. असें सांगून देव गुप्त झाले. नंतर आत्मारामस्वामी निर्मलानंदस्वामींकडे गेले, त्या वेळीं त्यांनीं म्हटलें आहे:—

## पद.

**भूम नगरासी जाऊं। सद्गुरुला वेगीं पाहूं।**
**भेटी आनंदाची घेऊं। मागुते न जन्मासी येऊं ॥ १ ॥**

तुम्ही भक्तजन हो सकळिक। आनंदाचे तुम्ही बालक।
मेळा मिळउनी ऐहिक। तुमच्या सेवे मी रंक॥ २॥
परभूमीकेचा राजा। आनंददेव माजा।
त्रिभुवन जयाची प्रजा। अनंत ब्रह्मांडें घेतो पूजा॥३॥
रामकृष्ण आम्हासि कायी। त्यांची कलीयुगीं शक्ति नाहीं।
कलियुगींचा देव पाही। आलमा प्रभू शाहाची पातशाही॥४॥
देवगिरी देवाचें सिंहासन होये। शाहाची पादशाही होईल पाहे।
निर्मलानंद प्रभु देवें मज सांगितली सोये। आत्माराम ध्यानीं
सदोदित राहे॥ ५॥

ह्या आत्माराम गुरुभक्तास श्रीसद्गुरु निर्मलानंदानीं उपदेश देऊन आत्मवत् केलें. नंतर ते स्वच्छंदगामी बालोन्मत्त अवस्थेंत राहत असत. ते बरेच दिवस शिरपुरास राहिल्याचें सदानंद आपले काव्यांत दर्शवीत आहेत. पुढें ईशाज्ञेनेंच कीं काय सदानंद हे माहूरची वारी करीत असत. त्या वेळीं त्यांस साक्षात्कार होऊन 'श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामीपाशीं जा' अशी आज्ञा झाली व ते सिद्धपुरास येऊन स्वामींचा त्यांस अनुग्रहही झाल्याबद्दलचें वर सांगितलेंच आहे. श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी सर्वविद्यापारंगत असल्याचें त्यांच्या ग्रंथांवरून दिसून येत आहे. आणि सिद्धपुरास बुद्धमतानुयायी, महंमदानुयायी आणि जगमानुयायी तसेच वेदमतानुयायी या सर्वांस त्यांच्यासंबंधानें सारखाच आपलेपणा वाटत असे. आणि प्रत्येकाचें आपापले परी उत्तम प्रकारें समाधान करून ज्यावर अनुग्रह करणें योग्य दिसेल त्यास अनुग्रह करून ते कृतार्थ करीत असत. षड्दर्शनाबद्दलचा त्यांनीं दोहरा केला आहे तो येणेंप्रमाणें:—

'जोगी जंगम शेवडा संन्यासी दरवेश।
छठा दर्शन ब्रह्मका इसमे मिनवे मेख'॥

ह्याप्रमाणें सहांचीही स्वामीच्या ठायीं भक्ति असे व सहाही मतांचे लोक त्यांचे शिष्य होते. कारण श्रीप्रभूनेंच ज्या वेळीं म्हणजे सुमारें १२०० वर्षांपूर्वी हा जो उभयदृश्य श्रीशाहा दत्तावतार घेतला त्याच वेळीं सहाही दर्शनानुयायी शिष्य केले. याची साक्ष अद्याप भूमनगर, श्रीमाहूर, कलबुर्गा, कल्याण, शाहागुहा, शाहा डोंगर, राणीबिंदूर, वगैरे ठिकाणीं हिंदू, मुसलमान, जंगम, जोगी, संन्यासी, जैन हे सर्व ज्याचे त्याचे शास्त्राप्रमाणें प्रभूच्या पादुकांची पूजा करितात हें त्या त्या ठिकाणीं जाऊन पाहिल्यास दिसून येईल. श्रीशाहा दत्ताचे अवतार, श्रीपादश्रीवल्लभ, श्रीनरसिंहसरस्वती आदि झाले आहेत. त्यांनींही आपले अवतारचरित्रांत मुसलमानांस उपदेश करून सद्गतीस नेलें. अद्यापिही श्रीगाणगापूर, नृसिंहवाडी, औदुंबर वगैरे ठिकाणीं उभय धर्मांचे लोक सारखी सेवा करीत आहेत. तेव्हां दत्त तोच शाहादत्त, व शाहादत्त तोच दत्त यांत भिन्नता नाहीं. भक्तांकरितां अनंत अवतार झाले व होत आहेत व पुढें होतील. त्याचा पार खुद्द ब्रह्मदेवास लागला नाहीं मग मानवास कोठें लागणार! शाहादत्त अवतारचरित्र आनंदसारप्रभृति ग्रंथांत सप्रमाण व साधार दिलें आहे. तसेंच अवतारचरित्रानुयायी अनेक संत महंत झाले आहेत. त्यांपैकीं सदानंद यांचा मठ चोपडें येथें आहे. मध्वमुनीश्वर, कृष्ण याज्ञवल्कि, मानपुरी, माधवेंद्रस्वामी, रंगनाथ निगडीकर वगैरे महंतांचे मठ अद्याप आहेत. व त्यांचे मार्गही गुप्त आहेत. माहुरास मात्र जागृति आहे; व तेथील महंत वगैरे आनंदसांप्रदायी आहेत. आनंदसांप्रदाय, नंदसांप्रदाय, नाथसांप्रदाय व दत्तसांप्रदाय वगैरे सर्व एकच आहेत. मूळचे चार सांप्रदाय एकच असल्याबद्दल श्रीमत्परमहंस दयानंदस्वामी यांची एक आरती आहे. ती पुढें त्यांचे चरित्रांत देणार आहों.

श्रीस्वामीचें नित्याचें भिक्षाटन वगैरे बालोन्मत्तावस्थेंतच चालत असे. असें कित्येक दिवस चाललें असतां श्रीआत्मारामस्वामी सिद्ध-पुराहून निघून धरणगांवास आले. तेथें येण्यापूर्वीं तेथील धर्माधि-कारी सदाशिवराव यांस गृहस्थाश्रमांतील सर्व कृत्यें अगोदरच आटपा-वयास सिद्धपुराहून कळविलें होतें. त्याप्रमाणें स्वामी तेथें आल्या-बरोबर सदाशिवराव धर्माधिकारी यांनीं सर्व वृत्तीवर पाणी सोडून आपण व आपला मुलगा—जो पुढें दयानंद या नामें प्रसिद्धीस आला—व बायको बरोबर घेऊन स्वामीसमागमें ते चोपड्यास आले. त्या ठिकाणीं श्रीआत्मारामस्वामींनीं सदाशिव धर्माधिकारी यांस पूर्ण वैराग्याच्या कसोटीस लाविलें. त्यांला अयाचित वृत्ति धारण करावयास लाविलें. पूर्णत्वें कसोटीस उतरल्यामुळें श्रीआत्मारामस्वामींना पूर्ण आनंद झाला. व त्यांनीं सदाशिव धर्माधिकारी यांस पुढें संन्यास-दीक्षा देऊन आत्मवत् केलें. व त्यांचें नांव सदानंद परमहंस ठेविलें. तेव्हांपासून सदाशिव धर्माधिकारी हे सदानंद परमहंस या नांवानें प्रसिद्धीस आले.

ज्या वेळीं औरंगजेब बादशहा दक्षिणेंत आला तेव्हां खानदेशांत चोपडयानजीक गुळनदीचे कांठीं आंबाडे नांवाचा गांव आहे तेथें तो दोन महिने राहिला होता. याची साक्ष त्यानें बांधलेली महजत अद्याप देत आहे. त्या अवधींत त्यानें हिंदूंचे पुष्कळ मुसलमान केले. व खुद्द चोपडयावर जेव्हां प्रसंग आला तेव्हां तेथें असलेले सदानंद, मुस्तफा-साहेब, दादामिया, शीतलनाथप्रभृति संतांनीं श्रीआत्मारामस्वामींचा धांवा केला. त्या वेळीं संतमाउलीनें वरील मंडळीला सांगितलें कीं, कसाही प्रसंग आला तरी धैर्याला सोडूं नये. कितीही छळ झाला तरी आपला मार्ग कायम ठेवावा म्हणजे भीति उरत नाहीं. निश्चयाचे मेरू-

वर आरूढ होऊन, येणाऱ्या कालाशीं सामना करीत असावें असें सांगून आपण सिंदखेड येथें गेले. व तेथें राउळाकडेस राहिले. श्रीआत्मारामस्वामी गेल्यानंतर थोडेच दिवसांत औरंगजेब बादशहानें वरील चार साधूंचा छल करण्यास प्रारंभ केला, परंतु ते गुरुकृपेनें त्याच्या छलास पुरून उरले; व धैर्य धरून औरंगजेबासारख्याशीं टिकून आपला मार्ग त्यांनीं कायम ठेवला. औरंगजेबानें त्यांचा कसा छल केला, हें सदानंदाचे व मुस्तफासाहेबाचे चरित्रांत येणार आहे.

" औरंगजेब बादशहा पूर्वजन्मींचा योगभ्रष्ट असून त्यास विजापूरचे स्वारींत प्रभूनें स्वप्न देऊन शुद्धीवर आणिलें आहे. त्या दिवसापासून तो श्रीशाहादत्तस्वरूपासंबंधानें मुमुक्षु आहे व याचकरितां तो साधूचा छल करीत असतो. करितां त्याजला स्वप्नाची खूण सांगावी म्हणजे तो शुद्धीवर येईल आणि त्याचा अंतकाल समीप आला आहे, याजकरितां त्यास उपदेश देऊन श्रीशाहादत्ताची राजधानी देवगिरी ( ज्यास दौलताबाद म्हणतात ) तेथें जाण्याची आज्ञा करावी व पूर्ण वैराग्यदीक्षा देऊन रवाना करावें. " अशी स्वामीची आज्ञा वरील चार संतांस झाली. इकडे आपल्या छळानें वरील चारीही संत डळमळले नाहींत हें पाहून मानी औरंगजेबास आश्चर्य वाटलें व आपले कृत्याचा त्यास पश्चात्ताप झाला. तो वरील चार संतांस शरण आला. त्या वेळीं सदानंद स्वामी यांनीं मुस्तफासाहेब यांचेकडून त्यास कृतार्थ करवून पूर्वसंकेत स्वप्नार्थ कळविला. त्याबरोबर त्यास पूर्वस्मरण होऊन तो शुद्धीवर आला व सदानंदस्वामींचे चरणीं लीन झाला. आत्मारामस्वामींनीं मुस्तफा याला सांगितलेल्या जूद नामावली व शाहास्त कलमा यांचा उपदेश औरंगजेबाला देऊन त्याला दौलताबादेस रवाना केलें. त्यानें जातेसमयीं त्या साधूंना नकळत तेथील देशमु-

खास त्यांचा परामर्श घेण्याबद्दल जमिनीच्या सनदा प्रत्येक गांववार करून देण्याबद्दल आज्ञा केली. त्याप्रमाणें त्या चारही साधूंच्या वंशजांकडे अद्याप कालमानानें जमीन चालत आहे व तिचा ते उपभोग घेत आहेत.

पुढें औरंगजेबानें हिंदूंचे मुसलमान केलेच नाहींत. रोझें येथें जाऊन श्रीशाहादत्ताचें स्मरण करीत त्यानें आपला अंतकाळ यथाविधि साधला, हें सर्वश्रुत आहे. व तेथें अद्याप मोठा उरूस भरत असून मुसलमान तें स्थान परम पवित्र समजतात. दौलताबादेस जनार्दनस्वामीस आणि एकनाथस्वामीस श्रीदत्तात्रेयमहाराजांनीं मलंगवेषानें दर्शन देऊन उपदेशही दिला. ते हे श्रीशाहा दत्तस्वरूप पूर्ण परब्रह्म अवतार होत. यांचें अवतारचरित्र स्कंदपुराणांतर्गत कालिका–खंडांत व पद्मपुराणांतर्गत क्रियायोगसारखंड व नारदपुराण व ब्रह्मांडपुराणांत आहे. श्रीदासोपंत, मध्वमुनीश्वर, आत्माराम परमहंस, सदानंदप्रभृति संतवृंदांनीं वरील संस्कृत ग्रंथाधारें श्रीदत्त यांचे चरित्राचें पूर्ण वर्णन केलेलें आहे. आमचे चरित्रनायक श्रीआत्माराम परमहंस यांनीं नाना लोकोत्तर चमत्कार लोकांना दाखवून त्यांना भक्तिमार्गास व योगमार्गास लाविलें. त्यांनीं केलेले पुष्कळ ग्रंथ आहेत. ह्यांतील कांहीं ग्रंथांची माहिती येणेंप्रमाणें:—आत्मबोध, उत्तर अजपा, चतुर्दश चक्रावळी, परज्ञानसागर, महार्णव चित्प्रकाश, नीलांबर शास्त्र जंगमाकरितां, भगवत्‌गीतेप्रमाणें बसव याजला आलम प्रभूनें ज्ञान सांगितलें तें संस्कृत भाषेंत आहे. परंतु नीलांबरी व वरील संस्कृत श्लोक जंगमापाशीं कानडी लिपींत असल्यामुळें आम्हांस पहावयास मिळाले नाहींत. श्रीरंगपट्टण येथें आत्माराम स्वामींनीं केलेले टीकेसह नीलांबरी आहे. त्यांतले कांहीं उतारे देतों:—

## अवतारचरित्र व गुरुमहिमा

### ओंव्या.

कणवा उपजली भारी । जीवाची भवसागरीं ।
परब्रह्म अवतरले साहाकारी । सृष्टीमध्यें ॥ १ ॥
आदर चैतन्य मायेचा । अंगिकार केला तयेचा ।
मळमळ जीवाचा । अवतरले परब्रह्म ॥ २ ॥
कृतयुगामाझारी । परब्रह्म अवतरले ते अवसरीं ।
दंडकमंडलु जटा शिरीं । शोभिवंत ॥ ३ ॥
अंगीं विभूतिचें उद्धलन । कटीं कटकसूत्र मेखला कौपीन ।
यज्ञोपवीत शुक्ल हंसवर्ण । अवतरले परब्रह्म ॥ ४ ॥
मग त्या ब्रह्मयाचे चारी कुमर । सनक सनंदन सनातन सनत्कुमार ।
मोक्षमार्गाचा विचार । पुसति ब्रह्मयासि ॥ ५ ॥
हे सृष्टि रचली कवणें । जीवाचीं तोडिलीं बंधनें ।
तुम्हा ब्रह्मपदीं बैसविलें कवणें । तो कवण ऐसा ॥ ६ ॥
न बोले उगाचि विधाता । थोर जालपला चित्ता ।
मनीं ध्यानस्थ अनंता । स्मरिलें तेणें ॥ ७ ॥
निज भक्त जाणूनि आपुला । थोर चिंतेमाजी पडला ।
मग स्वयें प्रगट जाला । परब्रह्म तेथें ॥ ८ ॥
डोळे उघडुनि पाहे विधाता ।
तंव दिव्य दृष्टि देखिलें परब्रह्मा ।
मग खुणावी पुत्रांतें ब्रह्मा । हळु हळुचि ॥ ९ ॥
मग उठोनि चववेजणीं । लोटांगण घातलें श्रीचरणीं ।
उठविले थोर पात्र जाणूनी । आलिंगिले परियेसीं ॥ १० ॥

उपनिषद् महावाक्यार्थ । उपदेशिता झाला अनंत ।
मायाब्रह्म निवडुनि सिद्धांत । निज गुह्य उपदेशिलें ॥ ११ ॥
जैसें नीर क्षीर एक जालें । तें राजहंसें कीजे वेगळें ।
तैसें परब्रह्म दाविलें । परात्परें ॥ १२ ॥
शाब्द सामान्य अपरोक्ष विशेष। चाऱ्ही ज्ञानें उपदेशिता जाला परेश।
येणें लक्षणें बोलति परमहंस । अवतार कृतयुगीं ॥ १३ ॥
मग त्रेतायुग लागला । परब्रह्म अवतार अवतरला ।
जो अद्याप असे एकला । श्रीदत्तात्रय प्रभू ॥ १४ ॥
अवधूत वेषें श्रीभगवान । आणि विभूतीचे उद्धलन ।
जटा मुकुट परब्रह्म पूर्ण । त्रेतायुगीं अवतरले ॥ १५ ॥
यदुरायासी साक्षात्कारें भेटले । निज गुह्य ज्ञान उपदेशिलें ।
माया परात्पर दाविलें । परब्रह्म स्वरूप ॥ १६ ॥
मग द्वापार लागलें । परब्रह्म अवतरले ।
श्रीकृष्ण स्वरूप साकारिलें । भक्ताकारणें ॥ १७ ॥
अर्जुनाप्रति भेटी दिधली । श्रीभगवद्गीता उपदेशिली ।
परब्रह्माची वाटी उघडिली । साक्षात्कारें ॥ १८ ॥
शंखचक्रगदापद्म धरिलें । निर्मळ पितांबर नेसले ।
मेघःशाम परब्रह्म अवतरले । द्वापारामध्यें ॥ १९ ॥
सर्वेचि कलियुगाचा भेद । परब्रह्म अवतरले सच्चिदानंद ।
महावाक्यीं निरोपिला आनंदकंद । सृष्टीमध्यें ॥ २० ॥
चहूं युगांभीतरी परिपूर्णी । परब्रह्म कैवल्यदानी ।
कलियुगीं निज भक्तालागुनी । श्रीशाहादत्त आलमा प्रभु ॥ २१ ॥
जया जाती ना कुळ । परब्रह्म केवळ ।
कलयुगीं प्रगटला सुनीळ । भूमिकेवरी ॥ २२ ॥

पराविद्येचा आचार्या । स्वयं परब्रह्म आपणया ।
उपदेशिता जाला गुरुवर्या । आनंद प्रभुसी ॥ २३ ॥
कलियुगींचा अवतार । पराविद्येचा दातार ।
परब्रह्म साचार । श्रीशाहादत्त प्रभु ॥ २४ ॥
नीलांबरधारी । परब्रह्म आले साकारी ।
जीवा कारणें संसारीं । उद्धरिता जाला ॥ २५ ॥
प्रमाण श्लोकः- कृते शुक्लं हरिं विद्यात् । त्रेतायांरक्तमेवच ।
द्वापारे पीतवर्णंचं नीलवर्णं कलौ युगे ॥ १ ॥ इति भागवत् ।
कृतायुगीं शुक्लवते अवतार । त्रेतायुगीं रक्तवर्ण साचार ।
द्वापारीं पीतवर्ण मनोहर । जाणती संत रूप हें ॥ २६ ॥
कलियुगीं नीलवर्ण । आहे भागवतीं प्रमाण ।
दशम स्कंधीं नीरोपण । आहे याचें ॥ २७ ॥
परविद्येची अर्थखोली । पाहतां सर्व शास्त्रें वेदीं झालीं ।
ब्रह्मविद्यापर आहे बोली । पाहें परविद्येची ॥ २८ ॥
ब्रह्मविद्येनें कायी केलें । जीवदेवतां ईश्वरातें दाविलें ।
परविद्येनें प्रगट केलें । परब्रह्म पूर्ण ॥ २९ ॥
ब्रह्मविद्या ईश्वराची । परविद्या ते परब्रह्माची ।
ऐसी विवंचना आहे याहाचि । पाहे पैं ज्ञानी ॥ ३० ॥

॥ इति युगावतारकथनं ॥

## सद्गुरुवर्णन.

सह्याद्रि म्हणजे पर्वतु । यालागीं बोलिजे शहादत्तु ।
तेथें परब्रह्म अनंतू । अखंड क्रीडा करी ॥ १ ॥

चौयुगाभीतरी । परब्रह्म अखंड क्रीडा करी ।
ज्ञान देऊनीयां कुसरी । भवसागरीं जीवा उद्धरितु ॥ २ ॥
श्रीकृष्णअवतार अवतरले । ज्ञान देऊन कुसरी जी ते उद्धरिले ।
परी निजधामासी बीजे केलें । अवतारालागीं ॥ ३ ॥
कृतायुगामाझारी । हंस आले अवतारी ।
तेंही ज्ञान देऊनि अंतरीं । निजधामासी बीजे केले ॥ ४ ॥
तोही त्रेतायुगीं अवतरला । ज्ञान देऊनी चहुयुगीं धीरावला ।
अद्याप असे नाहीं गेला । जाणती भक्तजन ॥ ५ ॥
जया भक्तीसी परज्ञान । ते जाणती अवताराची खूण ।
येर नेणती अज्ञान । सद्गुरूवीण का ॥ ६ ॥
गुरुवीण नाहीं ज्ञानाची प्राप्ती । ऐसी बोले वेदश्रुती ।
यथा देवे तथा गुरौ ऐसें ह्मणती । वेदवाणी ॥ ७ ॥
जैं गुरुकृपा घडे । तैं फिटे अज्ञान साकडें ।
परस्वरूपी दृष्टी उघडे । सद्गुरूकृपे करोनियां ॥ ८ ॥
म्हणोनि सद्गुरूचे चरण । सेविता होये आत्मज्ञान (समाधान) ।
गुरुवीण अवतारादिक जाण । राहिले नाहीं ॥ ९ ॥
रामचंद्रासारिखा अवतार । त्याचा गुरू वशिष्ठ ऋषेश्वर ।
गुरुपदमहिमा (अगम्य) अपार । निवेदिली जानकीसी ॥ १० ॥
श्रीकृष्ण अवतारी अवतरिला । त्याणे दुर्वासा गुरु केला ।
ऐसा गुरुसांप्रदाय मानिला । महामहंतीं ॥ ११ ॥
ढीवर गुरु केला नारदें । हें वचन मानावें पुराणप्रसिद्ध ।
गुरुवांचून योगवृंदें । जालीं कैंचीं ॥ १२ ॥
पार्वतीसी उपदेश केला शंकरें । ऐसीं गुरुगीतेचीं उत्तरें ।
ब्रह्मादिक हरिहरें । केला गुरू ॥ १३ ॥

अठ्याग्यशीं सहस्त्र ऋषेश्वर मुनी । तेही सद्गुरुचे अखंड ध्यानीं।
ऐसी गुरुमहिमेची मांडणी । मांडली असे ॥ १४ ॥
राजा जनक पाहीं । गुरुज्ञानें झाला विदेही ।
ऐसी शास्त्राची ग्वाही । जाणती पंडित ॥ १५ ॥
कबीर नामा रोहिदास । या सर्वांसी सद्गुरूचा उपदेश ।
गुरूपदेशें महापुरुष । जाले साधूजन ॥ १६ ॥
येकाजनार्दन साधूजन । तेहीं सेवीले सद्गुरुचरण ।
गुरुकृपे जाले शुद्ध ब्राह्मण । अज्ञान ते शूद्र ॥ १७ ॥
ज्ञानदेवासारिखे महंत । तेहि सद्गुरुचे महाभक्त ।
सद्गुरुवांचोनी अन्य दैवत । न आणती दृष्टी ॥ १८ ॥
जरी शिव भक्तावरी कोपला । भक्त सद्गुरुमागें लपाला ।
शिवें कोप उगाचि साहिला । न घेववे सद्गुरुपासीं ॥ १९ ॥
जरी सद्गुरु कोपासि येरी । शिष्य पळोनी जाय शिवाच्या घरीं ।
त्यासी सद्गुरु घेउनी आपुल्या करीं। तो धरूनी आणिला ॥ २० ॥
ऐसी सद्गुरुची महिमा अगाध। ते महिमा जाणोनि वर्णिती वेद ।
ते आयिकें श्रुतींचें वचन प्रसिद्ध । सांगू आतां ॥ २१ ॥
शिवदृष्टो गुरुस्त्राता गुरुदृष्टः शिवेनहि । ऐसें श्रुतीचें वचन पाहीं ।
शास्त्रींपुराणीं हेचि ग्वाही । सद्गुरूसी नमन केलें ॥ २२ ॥
सद्गुरुची भक्ती देवासी । सद्गुरुची भक्ती अवतारासी ।
सद्गुरुची भक्ती सकल ऋषेश्वरांसी। ध्यान योगीयाचें ॥ २३ ॥
घरोघरीं गुरु अनेक । परी ते नवती ब्रह्मदायक ।
गोविति कर्मामाजी बाधक । ते नवती सद्गुरु ॥ २४ ॥
सद्वस्तू दावी आत्मज्ञान । म्हणोनि सद्गुरु हो निधान ।
सद्गुरूचें महिमान । ते अगाध महिमा ॥ २५ ॥

जेहीं गुरुपद उच्छेदिलें । अन्य मार्गीं मन गोविलें ।
त्याहासी महादोष बोलिले । शंकर म्हणे पार्वतीसी ॥ २६ ॥
जो गुरुपदाचा लोप करी । त्यासी महादोष बोलले सौंसारीं ।
जन्मोजन्मीं महा अघोरीं । त्यासी घालिती यमदूत ॥ २७ ॥
जो गुरूपुढें मीपण दाखवी । आणि गुरुनिंदेसी प्रवर्तवी ।
तो राक्षसयोनी भोगवी । महाखळ ॥ २८ ॥
जो सद्गुरूचें करी उपासन । त्यासी निर्धारेसी होय ब्रम्हज्ञान ।
श्रीशंकर सांगे पार्वतीसी जाण । गुरुउपास्ति महिमान ते ॥ २९ ॥
सकळ देवांचा देवो । ऐसा सद्गुरूचे ठायीं ज्याचा भावो ।
अवतारांसी श्रीसद्गुरुरावो । पूज्य सर्वांसी ॥ ३० ॥
आत्माराम परमहंसें । श्रीसद्गुरुमहिमा उल्हासें ।
सद्गुरुकृपे बोलतसे । संतांप्रति ॥ ३१ ॥

यांचे संस्कृत ग्रंथ चित्प्रकाश, हंसलक्ष्मी वगैरे आणि स्तोत्रें पुष्कळच आहेत, परंतु विस्तारभयास्तव त्यांतील उत्तरे देत नाहीं. आतां प्रत्येक भाषेंत यांणीं केलेल्या ईशपर कांहीं कविता देत आहें.

## धांवा.

देवा तूं बोल मजसी । कां जाले उदासी ।
तुझी होईन मी निज दासी । चरण झाडीं केशीं ॥ १ ॥ ध्रु० ॥
मी तर अपराधी अन्यायी । जडलों तुझ्या पायीं ।
गुंतलों प्रपंच बहुडोहीं । कृपावंत होईं ॥ २ ॥ ध्रु० ॥ देवा० ॥
दंभ अहंकार हे वैरी । जाचती मजला भारी ।
तुजविण मज कोण कैवारी । धाव रे लवकरी ॥ ३ ॥ ध्रु० ॥ देवा० ॥
दुर्जन निंदक हांसती । न घडे तुझी भक्ती ।
मी तर येतसें काकुळती । तूं माझा सारथी ॥ ४ ॥ देवा० ॥
सांगूं कवणासी तुजवीण । सुखदुःख माझें जाण ।
झडकरी येईं वा धाऊन । देईं मज दर्शन ॥ ५ ॥ देवा० ॥

मन मुंजा हा दारुण । पिशाच केलें मन ।
नाना दैवतां पूजोन । भ्रांति पडली जाण ॥ ६ ॥ देवा० ॥
तूं तर दीनाचा दयाळू । भक्तांचा कृपाळु ।
जाणुन कुश्चळु । तोडीं कर्मं हीं सकळु ॥ ७ ॥ देवा० ॥
किती बोलूं मी दातारा । तुजपुढें वचनोत्तरा ।
आलों या संसारा । कष्टलों रे सोयरा ॥ ८ ॥ देवा० ॥
तुझ्या भक्तिचा मज नेम । अखंड द्यावा प्रेम ।
काय जनासी मज काम । म्हणे जी आत्माराम ॥ ९ ॥ देवा० ।

## गुर्जर भाषेंतील.

प्रभूजीना गुण गावो रे । वाल्हा सहुजनमळि आवो रे ॥ध्रु०॥ठेका॥
वाग पुष्पही माळा । केशरी तिलक निज भाळा ॥
कथा कीर्तन परमा । गावो प्रभूआगल उत्तमा ।
कसे आनंद रुठमा । सहुजन गावो आलमा ॥ १ ॥
हरिकीर्तन प्रेमें भिनो रे । आनंद घटाजेमछाईर रिमझिम मेहलो
वरसे रे । लाग्यो सेजडीया सुख थायो रे ॥ २ ॥ धृ० ॥
आनंद मारो स्वामी रे । सदा सुखदाई भक्तनरे ।
आत्मारामने श्रीगुरु मळियोरे । भवजल लिधो तारी रे ॥ ३ ॥

## हिंदुस्थानी भाषेंतील.

चलो भाई दत्तनगर कोई आवेगा । आवेगा सुख पावेगा ।
नावेगा पछतावेगा । जमके हात विगावेगा ॥ १ ॥
सत्यलोकसु आगे चलना । वैकुंठकू नही रेहेना ।
कैलासकुवी पछि डालना । गुरूके पिछे पिछे चलना ॥ २ ॥
शून्य मंडल घरवाट हमारी । निराकारसे मेला ।
परासिखरका घाट चलना । बुझे गुरुका [illegible] ना ॥ ३ ॥
निराकारके तक्त सवारे । दत्त निरंजन राजा ।
आत्माराम कहे वो घर आपना । वाजे अनुहद वाजा ॥ ४ ॥

याशिवाय कानडी, तेलगू, फारशी, खानदेशी, वऱ्हाडी, गोंडी, वगैरे भाषेंत यांची स्फुट कविता पुष्कळ आहे. परंतु त्या भाषा समजत नसल्यानें व कागदाचीं फार जीर्ण पानें आणि लिपीही दुर्बोध अशा अडचणीमुळें लिहितां येत नाहीं. परंतु ज्या वेळीं औरंगजेबास उपदेश करण्याची आज्ञा दिली त्यावेळीं सदानंदास पत्र पाठविलें व त्यांत औरंगजेबास आरबी भाषेंत कवीत लिहिलें आहे तें येथें देतों:—

बादशहा औरंगजेबास उपदेशात्मक

## कवीत अथवा कलमा.

**किब्लये अदलेवफा। शंशेर हये। हा दिये मुश्कील कुश। शंशेर हये। गाजिया अहले शआदत्त्। कवन हा। वाले हुमा। शंशेर हये। कवन् दुस्मान् केकरे। सिने मेजान्ना शुने मुश्कील कुशा। शंशेर हये। दुस्मन् कुकर सके। मग्रे फरेब। दुवा शंशेर हये। अलियो मुर्तजा। शहकी रियायत हये। रियायत हये।**

अशा अनेक कविता, कलमें व अध्यात्म आदि पुष्कळ गाथा आहेत. आतां श्रीचीं ठिकाणें व मठाची माहिती देऊन व कांहीं चमत्कार वर्णन करून हें संक्षिप्त चरित्र पुरें करूं. वंशपरंपरा वगैरे सदानंद, दयानंद वगैरेंची जीं चरित्रें येतील त्यांत देण्याचा संकेत आहे. ईश्वर इच्छेनें सिद्धी झाल्यास होईल. ग्रंथांचीं नावें वचनसमुद्र ( सं० ), अनीलपुराणज्ञान ( सं. ), खेचरी मुद्रा त्रिविध प्रकार, वेदवच ( स० ), देहचतुष्टय ( सं० ), मुसलमानाचे निमाज, ( प्रा० ) मन, स्वरूप, जीव, शिव, निर्वाणगीता—तत्वसार योगशास्त्र—आदि व सांप्रदाय ग्रंथ आहेत. श्रीशाहादत्ताची चारीदिशेची स्थानें श्रीसंह्याद्री, सिव्हाद्री, व माहूर, मातापूर, हीं सर्व नांवें माहुरासच आहेत.

माहूर हें मुख्य स्थान त्रिकालाबाधित असून भूमनगर, शाहागुहा, शाहाडोंगर,रायचुर,आनिगुंदी, घारेश्वर, जतडोटनूर, भागानगर, कल्याण, कलबुर्गा, कपोतपर्वत, गलगली, राणीबिंदुरी, उत्तरेस बुढणबाबाचा पहाड, वगैरे ठिकाणें आहेत. काशी, अमृतसर, केदार, सिद्धनागेश्वर, श्रृंगेरी, श्रीरंगपट्टण, दौलताबाद, राजनगर, चौल, कोल्हापूर, गिरनार, लोशीमठ, जगन्नाथ, रामेश्वर, द्वारका, नरसिंहवाडी, गाणगापूर, पिठापूर, औदुंबर, पंढरपूर, अनुसया, कुंभेश्वर वगैरे पुष्कळच ठिकाणें आहेत परंतु विस्तारभयास्तव त्यांची माहिती देत नाहीं. आतां मठांची माहिती येणेंप्रमाणें:—भूम, चोपडें, सिंदखेडें, सिद्धपूर, कर्नाटक, व तेलंगणाकडेही मठ पुष्कळ आहेत. नागपूर प्रांताकडे व निरंजन माहुराकडे पुष्कळ सांप्रदायिक अद्याप आहेत. तसेंच वऱ्हाडामध्येंही आहेत. आणि कृष्णातीरीं आणि गंगातीराकडेही आहेत. मार्गशीर्ष पौर्णिमेस माहुरास उत्सवाकरितां सर्व मठांतील महंत येत असतात. भूम, चोपडें, सिंदखेड, सिद्धपूर वगैरे ठिकाणचे मठ नामशेष आहेत. त्यांत चोपडें येथें परंपरा मात्र कायम आहे. परंतु प्रचलित मार्ग नाहीं. ह्याप्रमाणें माहिती जी यथाशक्ति मिळाली ती दिली आहे.

## आरती.

**जयदेवा आनंद राजा परात्पर ब्रह्मबीजा अखंड स्वयंप्रकाशा ।**
**स्वयंसिद्ध सहजा ॥ १ ॥ ध्रु० ॥ जयदेवा० ॥**

**चैतन्य मायेच्या ताटीं । पूर्ण प्रेमाच्या ज्योति । भावाचें घृत करूनि ।**
**पंचप्राणाची वाती । जयदेवा० ॥ २ ॥ ध्रु० ॥**

**मन हा धूप जेथें । उधळिला निजभक्ति । देह हें धुपाटणें करूनी ।**
**ओवाळूं गुरुमूर्ति ॥ ३ ॥ ध्रु० ॥ जयदेवा० ॥**

**नकळे पार तूझा। स्वयंज्योति निराकारा। शिव ना शक्ति जेथें। निरालंब निराधारा ॥ ४ ॥ ध्रु० ॥ जयदेवा० ॥**
**काय मी रंक तेथें। वेदही मौन्य जेथें। वर्णूं तूज दातारा। आनंद रूपा अमरा ॥ ५ ॥**
**जीव शिव ऐक्य जाले। मीपणा ठाऊ नूरे। पूर्ण आनंदरूपा स्वयंप्रबोधदीपा ॥ ६ ॥**
**सद्गुरु कृपाळ जाले। माझ्या चुकल्या जन्मखेपा। आत्माराम शरणागत। धन्य सद्गुरु बापा ॥ ७ ॥ जयदेवा० ॥**

आतां त्यांनीं केलेले कांहीं चमत्कार देऊन हें संक्षिप्त चरित्र पुरें करूं. त्यांचें ओवीबद्ध चरित्र सदानंद यांनीं केलेलें आहे व ग्रंथही बराच असावा. परंतु आमचे दुर्दैवानें तुटक तुटक ग्रंथ फारच थोडा मिळाला, त्यावरून हें अल्प चरित्रलेखन केलें. ह्यांत अतिशयोक्ति किंवा स्वकपोलकल्पित कांहीं नाहीं. कागदपत्र आणि सनदा व गाथा व चरित्रें वगैरेवरून लिहिलें आहे. चमत्कारः—सिंदखेड हें पूर्वीं राउळाचें राजधानीचें गांव होतें व अद्यापही तेथील राऊळ कायम असून गढी वगैरे राउळाचे वंशाकडेच आहे. तो राऊळ परमार्थाकरितां श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी यांस अनन्य—काया वाचा मनेंकरून शरण झाला. व त्यावर श्रीस्वामींनीं कृपा केली. त्या वेळीं त्या गांवांत पाण्याचा अत्यंत दुष्काळ होता. तेव्हां कृपावंत स्वामीस प्रार्थना केली कीं, पाण्याचा फार दुष्काळ असून जें पाणी आहे तें फारच खारट. त्यामुळें प्रजेस फार दुःख होत आहे. अशीं करुणोत्तरें ऐकून स्वामींनीं तात्काळ नदीचाप्रवाह आणून सर्वांची आपदा दूर केली. कांहीं दिवसांनीं त्या नदीच्या वेगांत मूल वाहून गेलें. म्हणून महाराजांस पुन्हां सांगितलें. तेव्हां पालथी वहा म्हणून नदीस आज्ञा केली,

तेव्हांपासून ती पालथी वहात आहे. पुन्हां पाण्याची गैरसोय आहे म्हणून प्रार्थना केली. त्या वेळीं एका रात्रींत मोठी विहीर खणून अमोघ आणि अमृततुल्य पाणी दिलें ती विहीर अद्याप स्वामीचें नांवानें ओळखली जाते. हल्लीं तेथें कोणी पुरस्कर्ता नसल्यानें ती विहीर नादुरुस्त आहे. तेथील मठही नामशेष आहे. मात्र स्वामींच्या समाधीचा चमत्कार असा आहे कीं अद्याप कोणीही बाई प्रसूतीसमयीं अडली तर समाधीचें पाणी आणिलें म्हणजे तात्काल सुटका होते. स्वामींचे समाधीजवळ श्रीदत्ताचे मूर्तीची स्थापना राउळानें करून श्रीदत्तजयंतीस उत्सव सुरू केला आहे. स्वामीचा आणि श्रीदत्ताचा संवाद होत असे. त्या जागेवर मोरपिच्छाचा ध्वज असून कार्तिक शुद्ध पौर्णिमेस उत्सव होतो. यांचे समाधीचे पुष्कळच चमत्कार आहेत, पण ते दंतकथात्मक असल्यानें लिहिले नाहींत. शिंदखेड हें तापीमाहात्म्यांत शिवक्षेत्र म्हणून म्हटलें आहे, तें कां असें स्वामीस विचारलें, त्या वेळीं स्वामींनीं श्रीशिवास जें भस्म लागतें तें येथें अमोघ असून येथें पूर्वीं अनंत यज्ञ झाले आहेत, असें सांगितलें. परंतु साक्ष काय? तेव्हां नदीचे किनाऱ्यावर स्वामी जाऊन उभे राहिले व खोदण्यास सांगितलें. खोदतांच उत्तम सुगंधीयुक्त आणि यज्ञद्रव्ययुक्त भस्म मिळालें. तेव्हांपासून अद्यापपावेतों भस्म निघत आहे, व तें सुवासिकही आहे. हें प्रत्यक्ष आणवून पहावें. मी सर्वतोपरी तेथीलच भस्म लावित असतों व त्यायोगें जें सुख होतें त्याचा अनुभव मला शब्दांनीं सांगतां येत नाहीं. करितां जे सद्भक्त आहेत त्यांणीं अनुभव घ्यावा. स्वामीचा समाधिकाल शके १६९२ चे सुमारास असावा असें वाटतें. कारण श्रीआनंदसार हा ग्रंथ श्रीआत्मारामस्वामींचेच समक्ष शके १६९१ संवत् १७८६ त त्यांच्याच सान्निध्यांत झाल्याचें श्रीमत्परमहंस सदानंदस्वामी लिहीत आहेत. माघ शु० १९

दोन प्रहरीं सर्व देवतांसमक्ष श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी समाधींत जाऊन बसले (ज्याप्रमाणें श्रीज्ञानदेवांस श्रीविठ्ठलांनीं समाधि दिली.) त्या वेळीं श्रीशाहदत्तानें प्रत्यक्ष मलंगवेषानें येऊन स्वामींस समाधि दिली आणि वर बांधून घेण्यास आज्ञा दिली त्याप्रमाणें समाधि बांधून घेतली. त्या वेळीं स्वरूपज्ञान राउळासच झालें. श्रीदत्त-महाराजांचें आगमन त्यास कळलें व त्याणेंच श्रीची प्रार्थना केली कीं आपण ही येथें वास करावा. ती विनंति प्रभूनें मान्य केल्यावर तेथें औदुंबरवृक्ष उत्पन्न झाला. अद्याप त्याचें खोड आहे. अनुष्ठानी लोकांस साक्षात्कारही होत आहेत. ह्याप्रमाणें सिंदखेडें येथील समाधींत जागृत असणारे व भक्तांस संकटांतून दूर करणारे श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी प्रत्यक्ष भेट देणारे आहेत. हें अल्पचरित्र त्यांचेच कृपेनें यथामति लेखन केलें, तें त्यांचे चरणीं अर्पण करीत आहें.

---

# श्रीमत्परमहंस सदानंदस्वामी.

॥ *श्लोक ॥

**सदानंद स्वामी गुरूराज मूर्ती ॥**
**गिरी चिंतितो आत्महितार्थ युक्ती ॥**
**सदासर्वदा वारिलीसे उपाधी ॥**
**स्वहिताची झाली निरूपाधि सिद्धी ॥ १ ॥**

**विठ्ठलगिरी.**

सदानंद, सीतलनाथ, दादामिया व मुस्तफा या चौकडीपैकीं चरित्रनायक हे आद्य प्रसिद्ध साधु होत. या साधुश्रेष्ठानें औरंगजेब

* हा श्लोक विठ्ठलगिरीकृत सदानंदचरित्रांतील आहे.

बादशाहाला गोमांसाची चारोळी करून दाखविली होती आणि विजापूरच्या स्वारींत औरंगजेबाला पडलेल्या स्वप्नाचें स्मरण देऊन अपल्या साधुत्वाबद्दलचा त्याचा संशय नाहींसा केला होता, अशी कथा विठलगिरीकृत सदानंदचरित्रांत आहे. या साधुश्रेष्ठानें एकदां कांहीं चोरांस स्वप्रतापानें आंधळें केलें होतें तेव्हां त्यांस पूर्ण पश्चात्ताप झाल्यावर ते स्वामीस शरण गेले व त्यांपैकीं एक धीवर स्वामीचा शिष्य बनला. त्याच धीवरानें श्रीमत्परमहंस श्रीशंकराचार्य श्रृंगेरी मठाधिपती हे चोपड्यास येत असतां, त्यांच्याशीं आत्मतत्त्वाविषयीं बराच संवाद करून स्वगुरूविषयींचा आदर श्रीशंकराचार्यांचे हृत्पटलांत प्रकाशित केला अशी कथा आहे. कांहीं गोष्टींबद्दलचे चमत्कार श्रीमत्परमहंस श्रीआत्मारामस्वामीचे चरित्रांत आलेच आहेत.

सदानंदस्वामीच्या पूर्वजाचें मूळचें उपनांव उपासनी असें होतें. हें उपनांव पडण्याचें कारण असें आहे कीं त्यांचे पूर्वज तीव्र गणपत्युपासक होते. हे मूळचे चंद्रनगर ( चांदा ) कडील असावे असें वाटतें कारण यांची कुळदेवी व गणपती या देवता तेथेंच आहेत. यांचे पूर्वज शके १४०० चे सुमारास श्रीक्षेत्र वाई येथें कृष्णातीरीं येऊन राहिले होते. त्या पूर्वजाचें नांव महादेवभट उपासनी असें होतें. या महादेवभट उपासनीनें श्रीक्षेत्र वाई येथें बरींच वर्षें वास केला होता. त्यांच्या अंगीं वसत असलेल्या विद्वत्तेमुळें व सद्गुणामुळें त्यांना श्रीशंकराचार्य श्रृंगेरीमठ यांजकडून धर्माधिकारित्वाचा अधिकार मिळाला होता. खानदेशांतील धरणगांवीं ते वारंवार येत जात असत. धरणगांवीं त्यांची बरीच छाप ब्रह्मवृंदावर पडली होती. ब्रह्मवृंदाकडून त्यांना धर्माधिकारित्वाचा मान मिळत होता. व पुढें तीच वृत्ति पोषणोपाय

झाल्यानें धरणगावीं त्यांचें वास्तव्य झालें. सदानंद यांनीं गृहस्थाश्रमाच्या मार्गांतून ज्ञानमार्गाकडे वळण्यासाठीं तीव्र अयाचित वृत्तीचा सोपानपंथ स्वीकारिला व कडकडीत वैराग्य धारण करून चोपडेगांवीं येऊन राहिले. त्या वेळेपासून त्यांना सर्व जन 'अयाचित' असें म्हणूं लागले. व हेंच त्यांचें उपनांव झालें. हल्लीं त्यांचे वंशज आपले नांवाला अयाचित हेंच उपनांव जोडित असतात. महादेवभट उपासनी हे माध्यंदिन शाखेंतील वत्सगोत्री पंचप्रवरी ब्राह्मण होते. हे फार कर्मठ असून धर्मनिष्ठ होते. यांस दोन मुलगे होते. वडील मुलाचें नांव गणपती उर्फ गमा; व धाकट्याचें परमानंद उर्फ पमा. गणपती यांस मधुसूदन नामें मुलगा झाला. परमानंद याचे कन्येचा वंश आहे. महादेव भटजीनें उत्तरवयांत चतुर्थाश्रम स्वीकारून संन्यासदीक्षा घेऊन त्रिवेणीसंगमीं श्रीक्षेत्र प्रयाग येथें आपल्या जड देहाचें विसर्जन केलें. त्यांचा वडील मुलगा गणपती हाही आपले वडिलांप्रमाणें विद्वान्, कर्मठ, धर्मनिष्ठ होता. त्यानेंही आपले वडिलांप्रमाणें चतुर्थाश्रम घेऊन समाधि घेतली व पुत्र मधुसूदन यास धरणगांवीं राहून चालत आलेली धर्माधिकारी वृत्ति चालवावी अशी आज्ञा केली. त्या आज्ञेप्रमाणें मधुसूदन धरणगांव येथें राहूं लागला. मधुसूदन यांस चिंतामणी नांवाचा एक मुलगा गजाननाचे प्रसादानें झाला. हाही उत्तम विद्वान् व कर्मठ होता. यानें धर्मशास्त्र, श्रौत, ज्योतिष आणि वैद्यक वगैरे विषयांवर उत्तम ग्रंथरचना केली. त्याच चिंतामणीला वंशोद्धार करणारा एक सुपुत्र झाला. तोच चरित्रनायक सदाशिव उर्फ सदानंद होय. याचा जन्म शके १५८६ चे सुमारास झाला असावा. चरित्रनायक शिशुत्वापासून बालोन्मत्त स्थितींतच राहत असत. त्यांचा व्रतबंध झाल्यानंतर त्यांनीं स्वशाखोक्त संहिता, ब्राह्मण, श्रौत व काव्यालंकार,

न्याय, मीमांसा वगैरे शास्त्रांचें उत्तम अध्ययन करून आपले वयाचे विसावे वर्षापर्यंत तीव्र ब्रम्हचर्यव्रतानें ते राहिले. पयोष्णी कांठीं ते कांहीं दिवस अनुष्ठान करून होते. तेथें असतां त्यांनीं श्रौतावर बरेंच ग्रंथलेखन केलें. हें शके १६२३ चे सुमारास पूर्ण झालें असावें असें त्या ग्रंथावरून दिसून येतें. त्यानंतर वडिलांचे आज्ञेनें ते धरणगांवीं येऊन राहिले व गृहस्थाश्रमी झाले. वडिलांचा वृद्धापकाळ झाल्यामुळें त्यांच्या सेवेंत राहून व त्यांचा आशीर्वाद संपादून त्यांच्या सहवासांत त्यांच्या निधनापर्यंत राहिले. त्यांचे पश्चात् श्रौत घेऊन आपली धर्माधिकारीपणाची वृत्ति चतुर्भुज शुक्र परमानंद यांचे कन्येचे वंशांतील ब्राह्मणास अर्पण करून आपण तापीतीराजवळ श्रीरामेश्वर क्षेत्र म्हणून महादेवाचें जागृत स्थान आहे तेथें येऊन राहिले. तेथें रामेश्वरासन्निध श्रौतस्मार्तविहित कर्मानुष्ठान करून उग्र तपश्चर्या केली. त्यायोगें रामेश्वर प्रसन्न होऊन सदाशिव उर्फ सदानंद यास साक्षात्कार केला कीं तुला श्रीदत्तात्रयवरप्रदानानें आध्यात्मप्राप्ति होऊन तूं जीवन्मुक्त होशील. ही आज्ञा झाल्यानंतर सदाशिव धर्माधिकारी तेथून माहुरास गेले. व तेथें सर्वतीर्थावर आश्रम करून पूर्ववत् अनुष्ठान करूं लागले. कांहीं दिवसांनीं श्रीदत्तात्रय महाराज प्रसन्न होऊन त्यांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन आणि वरदहस्त मस्तकीं ठेवून प्रसादचिन्ह पादुका त्यांस दिल्या. कलियुगांत मी शाहादत्त आलमा प्रभु या नांवानें उभयदश्य अवतार घेऊन भक्तजनांचा उद्धार केला आणि आनंदप्रभूस शिष्य करून आनंदमार्ग स्थापन केला. त्या सांप्रदायापैकीं परम भक्त श्रीमत्परमहंस आत्माराम स्वामी यांचेकडे जाऊन उपदेश घेऊन जीवन्मुक्त हो अशी श्रीदत्तात्रयांनीं आज्ञा केली. त्या आज्ञेप्रमाणें सदाशिव धर्माधिकारी हे सिद्ध-

पुरास गेले. त्या वेळचें वर्णन त्यांनीं कविताबद्ध केलेलें श्रीमत्परमहंस आत्माराम स्वामीच्या चरित्रांत दिलें आहे.

सिद्धपुरास गेल्यानंतर सदाशिव उर्फ सदानंद यांस सद्गुरु आत्माराम स्वामी यांचा उपदेश होऊन ते कृतार्थ झाले. पुढें गुरुसदनीं गुरूचे सेवेंत कांहीं दिवस घालवून गुरुसमेत धरणगांवीं आले. तेथें धांगोबा गणेशाचें सिद्धस्थान आहे त्या ठिकाणीं ही गुरुशिष्याची जोडी वास्तव्य करूं लागली. त्या वेळीं श्रीजनार्दन एकनाथ ही गुरुशिष्य जोडी श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी व सदानंदस्वामी या रूपानें भूतलावर अवतीर्ण झाली कीं काय असें सर्वांस वाटूं लागलें. आनंद ब्रह्मेति या उपनिषद् वाक्यावर आनंदबोध नांवाचा एक प्राकृत ग्रंथ श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी व सदाशिव उर्फ सदानंद यांच्या संवादात्मक आहे. तो सुमारें १५०० ओव्यांचा आहे. त्या वेळीं सदाशिव धर्माधिकारी यांनीं 'सदाशिव त्रिप्रेवेडा' 'सदानाथ—शिवविप्र' अशाही नांवांचा आपल्या स्फुट कवितेंत उल्लेख केलेला आहे. श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी यांचे पट्टशिष्य दोन होते, पैकीं एक शंकरगिरी यांचा मठ मोंगलाईत किवळ गांवीं आहे. शिवाय कोळंबी डोंगरगांव धोलें पिंपरी येथें शिष्यपरंपरा असून आनंदसांप्रदायाप्रमाणें वर्तन चालत आहे. दुसरे शिष्य सदाशिव उर्फ सदानंद यांचा मठ चोपडें येथें असून तेथें त्यांचा वंश व शिष्यपरंपरा अद्याप कायम आहे. किवळ हें गांव तालुके सारवाड, जिल्हा नांदेड इलाखा औरंगाबाद येथें आहे. हरबळ वगैरे ठिकाणीं मठ आहेत. किवळ येथील मठाधिकारी बाळगीर माहाराज हे हल्लीं परमहंसदीक्षेंत असून महासिद्ध आहेत. सदाशिव उर्फ सदानंद यांसह श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी हे चोपड्यास शके १६२८।२९ चे सुमारास आले त्या वेळीं तेथें मुमुक्षु स्थितींत साधकयोगानें सीतलनाथ,

दादामिया, मुस्तफामिया हे होतेच. या त्रिकुटींत आत्माराम स्वामी येऊन पडल्यामुळें चौकडी झाली त्यामुळें सदरहू गांव फारच रमणीय आनंदाचें माहेरघर बनलें. व भूलोकीं मुक्तिसाधनाचें आग्रस्थान शोभूं लागलें. याविषयीं दयानंद यांचा शिष्य दत्तवरद विठ्ठलगिरी यानें फार मजेदार वर्णन केलें आहे तें दयानंद यांचे चरित्रांत देण्याचा विचार आहे. पूर्वी सदरहू गांवांत चार टोंक होते व चारही टोंकावर हे चार साधु वास्तव्य करूं लागले म्हणून या गांवाला चौपाडा म्हणत असत. पुढें औरंगजेबास साक्षात्कार झाल्यावर त्यानें या गांवाचें नांव मुस्तवाबाद असें ठेविलें. हल्लीं त्या गांवास दोन्ही नांवानें ओळखतात. चोपड्यास असतां सदानंदस्वामी यानीं श्रीगुर्वाज्ञेनें तीव्र वैराग्यदीक्षा—अयाचित वृत्ति धारण करून कालक्षेप केला. त्या वेळीं त्यांनीं एक कवीत केलें आहे तें असें:—

दोहा.

**वतन छोडे अवतन भये फिरत दारोदार ॥**
**अब गुरुकृपा प्रगट भई सदानंद उतरो ये भवपार ॥ १ ॥**
**हम् तो ब्रह्मदेशके वासी यहांके नही निवासी ॥**
**कछु थोडी बाकी उधायके सदानंद पावेगा अविनाशी ॥ २ ॥**
**साई घटघट भऱ्या हये आप नयन पछान ॥**
**दरसतुरत पावेगा सदानंद हये जमान ॥ ३ ॥**

ह्याप्रमाणें सदानंद संसारनिवृत्त होऊन अयाचित वृत्तीनें वास्तव्य करूं लागले व श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी हे सिंदखेड जि. खानदेश येथें बालोन्मत्त स्थितींत राहूं लागले. प्रसंगानुसार पट्टशिष्य सदानंदाकडे ते वारंवार येत जात असत. कांहीं दिवसांनीं शके१६२९चे सुमारास दिल्लीपति औरंगजेब बादशाहा दक्षिणेकडे येत असतां मध्यं-

तरी चोपडयाजवळ त्यानें मुक्काम केल्याचें श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी यांचे चरित्रांत कळविलेंच आहे. त्याप्रमाणें सदानंद यांनीं बादशाहाकडून झालेला सर्व छळ सहन करून त्यांत श्रीसद्गुरूच्या आज्ञेप्रमाणें नाना चमत्कार दाखवून विजापुरचे स्वारींत बादशाहास पडलेल्या स्वप्नाचा उल्लेख केला. सदरहू स्वप्न औरंगजेब यास विजापुर सर करून परत येत असतां मध्यंतरीं आलमा प्रभूचें ठिकाण लागतें त्या ठिकाणीं पडलें होतें. सदरहू स्थळीं मुसलमान, लिंगायत, ब्राह्मण, संन्यासी वगैरे सर्व धर्मांचे लोक प्रभूचे पादुकांची सेवा करतांना पाहून बादशाहा साश्चर्य होत्साता प्रभुपादुकासमीप गेला. व पाहूं लागला तों असा चमत्कार त्याचे नजरेस आला कीं, प्रभुपादुकांपैकीं एका पादुकेंत पंजार व दुसरींत पावडी, असें पाहून विस्मयसागरांत तो उचंबळूं लागला व तेथें त्यानें सर्वांना सांगितलें कीं येथें मुसलमानानेंच पूर्ण हक्कानें वागावें. असें सांगून ओंजळभर जाईचीं फुलें घेऊन श्रीअलमा प्रभूच्या पादुकांवर टाकलीं. तों असा चमत्कार झाला कीं त्या फुलांचे अनंत विषारी भुंगे होऊन औरंगजेबाचे सैन्यांत व त्याच्या स्वतःच्या राहण्याच्या गोटांत शिरून सर्व सैनिकांला व बादशाहाला त्यांनीं त्राही त्राही करून सोडलें. तेव्हां बादशाहा विनम्र होऊन श्रीपुढें जाऊन निमाज पढून अनन्यभावें शरण गेला व क्षमा मागितली. त्या वेळीं जिकडे तिकडे स्वस्थता झाली. त्याच रात्रीं बादशाहास स्वप्न पडलें कीं तुला माझें ज्ञान करून देणारे साधु जेव्हां भेटतील त्या वेळीं तुझा अंतकाळ समीप आला असें समजून माझ्या सान्निध्याला ये. हें स्वप्न बादशाहास सदानंदस्वामी यांनीं सांगितल्याबरोबर त्याच्या हृदयांत चक्क प्रकाश पडला. नंतर बादशाहा दोन महिने चोपड्यास राहून तेथें त्यानें मुस्तफा-

मिया यांचा उपदेश घेतला. आत्मारामस्वामीकडून जे कलमे व वजुद नामावळी आली ती मुस्तफासाहेब यांनीं बादशाहास देऊन त्यास जाण्याची आज्ञा केली. त्या आज्ञेप्रमाणें बादशाहा दौलताबादेनजीक रोझ्यास आला, कारण श्रीशाहादत्ताचें सिंहासन देवगिरी उर्फ दौलताबाद येथें आहे. दौलताबाद येथें श्रीजनार्दन व एकनाथ यांस श्रीदत्तात्रय यांनीं मलंगवेषानें दर्शन दिलें आहे. व अद्यापीही सद्भाविक भक्तास तेथें साक्षात्कार होत असतो हें सर्वश्रुत आहे. पुढें शके १६३० त सदाशिव धर्माधिकारी यास श्रीगुरुकृपेनें एक मुलगा झाला त्या वेळीं गुप्त वाणी झाली कीं हा पुढें सिद्ध होऊन भक्तजनाचा उद्धार करील त्याप्रमाणें दयानंद या नांवानें तो प्रसिद्ध झाला. त्यानें अनेक संगीत काव्यरचना व संस्कृत ग्रंथरचना केली. यानें बाळाजी जनार्दन उर्फ नानासाहेब फडनवीस यास उपदेशपर पद्य कल्न देऊन उपदेशामृत पाजिलें. चोपडें हा गांव त्या वेळीं नानासाहेब फडनविस यांचे जहागिरीचा असून या साधूची महती त्यांस माहितच होती. म्हणून त्यांस विनंती केल्यावरून त्यांनीं पद्य करून पाठविले. हेही सदानंदाप्रमाणेंच जिवन्मुक्त होते. त्यांचें वर्णन प्रकाशानंदादि त्यांच्या शिष्यवृंदांनीं केलें आहे तें त्यांचें चरित्रांत येईल.

सदानंद यांनीं आपले वयाचे ६९ वर्षाचे सुमारास चतुर्थाश्रम घेतला. तेथपर्यंत ते अयाचित वृत्तीनेंच राहिले. संन्यासदीक्षा घेतल्यानंतर मठ, गादी व श्रीच्या पादुका स्थापन केल्या. एके काळीं श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी, मुस्तफा साहेब, सितलनाथ, दादामिया, सदानंद आदि सर्व संतमंडळी ब्रम्हवृंदसमेत बसून आनंदप्रकाशव्याख्यानिरूपण करीत असतां श्रीशाहादत्त मलंग वेषानें

बरोबर कुत्री घेऊन आले. त्यांना पाहतांच स्वामी आत्माराम यांनीं उत्थापन देऊन त्यांना गादीवर बसविलें आपण व संतमंडळी—शिष्यवर्गासमेत कर जोडून उभे राहिले. बाकीची सर्व मंडळी चित्रासमान स्तब्धच वसून राहिली. श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी, सदानंद, मुस्तफा साहेब, दादामियादि श्रीशाहादत्तपदकमलीं भ्रमराप्रमाणें मिलिंदमान झाले त्या वेळीं श्रीशाहादत्त सुप्रसन्न होऊन 'पुरनपोळी चाहिये' असें म्हणूं लागले. त्या बरोबर महान् पतिव्रता गयाबाई—सदानंदाची भार्या हिनें—गुर्वाज्ञेप्रमाणें उत्तम पुरणपोळ्या तयार करून आणिल्या व श्रीशाहादत्ताचे खर्परपात्रांत घातल्या व प्रभु शाहादत्ताचे सान्निध्यांत विनम्र होऊन स्तुति करीत उभी राहिली. इकडे श्रीशाहादत्त प्रभु—मलंग वेषधारी—यांनीं कुत्रीचें दूध काढून त्या दुधांत पुरणपोळी कुसकरून ती आनंदानें खाऊं लागले. त्यांतील प्रसाद म्हणून श्रीआत्मारामस्वामी, सदानंद, मुस्तफा साहेब, दादामिया, सीतलनाथ या पांचजणास कांहीं अंश दिला व आपण तेथेंच अदृश्य झाले. त्या गोष्टीची खूण म्हणून तेथें मोठा ध्वज उभारला आहे. त्या ठिकाणीं दर वर्षास कार्तिक शुद्ध पौर्णिमेस ध्वजारोपण होत असतें आणि मोठा उत्साह होत असतो. हा उत्सव अद्याप चालू आहे. या उत्सवांत सात दिवस भागवतसप्ताह होऊन पौर्णिमेस अरुणोदयीं ध्वजारोपण होत असतें व गांवसंतर्पण होत असतें. त्या वेळीं प्रभूचा साक्षात्कार भक्तजनास अद्याप देखील होत असतो. बाकीची मंडळी स्तब्ध राहिल्याचें मागें लिहिलेंच आहे. श्रीशाहादत्त प्रभू गेल्यावर ती मंडळी शुद्धीवर आली व मलंगवेषधारी कोण होते याची चौकशी करूं लागली; तेव्हां श्रीशाहादत्त प्रभू मलंगवेषानें आल्याचें सदानंद यांनीं कळविलें. हें ऐकून भाविक

भक्तांचे डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले. कित्येक कुत्सित जन होते ते मुसलमानाचा प्रसाद सदानंद यांनीं खाल्लयाबद्दल आपसांत कुजबजू लागले. त्यांत एक ढोबळे या आडनांवाचा मोठा विद्वान् ब्राम्हण होता त्यास वैषम्य वाटून त्यानें लगेच श्रृंगेरीमठस्थ-शंकराचार्य यांजकडे एक ब्राह्मण पाठविला. तेव्हां शंकराचार्य खानदेशांतील धरणगांवीं मुक्कामाला होते. सदर ब्राह्मणाबरोबर श्रीशंकराचार्य यांस ढोबळे यानें असा संदेश पाठविला कीं अधर्म होत आहे याजकरितां आपण समक्ष येऊन सदानंदास प्रायश्चित्त द्यावें. कारण सदानंद मोठा विद्वान् आणि अयाचित वृत्तीनें निस्पृह राहून ईश्वरभजनांत कालक्षेप करीत असतो—असा महान् साधू आहे. त्याचा गुरु संन्यासी आहे. त्या गुरूचे शिष्य मुसलमान, लिंगायत, नाथगोसावी व ब्राह्मण वगैरे आहेत. सदानंद यानें मलंगाचे हातचा प्रसाद घेऊन भक्षण केलासें वाटतें. याकरितां श्रीनीं येऊन त्यांचा हा अधर्मपर मार्ग उच्छेद करून सद्धर्म स्थापून त्याला प्रायश्चित्त देऊन शुद्धीवर आणावें अशी प्रार्थना आहे. वरील संदेश ऐकिल्यावर शंकराचार्य यांनीं धरणगांवकर ब्रह्मवृंदास सदानंदाविषयीं माहिती विचारिली. तेव्हां ब्रह्मवृंदानीं सांगितलें कीं सदाशिव धर्माधिकारी हा मूळचा याच गांवचा रहिवासी आहे त्यास श्रीदत्तात्रय प्रसन्न आहे व श्रीमत्परमहंस आत्मारामानंदस्वामी यांचा उपदेश घेऊन अयाचित वृत्तीनें तो चोपड्यास राहत असतो तोच हा सदानंद होय. नंतर श्रीशंकराचार्य चोपड्याला येण्याकरितां निघाले. आणि धरणगांवापासून पांच कोसांवर नांदेड म्हणून एक गांव आहे तेथें मुक्कामाला राहिले. दुसरे दिवशीं तेथून चोपड्यास यावयास निघाले. रस्त्यांत श्रीतापी नदी आहे. तिला उतार नसल्यामुळें पैलपार

होण्यासाठीं एक नाव पाहून त्या नावेंत श्रीची स्वारी व मंडळी बसली. त्या नावेवर त्या वेळीं जो नावाडी होता तो मागें वर्णन केलेल्या चोरांपैकीं एक धीवर डोंगरजी ज्यानें सदानंदाचा उपदेश घेऊन शिष्य बनला होता तो होता. नाव वल्हवीत असतां त्या भाविक धीवरानें श्रीला प्रेमपूर्वक नमन करून अध्यात्म विषयावर कांहीं प्रश्न केला. तो प्रश्न ऐकून शंकराचार्यांस फार कौतुक वाटलें व त्यांनीं धीवरास म्हटलें कीं तुला हें अध्यात्मज्ञान कसें व कोणापासून मिळालें? त्यावर धीवरानें सांगितलें कीं माझे परमपूज्य सद्गुरु सदानंद महाराज यांच्या कृपेचें हें फळ आहे. नंतर पैलतीरीं आल्यावर शंकराचार्य यांनीं एकांतीं त्या धीवराशीं कांहीं अध्यात्म विषयावर संवाद केला तेव्हां त्यांची खात्री झाली कीं हा नीच जातीचा असतां सदानंदाचे उपदेशानें इतका ज्ञानी बनला आहे तर सदानंदाविषयीं संशयास जागा नाहीं. अशी मनाची खात्री झाल्यावरून तेथूनच ढोबळे शास्त्र्याकडून आलेल्या ब्राह्मणास शंकराचार्यांनीं पत्र लिहून दिलें. त्यांत असें लिहिलें होतें कीं सदानंद हे मत्स्वरूप असून सदैव पवित्र आहेत, त्यांना प्रायश्चित्ताची आवश्यकता नाहीं. पूर्णावस्थेप्रत पावलेल्या ज्ञान्याचें कर्म मायांध अज्ञानाला समजणें फार कठिण आहे. त्याला प्रत्यक्ष श्रीदत्तात्रय यानें मलंगवेषानें दर्शन देऊन प्रसाद दिला. तुम्ही पापी असल्यामुळें त्या वेळीं शुद्धीवर नव्हतां. मायावश मूढाला परेशाची लीला काय कळणार? सदानंद हे सदैव शुद्ध आहेत. त्यांना अशुद्ध म्हणतील त्या लोकांस श्रीकडून दंड केला जाईल. हाप्रमाणें श्रीचें आलेलें पत्र पाहून ढोबळेप्रभृति ब्रह्मवृंदाची खात्री झाली व तेव्हांपासून सदानंदप्रभृति संत फार प्रसिद्धीस आले. व व्यासपूजा मठाची होऊन व्यासपूजेचा मोठा उत्सव होऊं लागला तो

अद्यापपर्यंत चालू आहे. पुढें नांदेडवरून चोपड्यास न येतां परस्पर शंकराचार्य हे अडावदेस निघून चालते झाले.

सदानंद यांनीं आपले वंशाची माहिती जशी लिहून ठेविली आहे तशीच देऊन पुढचा देखील वंश आज हयात असलेल्या पिढीपर्यंत दाखविला आहे. गुरुपरंपरा मठाम्नाय याचें वर्णन आनंदसारप्रकाश ग्रंथांत ज्याप्रमाणें दिलें आहे तसेंच पुढें देत आहें.

## वंशवृक्ष.

### मूळ पुरुष.

आत्माराम उपासनी.

|

बाबाजी उपासनी.

|


| | |
|---|---|
| आन्याजी | शारंगधर |
| \| | \| |
| धनाजी | मुकुंदजी |
| \| | \| |
| दादाजी | शिवदाजी |
| \| | \| |
| केशव पंडित | निब्राजजी |
| \| | \| |
| देवाजी दैवज्ञ | चतुर्भुजजी |
| \| | \| |
| शंकरभट सोमयाजी | गंगाजी |
| \| | \| |

चिमणाभट दीक्षित
|
१ रामकृष्णभट श्रौती
|
विसाजी भटजी
|
हरबाजी भटजी
|
येसाजी
|
गडबाभट्टजी
|
सोनाजी भट्टजी
|
हर्षोबाभट
|
२ महादेवभट धर्माधिकारी
|
गमा उर्फ गणपती
|
मधुसूदन
|
चिंतामणी
|

तिमाजी
|
दामोदरजी
|
काकुजी
|
कल्याणजी
|
महादेवजी
|
कृष्णाजी
|
जेडबाजी
|
गोपजी (पाठकही म्हणूं लागले)
|
हिराजी
|
शंकरजी
|
कोंडाजी
|
बळवंतजी
यापुढें माहिती मिळत नाहीं.

---

१ रामकृष्णभट श्रौती हे वाईस राहत होते. २ महादेवभट धर्माधिकारी हे प्रथम श्रीक्षेत्र वाई येथें रहावयास गेले होते तेथून धर्माधिकारी पदवी धारण करून धरणगांवीं जाऊन येऊन राहत असत.




३ चरित्रनायक सदाशिव उर्फ सदानंद यांनीं चोपडें येथें जिवंत समाधी घेतली. ४ हरि परमानंद यांनीं काशीस देह अर्पण केला. * शिष्यसांप्रदायाप्रमाणें हरिपरमानंद यांचे कनिष्ट बंधु ज्ञानेश्वर हे पुढें गादिस्थ शिष्य झाले. ५ ज्ञानेश्वर यांची गिरिजातीरीं समाधी आहे. ६ सोपानदेव हयात (१९०९) असून त्यांचें वय ९५ वर्षांचें आहे. ते संन्यासी आहेत. गोपाळदेव हेही ब्याण्णवा जवळ जवळ आहेत. (१९१०) ८ वामन अयाचित हे रेवातीरीं निवर्तले. ९ दामोदर अयाचित उर्फ परमानंद हे सदानंदापासून वंशपरंपरेनें सहावे पुरुष आहेत. आणि शिष्यपरंपरेनें सातवे आहेत. हल्लींचे गादिस्थ सांप्रदायिक असून तात्याबोवा चोपडेकर वैद्य या नांवानें प्रसिद्ध आहेत व ते उमरावती येथें जोग धर्मार्थ दवाखान्यावर आहेत (१९०९).

मूळपुरुषापासून अवधूतपर्यंत२७पिढ्यांची माहिती दिली आहे. यांचे मठांतील गादीचे तोंड दक्षिणाभिमुख आहे.आतां दोन पिढ्यांपासून परमहंस संन्यासदीक्षा कोणी घेत नाहीं, मात्र आतुर संन्यास अद्याप घेत आहेत. येणेंप्रमाणें वंशावळ आहे. आतां गुरुपरंपरा आणि मठाम्नाय ओंवीबद्ध देऊन कांहीं स्फुट व कांहीं ग्रंथांचे उतारे देऊन हें चरित्र संपविणार आहें. सदानंद यांनीं एकंदर ग्रंथसंख्या एकलक्ष करून स्फुटही पांच हजारावर केलें आहे. सुलतान नामभेद म्हणोन यांनीं एक ग्रंथ केला आहे पण तो हल्लीं आमचे जवळ नाहीं. त्यांनीं केलेल्या ग्रंथांची यादी येणेंप्रमाणें:—

गुरुगीता टिपणी ओंव्या सुमारें ७०००; आनंदबोध ओंव्या ३५०; आनंदप्रकाश ओंव्या २०००; आनंदसार प्रकाश ओंव्या ७०००; अध्यात्मझाडा कवीत ग्रंथ ३६५; अध्यात्मविचार ४६५; मठाम्नाय संस्कृत श्लोक २५०; षट्चक्र निरूपण संस्कृत ३५; कुंडलीदोहन संस्कृत श्लोक १२५; चक्रानुक्रम संस्कृत वेदांतसार संस्कृत २००० श्लोक व टीका; हे ग्रंथ सत्कार्योत्तेजक मंडळीकडे दिले आहेत; योगवाशिष्ठसार ३६०; अपरोक्षानुभूति प्राकृत समश्लोकी; व विज्ञानसागर १५०० ओंव्या येणेंप्रमाणें ग्रथ सत्कार्योत्तेजक मंडळीकडे दिले गेले आहेत. संन्यासधर्म, शोडशनयंति, गुरुमाहात्म्य, राजयोग, मंत्रमंजूषा संस्कृत, शाहादत्तचरित्र माहात्म्य, मायास्वरूप, मुक्तिस्वरूप, आनंदानुभव, खुषरंग कवीत १०१ याप्रमाणें अध्यात्मपर तसेंच श्रौतस्मार्त धर्मशास्त्र, वैद्यक, रसवैद्यक, जोतिष, अलंकार, छंदशास्त्र वगैरेवर उत्तम ग्रंथलेखन पुष्कळ आहे. परंतु कालचक्रामुळें त्रुटित संग्रह फार झाला आहे. म्हणून विस्तारभयास्तव

आटोपतों. यांचे प्राकृत व संस्कृत ग्रंथ, त्या वेळचे काशीस्थ उत्तम विद्वान् शास्त्री व परमहंस संन्यासी वगैरे मंडळीस मान्य झाल्याबद्दल संमतिपत्रें आणि संत, साधु, कवि–वृंदास हे किती पूज्य व वंदनीय होते याबद्दलचा पत्रव्यवहार आहे त्यांतील नमुन्याकरितां पुढें अल्पसा दिला आहे. तो पाहतां हे साधु फार प्रसिद्ध होते व अध्यात्मविषयांत श्रेष्ठ असून विद्वान् असल्याबद्दल वाचक वर्गाची खात्री होईल. सदानंदस्वामीचे विद्यमान वंशज आपलें कुलदैवत देवी आणि गणपति सांगतात. सदानंदस्वामी यांनीं आपले आनंदसार ग्रंथाचे शेवटीं वंशवर्णन वगैरे केलें आहे त्यांत देखील स्पष्ट म्हटलें आहे कीं त्यांचें कुलदेवत गणपती आहे. व याबद्दल आनंदसारांतील अध्याय ९४ यांतील उतारा रा. रा. राजवाडे यांनीं राष्ट्रोदयांत दिलेला आहे म्हणून पुनरुक्ति केली नाहीं. त्यांचें उपास्य दैवत शाहादत्त आऊमा प्रभू आहे. शाहादत्त आऊमा प्रभूचें ठिकाण मोंगलाईंत भूम म्हणून गांव आहे तेथें आहे. हा भूम गांव हल्लीं राजेरंभाकडे आहे. आत्मारामस्वामीच्या आज्ञेप्रमाणें सदानंदस्वामी यांनीं चोपडें येथें मठाची स्थापना केली. व गुर्वाज्ञेनें आपले वयाचे ७९वे वर्षीं परमहंस संन्यासदीक्षा घेऊन पुढील काळ अध्यात्मविषयांत घालविला. असें सांगतात कीं त्यांनीं आपले वयाचे ९६ वे वर्षीं समाधी घेतली. जेव्हां सदानंद समाधींत स्वतः जाऊन बसले त्या वेळीं गुप्तरूपानें श्रीदत्ताची स्वारी येऊन समाधीवर चिरा ठेविला. याबद्दलची साक्ष अशी आहे कीं अद्याप एकादे वेळीं श्रीआनंद जयआनंद जय जयानंद असा ध्वनी समाधींतून ऐकूं येत असतो. सदानंदस्वामी यांची समाधी मठांतच आहे. कित्येक भाविक सद्भक्तांस यांचे समाधीचा साक्षात्कार झालेला आहे व होत आहे. पुष्कळ

सद्भक्त भाविक त्या समाधीजवळ अनुष्ठान करून साक्षात्कार पावले आहेत व पावत आहेत. सदानंदस्वामी यांच्या कवित्वाचा रसास्वाद वाचक वर्गास कांहींसा मिळावा म्हणून त्यांनीं केलेल्या ग्रंथांपैकीं वेंचक उतारे अल्पमतीनें देण्याचा मी प्रयत्न केला आहे. पुढील वेंचे वाचून स्वामीच्या अध्यात्मविषयप्राविण्याबद्दल वाचकांची खात्री होईल. त्याचप्रमाणें धांवे, अभंग, सनदा वगैरे व पत्रें इत्यादी बरींच आहेत त्यांतून थोडींशीं देण्याचा प्रयत्न केला आहे. स्वामीच्या आनंदसार ग्रंथांतील अध्याय ४१ यांतील उतारा—

आजि श्री सद्गुरू स्वामी । परंपरा सांगा निज नामी ॥
स्मरितां असावें निज धामीं ॥ अखंडतेसी ॥ ८४ ॥
बापा अनंत युगीं उपदेशिता । आनंद नामीं अनुग्रह करिता ।
ज्याची ब्रह्मादिकीं असे सत्ता । मुकुटमणी ॥ ८५ ॥
ब्रह्मपदादि ज्याच्या उपकळा। ऐसी अपार असे ज्याची लीला॥
अवतारादिकांसी निजनिर्मळा । उपदेशिता जाला ॥ ८६ ॥
चैतन्यापासूनी । कर्मभूमीसी येउनां ॥
शेषादिकां लागुनी । आनंद उपदेशु ॥ ८७ ॥
कां तया आनंदाविना । रिता ठाउ नाहीं जना विजना ॥
हा सर्वत्र गुरू एक गुरूपणा ॥ व्यापक असे ॥ ८८ ॥
जो आदि नारायण । तोहि याचा शिष्य जाण ।
श्रीशंकर जयापासून ॥ उपदेशु पावला ॥ ८९ ॥
शंकराचा वैकुंठ पति । वैकुंठ पतिचा ब्रह्मा उत्पत्ती ॥
ब्रह्माचा स्वयंभु मनुचि गति ॥ पुढा कश्यपाचा तो सूर्य ॥९०॥
एवंगत व्यास ऋषीचा शुक ॥ ऐसे वामदेवादि अनेक ॥
हे जाणावे प्रत्यक् प्रत्यक् ॥ स्वस्ववंशोपदेशी ॥ ९१ ॥

दत्तात्रयाचा सदानंद ॥ सदानंदाचा रामानंद विशद ॥
रामानंदाचा प्रसिद्ध ॥ गंभिरानंदु ॥ ९२ ॥
गंभिरानंदाचा ब्रह्मानंद पवित्र ॥
ब्रह्मानंदाचा श्रीकांतानंद विचित्र ॥
श्रीकांतानंदापासुनी नाना लीला विचित्र ॥ परंपरागत ॥९३॥
आतां कलियुगीं प्रगट ॥ श्रीशाहादत्त आलमप्रभु मणी मुकुट ॥
येणें अनंत संत उपदेशिले बरवट ॥ कान्हो कानडादि ॥९४॥
भूम नगरीं । आनंद प्रभु आचार्यीं ॥
स्थापिला उपदेशी निर्धारी ॥ आनंद बोली ॥ ९५ ॥
आनंदप्रभुहि निश्चलानंद । निश्चलानंदें बालप्रभु केला प्रबुद्ध ॥
बालप्रभुवरें अर्जुजानंद शुद्ध ॥ प्रबोधिला ॥ ९६ ॥
अर्जुजानंदें निर्मळानंद आंगीकृत ॥
निर्मळानंदें आत्माराम केला संस्कृत ॥
आत्मारामें सदानंद उपदेशित ॥ सदानंदें दयानंद हा ॥९७॥
या मध्यगत अर्जुनानंदाचे ॥ दुसरे आनंदप्रभु वैभवाचे ।
निश्चलानंद स्वामीचे ॥ शंकरानंद पुत्र ॥ ९८ ॥
यावरि आनंद भक्त अपार । सांगतां होईल ग्रंथविस्तार ॥
स्मरावा आतां निरंतर ॥ श्रीआनंद जयानंद ॥ ९९ ॥
अतःपर श्रीआत्मारामनंद ॥ हा सद्गुरू परम सुखद ॥
याचा शिष्य सदानंद निर्द्वंद्व ॥ असता जाला ॥ १०० ॥
आजि धन्य धन्य तुम्ही कृपानिधि ॥ मज परंपरागत या बोधीं ॥
उपदेशीले आत्मशुद्धि ॥ कृपा करूनियां ॥ १०१ ॥
आजि हे तुमची पूर्ण कृपा ॥ दाखविलें आनंदस्वरूपा ॥
पावलों......... ॥ .........मोक्षपदीं ॥ १०२ ॥

तुम्ही सद्गुरू दातार । तुमचें उत्तीर्ण कायि व्हावें अतःपर ॥
मस्तक द्यावें श्रीचरणावर ॥ सद्भावेंसि ॥ १०३ ॥
सद्भावासि तुम्हीच उपजविते । या अंतरीं तुम्हीचि राहते ॥
तुम्हावांचुनी शरण कवणांतें ॥ जावें स्वामी ॥ १०४ ॥
आजि आतां सांगा मठाश्रम । जेथें पाविजे पूर्ण सुखधाम ॥
संत पुसतां सांगिजे विश्राम-॥ स्थान परंपरेचें ॥ १०५ ॥
बापा जयासि स्थान ना मान । देह गेह ना अभिमान ॥
तो सर्वगत व्यापून ॥ निरंजन पैं ॥ १०६ ॥
परि तूं पुसतोसि । तरि आतां परियेसि ॥
जाणत्या दक्षिण देशीं ॥ भूम नगर असे ॥ १०७ ॥
द्वादश स्थानीं । दर्शनें दाउनी ॥
सुभक्तासि स्थापुनि ॥ विशेषी भूमवास केला ॥ १०८ ॥
परात्पर तराम्नाय ॥ मूळ भूमिका भूम नगर अद्वय ॥
तो मठ जयानंदवार संप्रदाय ॥ निर्मय पूर्वभागिं स्थान तें॥१०९॥
निरामय तें क्षेत्र । अक्षय वट तो पवित्र ॥
पूर्णयोग समाधि विचित्र ॥ अकुंठ अमृत झिरा तीर्थ ॥ ११० ॥
आत्मप्रभु दैवत । आनंद उपासना अखंडित ॥
आनंदी देवी निर्मित ॥ आनंद प्रभु आचार्या ॥ १११ ॥
विमलानंद कृष्णानंद ब्रह्मचारी ॥
आनंदप्रभ्वादि जीवन्मुक्त हे निर्धारी ॥
श्रीआनंद जय आनंद यापरी ॥
जय जय आनंद पठण सदा ॥ ११२ ॥
हा षोडशाक्षर ॥ सर्व मंत्रराज सुंदर ॥
सकळ शास्त्र वेदसार ॥ रहस्यमंत्र ॥ ११३ ॥

आनंद ब्रह्म विजानातु ॥ हा महावाक्य विचार सुज्ञात ॥
नित्या नित्य विवेकभूत ॥ पूर्णानंद साक्षात्कारी ॥ ११४ ॥
स्वआत्मा उद्धारार्थ ॥ मातृ पितृ उद्धारि परमार्थ ॥
समस्त भक्तजन तारणार्थ ॥ हे आनंददीक्षाग्रहण ॥ ११५ ॥
सदानंद दीन । हे पूर्णानंद दीक्षा घेऊन ॥
झालों स्वरूपीं परम पावन॥ या आनंदसंप्रदायमठीं॥ ११६ ॥
आजि स्वामिजी ॥ आतां सर्व संप्रदायामाजी ॥
श्रेष्ठ मठ महाराजीं ॥ सांगावा मज ॥ ११७ ॥
बापा उर्ध्व ब्रह्म निर्गुणादि । अलक्षानंदावधि विशदी ॥
षोडश कला निर्द्वंद्व ॥ प्रकाशानंद मठ ॥ ११८ ॥
पूर्णात्पूर्णतरानंद संप्रदाय ॥ अनिर्वाच्यानंद क्षेत्र अद्वय ॥
नित्यानंद तीर्थ निर्भय ॥ शाहादत्त दैवत पा ॥ ११९ ॥
पूर्ण कळा देवी । निजानंद आचार्य पदवी ॥
अखंडानंद सद्भावी । ब्रह्मचारी हा ॥ १२० ॥
ब्रह्म परब्रह्म ॥ सच्चिदानंदादि उत्तम ॥
हे मुक्त जाले परम सुगम ॥ अनिर्वाच्यानंद पठणीं ॥१२१॥
शब्दातीत अनिर्वाच्यानंद । वेद वेदांत सिद्धांत प्रसिद्ध ॥
या सारवाक्यविचारीं विशद ॥
नित्यानित्यविवेकी पावन ॥ १२२ ॥
अपरोक्ष अनिर्वाच्यानंदाचा । साक्षात्कारार्थ मार्ग परमार्थाचा ॥
आत्म उद्धारार्थ आणि मातृपितृचा॥वंशोद्धारी जाणावा॥१२३
स्वामी सदानंद या नामग्रहणी ॥ अनिर्वाच्य मंत्र सन्मनी ॥
अनिर्वाच्यानंद मठमन्यासदनीं ॥ उन्मनी सदा डुल्लतो ॥१२४॥
श्रीआनंदसारप्रकाशे गुरुशिष्यसंवादे भूमनगर अव-

तार आलमा प्रभु प्रगटीकरण पोडशकळा पूर्णावतार ध्यानांतर्गत श्रीशाहादत्त पूर्णानंदस्वरूप गुरुपरंपरा मठाम्नायकथनं नाम एकचत्वारि उल्हासप्रसंगः ॥ ४१ ॥

आनंदायनमः ॥ स्वामी तुम्ही मठमन्या निवेदिली ॥
आणिक लीला कैसि वर्तलि ॥
जे श्री शाहादत्त नाम निर्मळी ॥ महिमा सांगावी ॥ १ ॥
कां या अवताराची लीला ॥ अपूर्व असे सोज्वळा ॥
हे ऐकितां कथाकळा ॥ कळिकाळा लिप्त नसिजे ॥ २ ॥
बाळा तूं धन्य सगुणाचा ॥ आयिकिजे हे सत्यवाचा ॥
अपूर्व असे महिमा प्रभुचा ॥ अद्भुत वर्णनीं ॥ ३ ॥
तूज पूर्वापर उपदेशिले ॥ ........र अवगत जाले॥
आतां पाहिजे आयिकिले ॥ सूक्ष्मदृष्टी ॥ ४ ॥
कान्हो कानडासि उपदेश केला॥ तो जिता स्वरूपीं मेळविला॥
आनकल्याण कलवरासि दाखविला ॥ उभय दृश्यावतार ॥५॥
तेथें अविद्ध सविद्ध ॥ आपुले देवाचें स्वरूप देखती प्रसिद्ध ॥
कान्हो कानडा भक्ति देव जाले प्रबुद्ध ॥
ते कपाट उघडते जाले ॥ ६ ॥
ऐसी या पूर्वस्थानीं ॥ लीला वर्तवी महा महिमानी ॥
भूमिका नगरीं विशेपें करुनी ॥ देव सांप्रत नांदती ॥ ७ ॥
अजि अपूर्व जे जे स्थाने ॥ ते तो म्या हें क्रमे आयिकणें ॥
जे अतिलीला महिमेनें ॥ अपूर्व अपूर्वी ॥ ८ ॥
बाळा शाहा डोंगर ॥ आणि माळियाचा मळा सुंदर ॥
राजनगरी शाहा गुहा तत्पर ॥ सेविता जाला ॥ ९ ॥

आद वानि रायचुर ॥ रायचुरी ते कृष्णातीर ॥
तेथुनि उत्तरीं एक कोस बाग सुंदर ॥
तेथें आलमा प्रभुची समाधि ॥ १० ॥

व्यंकटेश वाटी । कल्याण कलवरी सुभटी ॥
गलगला बेदरी मुकुटी ॥ स्थान तें असे ॥ ११ ॥

आनिगुंदी धारेश्वर स्थानीं ॥ जन कोठनूर मध्य अरण्यीं ॥
आणि त्या कल्याणपट्टणीं ॥ कपोत पर्वतीं पां ॥ १२ ॥

कृष्णातीर गलगली वाडकोडी ॥ राणीबिंदुरी सुरवाडी ॥
बुढनबावाच्या पाहाडीं ॥ मेळ कोठावाना वरतळी ॥ १३ ॥

वडवळ सिद्ध नागेशी। श्रृंगेरी मठ आरुते बुढण या नामेसि ॥
बस्वापाटणीं त्या विशेषीं ॥ नांदते जाले ॥ १४ ॥

माहुरीं अवांतर स्थानीं ॥ राहिले कितिक गुप्त सर्व स्थानीं ॥
अनंत लीला कवण वर्णी ॥ या देवाची ॥ १५ ॥

सलपान नगरी ॥ भूमनगर सुंदरी ॥
शाहामदार देश उत्तरी ॥ दौलताबादीं त्या ॥ १६ ॥

दौलताबादीं । शाहा साकडे सुलतान नाम भेदी ।
असते जाले जनवादी ॥ प्रसिद्ध पैं ॥ १७ ॥

पुढामानी कळेना । पाठिसी होद असे लीला नाना ॥
यावरी अवतार होईल त्या प्रमाणा । सांगतों तूज ॥ १८ ॥

आनंदबोध व आनंदप्रकाश हे ग्रंथ सत्कार्योत्तेजक मंडळीकडे असल्यानें त्यांच्यांतील उतारे देतां आले नाहींत. शिवाय आणखी बरेच ग्रंथ त्यांजकडे आहेत म्हणून त्यांतील वेंचे देणें झालें नाहीं.

## धावा.

दत्ता येई रे अवधूता निर्गुण मायातीता ॥
परम निजरूप तत्वता परेहुनि परुता ॥ १ ॥ ध्रु० ॥
अविद्याबंधन पडिलें हे कृपादृष्टी पाहे ॥
तूंचि संसारीं बोधमाये तुजवीण कोण आहे ॥ २ ॥
आशाबंधन निवारी झडकरी अंगीकारीं ॥
तारक परलोकीं श्रीहरी व्यापक अभ्यंतरीं ॥ ३ ॥
तुज सांगणें काय हें जाणसी प्रगट राहे ॥
सकळामाजि हे लाज आहे निष्ठूर नको होये ॥ ४ ॥
नाना भ्रांतीच्या हळहळा पडिलों ह्या तळमळा ॥
येथें ग्रासिले कळिकाळा प्रार्थितों वेळोवेळां ॥ ५ ॥
आतां तुजवीण रक्षिता आणिक नाहीं दाता ॥
चरणीं ठेवितों निजमाथा सदानंदा तारीं आतां ॥ ६ ॥

## आरती

केशवा मंगळधामा सुमंगळी पूर्णकामा ।
मंगळी मंगळरूपा मंगळ आरती नेमा ॥ ध्रु० ॥ १ ॥
तोचि तूं द्वारकेशा हरि लक्ष्मी नारायणा ॥
अवतरला कृष्णरूपी रुक्मीणीपती गोपांगना ॥ २ ॥
वृंदावनीं क्रिडा केला गोपी गोप गोपाळा ॥
मयूरपिच्छमुकुट शोभा सपत्र पुष्प वनमाळा ॥ ३ ॥
गैरिकादि अंगभूषा पीतांबर कशियेला ॥
मोहरी वाद्यनादें सुरलोक मोहिला ॥ ४ ॥
नाना लीला अवतारी भक्तजना पावन जाला ॥
संकटें निवारूनी जयजयकारू हा केला ॥ ५ ॥

जयजया वैकुंठनाथा जय पंढरीराया ॥
सदानंद सहस्रनामीं पूजि तूझिया पाया ॥ ६ ॥

विस्तारभयास्तव फारच थोडें कवित्व दिलें आहे. आतां त्यांच्याशीं झालेला त्या वेळच्या साधूंचा पत्रव्यवहार देतों.

## पैठणचे रामदीन यांचें पत्र.

स्वस्ति श्री सदानंदा । पर्यायेंसि चिन्मदा ॥
शेषीं गाळोनि श्रीपदा । सच्चिदानंदा तूंचि तूं ॥ १ ॥
आनंदी आनंद मुसावला । तोचि बोलिजे घन सावळा ॥
लीलावतार झळाळा ॥ युगपाटोळा पांघुरसी ॥ २ ॥
त्वं तत् असि अगोचर । दशम द्वार परात्पर ॥
हा सद्गुरू उपकार ॥ अति निर्धार त्रिवाचा ॥ ३ ॥
यालागीं भक्तीपुरस्सर । साष्टांगें प्रणम्य प्रकार ॥
अंगिकारीं साधुवर ॥ वरदोत्तरें तत्परें ॥ ४ ॥
बहुत दिवस वर्तले । नाहीं देखिलीं जी पाउलें ॥
म्हणूनि नेत्र भुकेले ॥ लाचावले इच्छा करती ॥ ५ ॥
येरवीं श्रीनाथकृपें । सदैव दर्शन तद्रूपें ॥
अतूट आणि अति सोपें । संत जाणती ॥ ६ ॥
विशेषें काय लिहिणें । मंदमती बुद्धिहीनें ॥
प्रत्युत्तरें आनंदविणें । रामदिनें प्रार्थिलें ॥ ७ ॥

श्रीमत्परमहंस स्वामी वाराणसी येथील

ॐ श्रीजयानंद समर्थ

श्री मन्मंगल मंगलमूर्ति परमहंसवर्य सायुज्यपदैक्य सच्चिदानंदीभूत श्रीराजसदानंदस्वामी ॥ चतुर्दश विद्या······

स्वागत निगमागम मंत्रसार साध्यासाध्यज्ञातृणामीश्वरेणोक्तं अधुना मम सान्निध्यं एहि तदानंदो जातः पुनरीश्वरेणात्मभक्त्या त्वया यद्गीतं तेन तुष्टोहं.............मम संप्रति आनंदसारप्रकाश ग्रंथ..........वेदविद्या वेदांतश्च सिद्धांतात्मात्म उच्यते ॥ ब्रह्मविद्या ईश्वरश्च परविद्या परीढळं ॥ इति विद्या चतुष्टय धर्मार्थकाममोक्ष चर्तुवर्ग समर्थ मत्प्रसादेन वक्तव्यथ तदा ग्रंथ आरंभः कृतः पश्चात्काश्यां प्रति गतश्चेतदानीं मनसरसी प्रज्ञानंदादि स्वामी तथा नागेंद्रस्वामी हरिहरस्वामी परमहंसस्वामीभिस्तथैव.............नादिभिर्मान्यकृतं मनसरसीं स्थापित..............तप त्याया उत्तर तटे योजन प्रमाणंच पंवती..............मधिविद्यते तन्निकटे गादिस्थो दयानंदस..............शिष्योस्ति तस्मिन्विषये आज्ञाकृतः..............धिवमठ व सदान्वत जिर्णोद्धारं कुरू..............णात् सर्वैः प्रतिपालनं कर्तव्यं श्री..........इत्यालम्।

श्रीगोवर्धनस्वामी काशीसंस्थानास सदानंदांचें
पत्र गेलें त्याची नकल.

॥ श्री ॥

ॐ जयानंद समर्थ

श्रीमत्परमहंस श्रीआनंद..........श्री..........राजलोलुपांतःकरणभ्रम..........श्रीसच्चिदानंद त्रिपद ज्ञानकला कलापविशारदानां तदुपरि श्रीपरमानंद पदविपरंपरास्वरूप वृद्धिगतानां रक्तश्वेतो परि सप्तकला वर्णरत्न परिक्षितानां अ ( म ) स्मन्मुकुट ( ब्रह्मरंध्र ) मणीप्रकाशकानां श्री-

गोवर्धनस्वामीनां चरणकमलेषु चेपावत्याः सकाशात्सदानंदस्य प्रणामावल्योऽनुस्पुता विलसंतु ॥ किमशंविदित्वायुतभत्कटाक्षावलोकनं लेख्यं ॥ तेनास्मद्दर्त्ती विशेषेण ॥ अथ च शंकरस्याद्योपांतगतीरूत्तमाकृता सायुज्य पदवीं गतः युष्मदनुग्रह प्रसाद प्रकाशादथच विशेषेण बोध्य । सुंदरं प्रतितमत्रमत्प्रेष्य मनुष्येण साकं प्रेषणीयं । किंच ममाधारो भवति सुज्ञसाहकारिणां निचितं ॥ तथाच देवालके नयन्निवेदितं स्यात्तदनुसारेण ज्ञेयं ॥ बहुपल्लवि.................कीं.......खांयुष्मदग्रेऽल्पप्र.......मन्म ॥.......गतसर्वेषां नतनज्ञयः श्रीमन्म.......
दासा...................

श्रीक्षेत्र माहूर येथील सदाशिव नृसिंह यांचे पत्राचें उत्तर, दयानंद यांचे स्वदस्तुरची नकल.

## सदानंदस्वामीचा जयानंद,

श्रीआनंद विश्वरूपा आनंदरूप सर्व वृक्ष साधन सर्व संपूर्ण सृष्टीसं.......दन साधन चैतन्य समाधान...................तू पर समाधानि सदाशिव नृसिंह या प्रति तस्य साधन क्रिया भूत साधन स्वहित विशेष. तुमचें पत्र वाचून परम आनंद जाला. असल भेट जाल्यावर सर्व निवेदन होईल. बहुत काय लिहिणें सुज्ञाप्रति ॥ सर्व मंडळीस जयानंद सांगणें सर्व मंडळीचा जयानंद दयानंद गोसावीचा जयानंद ॥ श्रीआनंदोजयति ॥

## सदानंदस्वामीचा जयानंद

श्रीमाहूरचे गादीस्थ महंत यांचे पत्राचें उत्तर श्लोकबद्ध.

श्रीआनंद सच्चिदानंद पदैक्य...................॥
..................गिरिजा चरणासि वंदूनियां ॥

जयानंद तुम्हासी नित्य करितो अत्यंतही सादरें ॥
सदानंदी कृपा कीजे निजमने सेवा दिजे तत्परे ॥ १ ॥
तुम्ही रंगकारी पत्र दिधले ते पावले सुवेळीं ॥
तेणें अंतरीं पूर्ण सुख असते जाले सदा निर्मळी ॥
येथें क्षेम असूनि तुम्हीही सदा क्षेमादरें लिहिणें ॥
या द्वारीं निमग्न डुल्लित असे आनंदी म्या राहणें ॥ २ ॥
भानू कीर्ण प्रकाश नित्य असतां कोठूनिया अंधता ॥
तेथूनी तुमची कृपा उगवतां अज्ञान रात्री तथा ॥
नित्यानंद प्रकाशतो तरि सदा अस्तोदयीं जो नसे ॥
तेथें त्वां निजतेजि पूर्ण असतां संसारिं मी नावसें ॥ ३ ॥
त्या तुम्हासि अनंत गुणि असतां पूर्णप्रकाशी सदा ॥
खद्योतापरि मी असें लघुगुणें तुम्हापुढें सर्वदा ॥
क्षेमा सर्व किजे अशुद्ध वदतां पत्रीं तुम्ही जाणिजे ॥
बाळाच्या वचनीं परीहि जनकें कौतूक तें मानिजे ॥ ४ ॥
तुम्ही पत्री लिहिले पावले ते आले कळुयाव.................फळें
द्वय आणि उदस हीत ते पावो.............री ॥
आणि शंकरगीरस्वामी.........प्रति.........जयानंद हा ॥
पावावा सुखकार की मज असे संतोषकालामला ॥ ५ ॥
जयानंद तुम्हाप्रति सकाळिकें केला असे बालकें ॥
प्रार्थीलें निज हेतुसी तुम्हि दिजे कृपाफळे भातुकें ॥
येणें लाडणि नाचिजे अति सुखें प्रेमादरें कौतुकें ॥
आनंदांगणि संतमंडळिपुढां नामामृतें भाउकें ॥ ६ ॥

हे सर्व उतारे इतके अशुद्ध आहेत कीं ते वाचून कोणताही अर्थबोध होत नाहीं. मूळ रचनाच अगोदर ओबड धोबड आहे आणि त्यांत लेखकानें ज्या भयंकर चुक्या केल्या आहेत त्यामुळें ही दुर्बोधता अधिकच वाढली आहे.

## अभंग.

संसारसागरीं बुडतां चुकलों ॥ सांगडी लागलों आनंदाच्या १
आनंद नामाची करुनियां सांगाडी ॥ मग पैलथडी उतरलों २
आनंद नामाची करुनियां माळा ॥ परब्रह्म केवळा तूंची होसी ३
पदापासुनी पद भेदापासुनि भेद ॥ तोडिला मूळकंद अविद्येचा ४
आनंदाचा छंद लागला मनासि ॥ संसार भयासि विसरलों ५
असंगाचा संग सोडुनियां दिला ॥ संग मज जोडला आनंदाचा ६
शिवविम वेडा सरता तो केला ॥ ठाव मागितला आनंदराया ७

२

देखिलें निधान सकळाचें साधन ॥ परमगहन आत्मारामीं १
मनाचि पुरली दुराशा त्रिराली ॥ ऐक्यता हे जाली पूर्ण रूपीं २
मायाभाव गेला सकळी तो जाला ॥ देव हा मिळाला भक्तजना ३
क्रिया कर्म फळा आले ते निर्मळ ॥ गुरुध्यान मेळा पूर्ण जाला ४
आत्माराम गुरू सर्वांचाही झारू ॥ सदानंद पारू तेणें केला ५

# भगवंतात्मज.

(ले० महादेव रामकृष्ण देशपांडे.)

जेथें प्रसिद्ध साधुसंत व कवि होऊन गेले अशीं पुण्यस्थळें महाराष्ट्रांतील इतर प्रांतांप्रमाणें मध्यप्रांतांतही बरींच आहेत, व अशा स्थळांमध्यें वर्धा जिल्ह्यांतील देवळी नांवाच्या लहानशा शहराची जाहीर रीतीनें गणना करण्यांत येते. या गांवासंबंधानें संग्रहित केलेल्या एकंदर मजकुरावरून याच्या पौराणिक काळांतील अस्तित्वाचा सुगावा व ऐतिहासिक काळांतील याचें महत्व अगदीं स्पष्टपणें व्यक्त होत आहे, आणि 'पुण्यग्राम देवळी साधुसंतांचें माहेर' या ध्रुवपदानें सुरू होणाऱ्या चटकदार पदांतील वर्णनाप्रमाणें व 'Deoli means the abode of God देवळी म्हणजे देवाचें वसतिस्थान' या एका इंग्रज ग्रंथकाराच्या उक्तीप्रमाणें येथील वस्तुस्थितीही अगदीं यथार्थ अशी दृष्टोत्पत्तीस येत आहे. प्राचीन काळीं होऊन गेलेल्या येथील साधुसंतांसंबंधानें जरी म्हणण्यासारखी माहिती मिळत नाहीं तरी ज्यांची माहिती हल्लीं कांहीं अंशीं तरी मिळूं शकते असे या शंभर वर्षांत येथें होऊन गेलेले प्रसिद्ध साधुसंत म्हटले म्हणजे श्री सज्जनमहाराज, हरबाजीमहाराज, मनोहरमहाराज, प्रश्नवालेमहाराज, थोडगेमहाराज, भगवंतात्मजमहाराज, मिरणमहाराज, पारखीमहाराज, व गणपतराव साधु हे होत. देवळी शहराच्या प्राचीन व अर्वाचीन अशा सविस्तर माहितीसह या सर्व सत्पुरुषांच्या गद्यात्मक चरित्रांचा एक स्वतंत्र ग्रंथ तयार करण्याचा प्रयत्न हल्लीं सुरूच आहे परंतु चरित्रनायकांपैकीं भगवंतात्मज, पारखीमहाराज व गणपतराव साधु हें 'कवि' असल्याकारणानें महाराष्ट्रकविचरित्रांतही त्यांचीं चरित्रें समाविष्ट करणें अगदीं उचित् होय. वरील कवित्रयांतील 'भगवंतात्मज' हे पहिले असल्यामुळें त्यांचें चरित्र आपण येथें प्रथमतः घेऊं.

प्रस्तुत काळीं सुवर्णग्रामीं (सोनेगांव, जि० वर्धा, मध्यप्रांत) महाजागृत असलेले समर्थ सद्गुरुनाथ श्रीआबाजीमहाराज यांजवर गुरुकृपेनें पार्डी क्षेत्रीं गोपालकृष्णानुग्रह जाहल्यानंतर ते स्वग्रामीं येऊन आपल्या कृपाकटाक्षाचे योगानें शरणागतांस पावन करीत असतां एके दिवशीं एक चिंताक्रांत असा सभ्य गृहस्थ त्यांची अद्भुत कीर्ति ऐकून त्यांचेकडे आला. आल्याबरोबर समर्थांचे चरणीं त्यानें साष्टांग नमन केलें आणि तो समोर हात जोडून उभा राहिला. अंतर्साक्ष सद्गुरुनाथांनीं हा कोणीतरी आपद्ग्रस्त असा थोर गृहस्थ असावा असें जाणलें व त्यास त्याची हकीकत विचारली असतां त्यानें सांगितलें कीं 'मी बडोद्याकडील एक पालखीपदस्थ सरकारी हुद्देदार असून कांहीं वर्षांपूर्वीं मजवर मोठा आरोप येऊन मला देशवेषांतर करणें भाग पडलें आणि अन्नोदकऋणानुबंधानुसार अनेक देश फिरतां फिरतां अकस्मात् महाराजांची अद्भुत कीर्ति कानीं पडतांच चरणीं शरण आलों, तरी आतां सकल चिंतांचें निरसन करून पामरास पदरीं धरून कृतार्थ करावें.'

शरणागताचा वरील वृत्तांत ऐकून व त्याची ती विकल स्थिति पाहून 'साधवो दीनवत्सलाः' या वासुदेवोक्तीप्रमाणें दीनवत्सल अशा समर्थांचें नवनीतापेक्षां मृदुल असें मन तात्काळ द्रवलें व त्यांनीं त्यास तत्क्षणीं परम कृपाळूपणें अभय दिलें कीं "पुण्यभूमि 'देवळी' येथें वास्तव्य करून मारुतीची उपासना चालवावी आणि वैद्यकीचा धंदा करून निर्वाह करावा म्हणजे तुमच्या सर्व संकटांचें निरसन होऊन तुम्हांस प्रचीतीचें ज्ञान व कवित्वशक्ति प्राप्त होईल." परिस लावला म्हणजे जशी लोखंडाचें सुवर्ण होण्याची चिंता नको, तसें समर्थ सद्गुरुनाथ लाधले म्हणजे शरणागतास आपल्या योगक्षेमाची चिंता

बाळगण्याचें कारण नाहीं. 'अनन्याश्चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्' हें त्या समर्थांचेंच वचन आहे. श्रीतुकोबारायही एके ठिकाणीं आपला अनुभव सांगतात कीं **"समर्थासी लाज आपुल्या नामाची ॥ शरण आल्याची लागे चिंता ॥ १ ॥ न पाहे तयाचे गुणदोष अन्याय ॥ सुख देउनि साहे दुःख त्याचें ॥ २ ॥ मान भलेपण नाहीं फुकासाठीं ॥ जयावरि गांठीं झीज साहे ॥ ३ ॥** मात्र ती शरणागति अनन्य पाहिजे, नाहींतर पंढरीकडील कित्येक पुराणिक पुराणांत अनन्य शरणागतीची एक बोधप्रद गोष्ट सांगत असतात कीं आषाढीच्या उत्सवप्रसंगीं चंद्रभागेच्या पुरांतून एक फकीर नावेच्या खर्चाकरितां जवळ पैसा नसल्यामुळें हिरव्या फडक्यावर बसून अनेक बुचकळ्यांस न डगमगतां फक्त 'अल्ला अल्ला' करीत संतोबा पवाराप्रमाणें एकनिष्ठतेनें निर्विघ्नपणें पैलतीरास गेला आणि तशाच परिस्थितींतला एक ब्राह्मण शुभ्र अंगवस्त्रावर बसून शिवशक्ति, सूर्य, गणपति व विष्णु या पंचदेवतांचीं अनंत नांवें घेत असतांही बुचकळीसरसा पहिल्या देवतेविषयीं अधीर होऊन देवता पालटल्याकारणानें पांच बुचकळ्यांत पंचत्वास गेला, तशी शरणागति नको. ही गोष्ट मोठी चटकदार आहे, परंतु ती सविस्तर देण्याचें हें स्थळ नव्हे.

अस्तु. प्रिय वाचकहो, दीनदयाळ समर्थ शरणागतास केवळ आशीर्वचनच देऊन राहिले नाहींत. त्यांनीं त्या गृहस्थास टाकळीचे त्या वेळचे धनकनकसंपन्न व नामांकित असे चनाजी पाटील यांच्या येथील कायमची कुटुंबवैद्यकी लावून दिली आणि अगदींच अपरिचित अशा प्रांतांत त्याला अल्पावधींत सुखवस्तुस्थिती प्राप्त करून दिली; व रावसाहेब नांवानें त्याची प्रसिद्धि केली. तदनंतर समर्थांचे आज्ञे-

नुरूप रावसाहेबांनीं वसिष्ठा नदींत कोचीडोचीच्या जागृत मारुतीजवळ मोठें कडक अनुष्ठान केलें व मारुतीरायांस प्रसन्न करून घेतलें. गृहस्थ आधींच कर्तबगार व त्यावर समर्थांची कृपा! मग काय! रावसाहेबांस वैद्यकीच्या धंद्यांत अत्युत्कृष्ट यश येऊन अनेक ठिकाणांहून हजारो रुपये मिळूं लागले. त्यांनीं देवळीस राम, लक्ष्मण, सीता, हनुमंत इत्यादि मूर्तींची स्थापना करून त्यांवर उत्सवाच्या सोयीची विस्तीर्ण जागा बांधली व रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटाचा सुरू केला. 'गांवांतील सर्व ब्रह्मवृंदास नवरात्रांत दररोज पंचपक्वान्नाचें भोजन व त्यांतही पंक्तीचा बेत सकाळीं आठ वाजतांचा, आणि शेवटचे म्हणजे पारण्याचे दिवशीं सर्वोत्कृष्ट नगरभोजन' असा राजकीय थाटाचा बेत उत्सवांत असे. वरील नवरात्राखेरीज इतर दिवसांत प्रतिवर्षीं रावसाहेब स्वतः चाळीस दिवस उपोषण करून मारुतीचें अनुष्ठान करीत असत व शिवाय असेंच एक अनुष्ठान ब्राह्मणद्वारेंही करीत असत. देवळीचे प्रख्यात मांत्रिक कै० वेदमूर्ति केशवभटजी पनके हेच त्यांचे प्रतिवार्षिक अनुष्ठान करणारे ब्राह्मण होत. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' या कव्युक्तीप्रमाणें देवळीचे त्या वेळचे विद्यमान सत्पुरुष श्रीआन्याजी महाराज थोडगे यांच्याशीं त्यांचें अत्यंत संघटन असे. श्रीआबाजीमहाराजांचे येथील महोत्सवाकरितां हे प्रतिवर्षीं नियमानें सोनेगांवीं जात असत व समर्थांसही आपल्या येथील उत्सवास घेऊन येत असत.

कोचीडोचीच्या मारुतीजवळ रावसाहेबांनीं कडकडीत अनुष्ठान केलें व त्यास मारुतीराय प्रसन्न झाले हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हांपासून त्यांस कवित्वशक्तिही उत्तम प्रकारची प्राप्त झाली. त्यांनीं विविध विषयांवर बऱ्याच उत्तमोत्तम कविता केल्या असें सर्व वडील

वृद्ध सांगतात. परंतु विद्यमान गृहस्थांपैकीं कोणाजवळ त्यांचा संग्रह आढळत नाहीं हें पाहून फार वाईट वाटतें. रावसाहेबांच्या सहवासांतील मंडळीच्या अलक्ष्यामुळें व रावसाहेबांचे समाप्तीनंतर देवळीच्या इतर कांहीं इमारतींबरोबर त्यांच्या इमारतीचाही अग्निनारायणानें अंगीकार केल्याकारणानें आम्ही आज आपल्यांतील एका प्रासादिक कवीच्या कवित्वास अंतरलों असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. तथापि संतोषाची गोष्ट आहे कीं रावसाहेबांच्या हरिभजनाचे हल्लीं विद्यमान असलेले देवळी येथील अत्यंत वृद्ध साथी वे. शा. सं. जागेश्वर धुंडिराज ऊर्फ बापूजीमहाराज तांभेकार यांच्या येथील कांहीं जुनाट चिटोरीं चाळीत असतां मला त्यांचीं कांहीं सुरस पदें सांपडलीं. तीं वाचकांकरितां येथें सादर करितों. हीं पदें कवीच्या अनुभवाचीं द्योतक तर आहेतच परंतु बहुजनसमामाच्या प्रचलित अभिरुचीच्या दृष्टीनेंही तीं अत्यंत लोकप्रिय चालींवर तालस्वरांत म्हणतां येतात. रावसाहेब चांगले गाणारे असून त्यांच्या हरिभजनांत रंगदेवता अत्यंत प्रसन्न असे असें सांगतात. हल्लीं त्यांच्या भजनाचे एक साथी अवशेष आहेत म्हणून वर दर्शविलेंच आहे. तेही चांगल्यापैकीं गाणारे होते. परंतु त्यांचा लौकिक सहन न झाल्यामुळें कोणी दुष्टानें त्यांनां पानसुपारीचे प्रसंगीं विश्वासघात करून शेंदूर चुन्याचें मिश्रण चारलें व तेव्हांपासून त्यांचा आवाज जो बसला तो बसलाच आहे. असो. 'रावसाहेब' म्हणजे ज्यांच्या चरित्राच्या समारोपांत ओघानें ज्यांच्या नांवागांवाचा पत्ता लागणार त्या श्रीमद्भगवंतात्मज कवीचीं पदें खालीलप्रमाणें:—

## उपदेशपर पद.

राग–यमन. ताल–दादरा.

जाग जाग जाग जाग तूं आपुले स्वहिताला ॥ ध्रु० ॥
नको घेउं उगिच झोंप ॥ होइल तुजवरति कोप ॥
ब्रह्मपदीं लावि रोप ॥ पुष्पाचा बाग बाग बाग बाग॥१॥
जन्ममरण दुःख टळल ॥ कलिमल हा सर्व जळल ॥
यम तुला पाहुनि पळल ॥ षड्रिपुला त्याग त्याग त्याग त्याग२
भगवंतात्मज मनास ॥ बोध करी प्रतिदिनास ॥
दुर्बुद्धि करुनि नास ॥ सद्गुरुपदिं लाग लाग लाग लाग॥३॥

## कवीचा स्वानुभव व्यक्त करणारीं पदें:—

गुरुघरिंचा खेळ न्यारा ॥ कांहीं समजा प्राणिया ॥ ध्रु० ॥
मस्तक खालीं पाय वरती ॥ करशिल तेव्हां प्यारा ॥ १ ॥
षड्चक्रातें भेदुनि जाई ॥ ब्रह्मपदीं तैं थारा ॥ २ ॥
भगवंतात्मज म्हणे गड्यानों ॥ चुकवा येरझारा ॥ ३ ॥

चाल—प्रभुविण कोण कुणाचा वाली.

कोणी कांहीं म्हणा मन जडलें ॥ ध्रु० ॥
गुरुरंगानें रंगुनि गेलों ॥ न घडावें तें घडलें ॥ १ ॥
पृथ्वीचें जळ आकाशपंथीं ॥ न चढावें तें चढलें ॥ २ ॥
भगवंतात्मज म्हणे गुरु पातक ॥ न झडावें तें झडलें ॥ ३ ॥

चाल—शिणलासी भाइ्या बा रे०

का या गुरुला व्हावें उतराई ॥ ध्रु० ॥
आत्म निवेदुनी आत्महिताला ॥ मेळविलें मज ठायीं ॥१॥
आप पर मज कांहि दिसेना ॥ एकचि पर्वत राई ॥ २ ॥
भगवंतात्मज म्हणे गुरुराया ॥ तव पदांबुजीं डोई ॥ ३ ॥

## कुंजवनांतील राधाकृष्णाच्या क्रीडेसंबंधीं पदें:—

राग यमन. ताल दीपचंदी.

कृष्णा टाकुं नको रे रंग ॥ माझे भिजतिल अंग ॥ ध्रु० ॥

चंदिरि पातळ चोळी बसंती ॥ चोळि जरीची तंग ॥ १ ॥
सासुरवासी गरति बायका ॥ जन अपवादा पंग ॥ २ ॥
कृष्ण म्हणे राधे आज वसंत–बहार करिल श्रीरंग ॥ ३ ॥
भगवंतात्मज कुंजवनींचा ॥ आनंद पाहुनि दंग ॥ ४ ॥

राग कालंगडा–ताल कवाली.

या देवाचें देवपण गेलें ॥ मन राधेनें नेलें ॥ धृ० ॥
मग साधूंला कोणि पुसेना ॥ जिवंत असतां मेले ॥ १ ॥
राधेनें आपुलें तें मन अर्धें ॥ कृष्णासि अर्पण केलें ॥ २ ॥
कृष्णानें आपुलें तें मन अर्धें ॥ राधेसि अर्पण केलें ॥ ३ ॥
भगवंतात्मज एकविचारें ॥ ऐक्यभाव हा बोले ॥ ४ ॥

असो. याप्रमाणें समर्थकृपेनें आपद्विमुक्त होऊन, परमार्थाची ध्वजा उभारून, आधींच महानुभाव साधुसंतांच्या सान्निध्यानें पुनीत असलेल्या देवळीग्रामवासी आबालवृद्ध मंडळींत आपल्या पुण्यप्रद सहवासाचे योगानें आनंदी आनंद करून सोडून श्रीमद्भगवंतात्मज कवि 'कोचीडोची'च्या आपल्या उपास्य मारुतीजवळ वसिष्ठाबाईच्या ऐन धारेंत शालीवाहन *शके * * * सालीं समाधिस्थ झाले. प्राणोत्क्रमणाचे वेळीं त्यानीं जवळ असलेल्या एका सद्भक्तास आपलें मूळचें नांव, गांव वगैरे सांगून आपली निधनवार्ता आपल्या आप्तांस कळविण्यास सांगितलें. आज्ञेप्रमाणें त्या सद्भक्तानें त्यांची हकीकत त्यांच्या मूळ गांवीं कळविल्यानंतर ताबडतोब त्यांचे बंधु वगैरे आप्त मंडळी देवळीस आली व तेव्हां त्यांचा पूर्ववृत्तांत इकडील लोकांस विस्तृत रीतीनें समजला कीं ते मोठे पालखीपदस्थ सरकारी हुद्देदार असून घरींही संततिसंपत्तियुक्त होते व त्यांच्या वडिलांचे नांव

* शक समजला नाहीं.

'भगवंत' होतें. परंतु 'पूर्वजन्मकृतं कर्म तद्दैवमिति कथ्यते.' पूर्वजन्मदुष्कृताचे योगानें त्यांना कुटुंबपरिवारास मुकून देशांतरीं अज्ञात असें रहावें लागलें. अथवा पूर्वजन्मसुकृत म्हटलें तर तेंही यथायोग्यच होईल. कारण समर्थकृपा होऊन परमार्थलाभ जोडला, दुष्कृतापेक्षां सुकृतच म्हणणें योग्य. मलीन व अशाश्वत अशा कायेनें निष्कलंक व शाश्वत असें यश मिळत आहे, तर तिनें काय मिळविलें नाहीं ? सर्वच कांहीं मिळविलें.

अस्तु. या मूर्त सृष्टीमध्यें अनेक प्रकारच्या घडामोडी होत असतात परंतु कवींच्या कविता चिरकाल राहतात. "जाग जाग जाग जाग तूं आपुले स्वहिताला" हें अत्यंत खेळीमेळीचें, प्रासप्रसादपूर्ण, सुरस व बोधपर पद जावत्कालपर्यंत अस्तित्वांत आहे तावत्कालपर्यंत रसिक व भाविक जन श्रीमद्भगवंतात्मज कवीस विसरणार नाहींत, हें खास. हें पद म्हणजे त्यांचें स्मारकच होय असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

## श्रीरघुपतिमहाराज.

गोदावरीचे तटाकीं पुण्यस्तंभ उर्फ पुणतांबें ह्या नांवाचें गांव आहे. तेथें सुमारें दोनशें वर्षांपूर्वी पूर्ण वेदशास्त्रवेत्ते व सात्विक असे हरीशास्त्री नांवाचे एक गृहस्थ आपल्या कुटुंबासह राहत असत. ते केवळ सात्विक वृत्तीनें पुराणद्वारें आपला निर्वाह चालवीत. ते आपल्या गाढ विद्वत्तेनें श्रोतृवृंदास पुराणश्रवणांत अगदीं मग्न करून टाकीत. त्यामुळें तेथील लोकांस ते सन्मार्गदर्शी झाले. पुराण सांगण्यांत त्यांचा हातखंडा असल्यामुळें त्या गांवीं व त्या गांवच्या आसपास देखील ह्यांची फार ख्याति होती. ह्यांच्या कुटुंबाचें नांव रुक्मिणीबाई असून त्यांस १९ पुत्र व ८ कन्या मिळून एकंदर २७ अपत्यें झालीं. परंतु ईशेच्छेनें त्यांपैकीं एकही अपत्य हयात राहिलें नाहीं.

त्यामुळें उभयतांस परम दुःख होऊन, मनःशांत्यर्थ काशीयात्रा तरी करावी असा विचार करून उभयतां यात्रेकरितां निघाले. फिरतां फिरतां ते नाशिकनजीक जनस्थान क्षेत्रीं आले. श्रीगोदावरीचें दर्शन होतांच हरीशास्त्री यांस परमाल्हाद झाला. गंगेचें स्नान वगैरे विधि उरकून ते शांतचित्त होऊन बसले. इतक्यांत त्यांस, पंचवटींत रघुनाथभट्टजी ह्या नांवाचे कोणी विद्वान् सत्पुरुष राहत असल्याचें समजतांच, हरीशास्त्री आपल्या कुटुंबासह त्यांच्या दर्शनास गेले. तों तेथें रघुनाथभट्टजींचें पुराणनिरूपण चाललें होतें. त्यांची अस्खलित वाणी, अप्रतिम प्रतिपादनशैली व अद्वितीय तेज पाहून ह्याच सत्पुरुषाजवळ कांहीं दिवस राहून शांतिसुखाचा अनुभव घ्यावा, असा हरिशास्त्री यांनीं निश्चय केला. नंतर हरिशास्त्री यांच्या कुटुंबानें प्रतिदिवशीं गृहकृत्यद्वारा रघुनाथभट्टजींची सेवा करावी व हरीशास्त्री यांनीं पुराण सांगावें, असा क्रम चालविला. शास्त्रीबुवांची विद्वत्ता व प्रतिपादनशैली पाहून रघुनाथभट्टजीही फारच संतुष्ट झाले; आणि आपण पुराण सांगण्याचें बंद ठेऊन दररोज हरिशास्त्री यांजकडून पुराण सांगवूं लागले. बरेच दिवस असा क्रम चालल्यावर आपली आतां परलोकगमनाची वेळ नजीक आली आहे, आणि हरिशास्त्री सहकुटुंब बरेच दिवस सेवा करीत आहेत, असें जाणून एके दिवशीं रघुनाथभट्टजींनीं हरिशास्त्री यांस प्रश्न केला, "शास्त्रीबुवा, आपण येथें बरेंच वास्तव्य केलें. आपण सेवा केलेली पाहून मी बहुत संतुष्ट झालों. आपणास अपत्य वगैरे काय आहे?" शास्त्रीबुवांनीं उत्तर दिलें, "महाराज, १९ पुत्र व ८ कन्या होऊन त्यांपैकीं एकही अपत्य शिल्लक नाहीं. एक जरी शिल्लक राहता तरी वंशास आधार असता, परंतु ईशेच्छा!" ह्या उत्तरानें हरीशास्त्री यांस पुत्रेच्छा आहे असें जाणून रघुनाथभट्टजींनीं, 'तुम्हास एक उत्तम रूपगुणसंपन्न व परम ईशभक्त पुत्र होईल' असा

त्यास आशीर्वाद दिला. आतां आपणास संतान होणें शक्य नाहीं अशी खात्री असतांही, सत्पुरुषांची वाणी कधीं मिथ्या होत नाहीं अशा निश्चल भावनेनें शास्त्रीबुवांनीं 'तथास्तु' म्हटलें. पुढें कांहीं दिवसांनीं रघुनाथभट्टजींची वाणी खरी झाली. नंतर कांहीं कालानें रघुनाथभट्टजी निजधामास गेले. त्यांची समाधि व मठ नासिक क्षेत्रीं पंचवटींत अद्याप असून तेथें यात्रा भरत असते.

पुढें कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं सौ. रुक्मिणीबाईस रघुनाथभटजींनीं स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें कीं, ह्या लोकीं अद्याप माझें कर्तव्य बाकी राहिलें आहे; ह्यासाठीं मी तुमच्याच उदरीं येणार. पुत्र होईल त्याचें नांव रघुनाथच ठेवावें. हें स्वप्न बाईनीं हरिशास्त्री यांस सांगितलें नाहीं. थोड्या दिवसांनंतर हरिशास्त्री सहकुटुंब आपल्या पुणतांबें गांवीं गेल्यावर कुटुंब गरोदर असल्याचें स्पष्ट दिसून आलें; आणि सत्पुरुषांच्या वाणीचा प्रभाव त्यांच्या अनुभवास आला. मात्र ह्या बाईस कांहीं रोग झाला असून ह्या गर्भवती नसाव्या असे गांवांतील लोकांचे नाना कुतर्क चालले होते. पुढें लवकरच बाई संवत् १८२९, श्रावण शु० २ रोजीं (स. १७५८) प्रसूत होऊन रूपवान् व सुगुणसंपन्न असा पुत्र झाला. रुक्मिणीबाई प्रसूत होतांच गांवांतील लोकांचे कुतर्क आपोआप बंद झाले. सत्पुरुषांच्या वाणीचें सामर्थ्य शास्त्रीबुवांच्या अनुभवास आलें. बाईनीं पूर्वीचें स्वप्न शास्त्रीबुवांस सांगतांच शास्त्रीबुवांनीं मुलाचें नांव रघुपति असेंच ठेविलें. तेच बडोद्याचे श्रीरघुपति महाराज होत. नंतर कांहीं दिवसपर्यंत पुत्रसुख अनुभविल्यावर ज्वरादि विकारानें हरीशास्त्री परलोकवासी झाले. त्या वेळीं त्यांचे चिरंजीव रघुपति दोन वर्षांचे होते. पतीच्या पश्चात् बाईनीं आपल्या मुलाकडे पाहून दुःखद जीविताचा

भार सन्मार्गानें राहून सहन केला. रुक्मिणीबाई भजनकीर्तनास जात, त्या वेळीं रघुपति महाराजांस बरोबर नेत. रघुपति हे जन्मतःच विलक्षण तैलबुद्धीचे असल्यानें कोणत्याही गोष्टीचें ते लगेच ग्रहण करीत. ह्यांची विलक्षण बुद्धि व तेज पाहून तत्कालीन साधुपुरुष ह्या बाळावर फार प्रेम करीत. रघुपति हे उत्तम भजन म्हणत असून अष्टपदी म्हणणें ह्यांस फारच आवडे. आपल्या भजनानें व अष्टपदीनें आपल्या वयाच्या पांचव्या वर्षापासूनच श्रोतृवृंदास ते अगदीं तल्लीन करून सोडीत.

रघुपतिबुवांच्या भजनांत लोक कसे तल्लीन होऊन जात, ह्याबद्दल एक चमत्कारिक आख्यायिका आहे. एके दिवशीं रघुपतींच्या मातुश्री संध्याकाळीं गंगेवर पाणी आणण्यास रोजच्याप्रमाणें निघाल्या. त्यांच्या-बरोबर रघुपतीही निघाले. हें पाहून रुक्मिणीबाई म्हणाल्या. ' बाळ. आतां संध्याकाळ झाली आहे, येऊं नकोस. घरीं भजन करीत बस जा. ' आईच्या आज्ञेप्रमाणें रघुपति परतले. जातांना ते भजन करीत चालले होते. त्या नादांत घराकडे न जातां चुकून दुसऱ्या वाटेनें गंगेच्या तीरीं आले. आपण घरीं न जातां भजनाच्या नादांत येथें आलों हें त्यांस कळलें. नंतर त्यांनीं गंगेचें स्नान करून अंग पुसलें व तेथेंच गंगातटाकीं डोळे मिटून भजनानंदांत निमग्न झाले. इकडे रुक्मिणीबाई घरीं येऊन पाहतात तों रघुपति कोठें दिसेना. सारें घर तपासलें. गांवांतहि शोध केला. रघुपति कोठें सांपडत नाहीं असें समजल्यावर रुक्मिणीबाईंनीं आकांत करून सोडिला. गांवांतील लोकांनीं बाईची पुष्कळ समजूत केली. ह्या वेळीं त्या गांवांत व त्या गांवच्या आसपास पेंढारी लोकांचा अतोनात त्रास सुरू झाला होता. ते लोक पुणतांबें गांव लुटण्यास आले. तहान लागली म्हणून पाणी

पिण्यासाठीं ते गंगेच्या तटाकीं जेथें रघुपति बसले होते तेथें गेले. ती बालमूर्ति भजनांत निमग्न झाल्याचें पाहून व त्यांचें मधुर भजन ऐकून त्या पेंढारी लोकांचीं मनें आकर्षून गेलीं, व त्यांस फार संतोष वाटला. ही सर्व हकीकत त्या लोकांनीं आपल्या नायकास सांगितली. तावडतोब नायक मशाली पेटवून तेथें आला. ती पांच वर्षांची सर्वांगसुंदर मूर्ति पाहून नायकास अति आनंद वाटला व ह्यांस आपल्या घरीं न्यावें अशी त्यानें सर्वांस आपली इच्छा कळविली; आणि लगेच त्यानें रघुपतींचे चरण धरिले, तोंच रघुपतींचें ध्यानविसर्जन होऊन ते पाहतात तों आपल्यापुढें क्रूर लोक उभे आहेत! परंतु रघुपति किंचिन्मात्र डगमगले नाहींत. उलट ' बाबांनो, तुमचें म्हणणें काय आहे, असें त्यांनीं त्यांस विचारलें. नायकानें तूं ' आमच्या बरोबर असावें, आम्ही तुला बिलकूल त्रास देणार नाहीं. तुझ्या आई-बापांचें नांव सांग. ' ह्याप्रमाणें म्हटल्यावर ' माझ्या वडिलांचें नांव हरीशास्त्री. ते निवर्तले. माझी आई रुक्मिणी ती वृद्ध आहे. मी तर फार लहान आहे. तेव्हां तुमची इच्छा कशी पूर्ण होणार ? पण आपण म्हणतांच तर आईला विचारा. तिची आज्ञा होईल तर मी येतों.' असें रघुपति म्हणाले. नंतर पेंढारी गांवांत जाऊं लागले हें पाहून गांवांतील लोक पळून जाऊं लागले. नायकानें गांवच्या पाटलास गांठून ' ह्या मुलास त्याच्या आईकडून आम्हांस देवीव, नाहींतर ह्या मुलासुद्धां सर्व गांव जाळून टाकूं' अशी धमकी दिली. गांवच्या पाटलानें गांवांतील कांहीं सभ्य गृहस्थांसह रुक्मिणीबाईकडे जाऊन सर्व हकीकत सांगितली. रुक्मिणीबाई दुःखाक्रांत पडल्या होत्या. रघुपति आल्याचें पाटलानें सांगितलें तेव्हां रघुपतीला पाहून त्यांनीं पटकन पोटाशीं धरिलें. नंतर पाटलानें सर्व प्रसंग रुक्मिणीबाईस सांगितला. नायकानें

तुमचा मुलगा एक वर्षानें परत करूं ' असें म्हणून खात्री होण्या-साठीं बेलभंडार उचलिला. रुक्मिणीबाईनें आपला एकुलता एक अल्पवयी मुलगा गांवच्या संरक्षणासाठीं नायकाच्या स्वाधीन केला; आणि गांवच्या लोकांनीं ' बाईनें आपला मुलगा देऊन आम्हा सर्वांचें रक्षण केलें ' असें जाणून धन्यवाद दिले. नंतर पेंढारी लोकांनीं हाताची पालखी करून तीवर रघुपतीला बसविलें. कांहींनीं काठीवर आपलीं धोतरें टाकून त्याच्या पताका केल्या व कांहींजण सेवक बनून रस्त्यानें जयजयकार करीत ते रानांत निघून गेले. " लोह लागलिया परिसासी । पूर्वस्थिति मग कैची " ह्या सदुक्तीप्रमाणें रघुप-तीच्या भजनश्रवणानें आपला कुलमार्ग सोडून पेंढारी लोक सन्मार्ग-गामी झाले व भजन करीत राहिले. नंतर एक वर्षानें पेंढारी लोकांनीं रघुपतीस आणून त्यांच्या मातुश्रीच्या स्वाधीन केलें. रघुपति आलेला पाहून मातुश्रीला व लोकांना फार आनंद झाला.

नंतर प्रवरेचे तीरीं बेलापूर गांवीं ब्रह्मसाक्षात्कार झालेले केशव गोविंद नांवाचे सत्पुरुष राहत असत. त्यांच्या दर्शनास पुणतांबे गांवच्या लोकांबरोबर रुक्मिणीबाई रघुपतीसह गेल्या. त्या सत्पुरु-षांची अगाध विद्वत्ता व तेज पाहून, ह्यांच्यासारखा माझा रघुपति विद्वान् झाला तर तेथें दरसाल रघुपतीकडून भागवताचा सप्ताह कर-वीत जाईन असा बाईनें मनाचा निश्चय केला. बाईची इच्छा व रघुपतीची अलौकिक बुद्धिमत्ता पाहून केशव गोविंदांनींही तसाच आशीर्वाद दिला. तेथून रुक्मिणीबाई घरीं परत आल्यावर गांवांतील लोकांनीं रघुपतीचें उपनयन मोठ्या थाटानें केलें. ह्या वेळीं रघुपती सात वर्षांचे होते. नंतर एका विद्वान् गुरूकडून अध्ययन उत्तम प्रकारें करविलें. रघुपतींनीं आपल्या बाराव्या वर्षी भागवताचा सप्ताह सांगि-

तला. तो ऐकून सर्व लोक थक्क झाले. पूर्वी निश्चय केल्याप्रमाणें, बेलापुरीं केशव गोविंद ह्यांच्या समोर दरसाल श्रावण वद्य १ पासून रुक्मिणीबाई रघुपतीकडून सप्ताह वाचवीत. ही वहिवाट अद्यापही त्यांच्या मंदिरांत चालू आहे.

पुढें रघुपति वयांत येतांच गांवकऱ्यांनीं उत्तम कुलांतील एका मुलीबरोबर थाटानें त्यांचें लग्न करून दिलें. मुलीचें नांव अंबाई होतें. रघुपतींनीं आपला संसार नीट चालविला. कांहीं दिवस लोटल्यावर अंबाई गर्भवती होऊन पुत्ररत्न झालें. तें पाहून रक्मिणीबाईस परम आल्हाद झाला. नंतर थोड्या दिवसांनीं रुक्मिणीबाई निवर्तल्या. त्यानंतर रघुपति ह्यांस तीन मुली व चवदा मुलगे मिळून सतरा अपत्यें झालीं. त्यांपैकीं एकही हयात राहिलें नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं अंबाबाई परलोकवासी झाल्या. मातुश्रीच्या आग्रहास्तव लग्न केलें होतें, त्यामुळें व पुढें कौटुंबिक आघातानें रघुपतीच्या विरक्तपणांत आणखी भर पडली. पुढचा काळ त्यांनीं गंगास्नान, पूजा, पुरश्चरण, भागवतवाचन, वेदांत, नक्तभोजन, रात्रौ कीर्तनभजन वगैरेंत घालविला. पुढें रघुपति महाराजांचा लौकिक सर्व बाजूंस पसरून त्यांची मोठी ख्याति होऊन दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनास येऊं लागले.

पुढें एक चमत्कार घडला. पुणतांबे गांवीं प्रसिद्ध साधु चांगदेव यांची समाधि आहे, तेथें दर वर्षी माघ मासीं मोठी यात्रा भरत असते. तेथें दूरदूरचे साधुपुरुष येऊन भजनकीर्तन करीत असतात. अशा समुदायांत रघुपति महाराजही भजनांत दंग झाले होते. इकडे घरीं नित्यनेमाप्रमाणें ह्यांचें पुराणकथन वगैरे चालू असून मंडळीही श्रवणास बसली असतां एकेच वेळीं दोनही ठिकाणीं रघुपति महाराज असल्याचें लोकांच्या लक्षांत आलें; आणि त्यांच्या अद्भुत लीलांचें कौतुक

लोक करूं लागले. रघुपति महाराजांच्या अशा अनेक अद्भुत लीला आहेत, पण त्या विस्तारभयास्तव आम्ही येथें देत नाहीं.

असे कांहीं दिवस लोटल्यावर आपणावर गुरुकृपा व्हावी, गुरुकृपेवांचून सार्थक नाहीं, असा रघुपति महाराजांस एकसारखा ध्यास लागला आणि यात्रेस जाण्याचा त्यांनीं विचार केला. विचारांतीं त्यांनीं गुजराथेंत श्रीडाकोरक्षेत्रीं श्रीरणछोडजीच्या दर्शनास जाण्याचें ठरविलें. ह्याच सुमारास बडोद्याचे अधिपति श्री. फत्तेसिंहराव ह्यांचें कुटुंब आनंदीबाई ह्या यात्रा करण्याकरितां निघाल्या होत्या. रघुपतींचा लौकिक ऐकून पुणतांब्यास बाईंची स्वारी गेली. बाईंनीं दर्शन घेऊन महाराजांची प्रार्थना केली कीं, ' आपण बडोदें मुक्कामीं राहून भागवतकथन करून असावें. ' अनायासें डाकोरला जाण्याची ही संधि बरी आली असा विचार करून रघुपतिमहाराज आनंदीबाईच्या स्वारीबरोबर बडोदें मुक्कामीं येऊन बाईस भागवत श्रवण करवूं लागले. कांहीं दिवसांनीं आनंदीबाई स्वर्गवासी झाल्या आणि लगेच रघुपति डाकोरास जाऊन राहिले. एक महिना डाकोरक्षेत्रीं व एक महिना नर्मदातीरीं श्रीगुरुदर्शनाची वाट पाहत ते राहिले. अशा समयीं कोल्हापूर येथील प्रसिद्ध सिद्ध पुरुष नारायण महाराज हे फिरत फिरत बडोदें शहरांत श्रीयवतेश्वराचे देवालयांत येऊन राहिले. हें वर्तमान रघुपति महाराजांस कळतांच ते नर्मदेहून बडोद्यांत आले. नारायण महाराजांची तेजस्विता व विलक्षण अधिकार पाहून त्यांच्याच उपदेशानें कृतार्थ होण्याचा निश्चय करून त्यांचीच सेवा करीत ते राहिले. बरेच दिवस लोटल्यावर अद्याप गुरुमहाराजांची कृपा आपणावर होत नाहीं असें पाहून प्रार्थना करण्याच्या हेतूनें एक पद तयार करून तें त्यांनीं नारायण महाराजांपुढें मोठ्या सद्गदित अंतःकरणानें म्हटलें.

तें पद ' भवतारक या तुझ्या पादुका वंदिन मी माथां । करावी कृपा गुरुनाथा ॥' हें होय. ह्या पदाचें शेवटलें चरण ' हीच विनंती दर्शन द्यावें दासा रघुनाथा ॥' असें आहे. हें पद भजनाच्या अनेक पुस्तकांतून व अनेकांच्या तोंडीं आहेच. ह्याप्रमाणें भजनानें श्रीनारायण महाराजांस आळवून त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला. नारायण महाराजांनीं ती तेजस्वी व भक्तिरसानें ओथंबलेली रघुपतींची मूर्ति पाहून, जवळ बोलावून लगेच त्यांच्या मस्तकावर हात ठेवून ' बापा, तूं पूर्ण ज्ञानी आहेस. निश्चयानें तुझ्यावर ईश्वरप्रसाद लवकरच होईल ' असा आशीर्वाद देऊन, आदि पुरुषापासून पूर्वपरंपरेनें स्वतःस प्राप्त झालेला उपदेश त्यांनीं रघुपति महाराज यांस दिला व त्यांस कृतार्थ केलें; आणि हा शिष्यमंडळाचा शिरोमणी होऊन पूर्वपरंपरा कायम राखील असें जाणून, पूर्वपरंपरागत तांडवमूर्ति, वीणा, माळ व झोळी ह्या वस्तु होत्या, त्यांपैकीं झोळी न देतां वरील तीन वस्तु रघुपतीस दिल्या. रघुपतीस भिक्षायोग नाहीं म्हणून त्यांना झोळी दिली नाहीं; आणि अद्याप रघुपतींच्या संप्रदायांत भिक्षावृत्ति वर्ज्य आहे. ह्यानंतर नारायण महाराज श्रीकाशी क्षेत्रीं गेले. रघुपतींनीं गुरुप्रसाद मिळालेल्या तांडवमूर्तीचें नांव ' बाप्पाजी ' असें ठेविलें, आणि त्या मूर्तीची सेवा ' यथा देहे तथा देवे ' ह्याप्रमाणें चालविली. मूर्तीस स्नान घालून पूजा-नैवेद्य करून नंतर आपण जेवून बाप्पाजीला पाळण्यांत निजवून आपण स्वतः तयार केलेलीं कृष्णलीलापर पदें म्हणत म्हणत बाप्पाजीला झोका देत ते बसत व आतां बाप्पाजी निजले असतील अशा भावनेनें देवाचें दार लावून घेत व नंतर त्या अवधींत दुपारचें पुराण वगैरे सांगत. रात्रींही आपण स्वतः केलेलीं पदें ह्मणत. त्यांचीं पदें अत्यंत प्रेमळ, प्रासादिक

व सात्विक भावानें ओतप्रोत भरलेली असत. ती सद्गदित अंतःकरणानें रघुपतीनीं म्हटलेली ऐकून स्वतःचें व श्रोतृवृंदांचें अंतःकरण गहिंवरून डोळ्यांतून आनंदाश्रु वाहत असत. ह्यांच्या मंदिरांत भजनाचे आरंभीं एक अभंग म्हणण्याचा नित्यपाठ आहे. त्यांत रघुपतींची गुरुपरंपरा असल्यानें तो अभंग येथें तसाच देतों.—आदिनारायण गुरु कृष्ण परब्रह्म। तयासी प्रणाम असो माझे ॥ १ ॥ ब्रह्मा, नारद, व्यास, शुक, मच्छनाथ। तयां प्रणिपात असो माझे ॥ २ ॥ अमृत, सिद्ध, महाराज नारायण। तयासीं नमन असो माझें ॥ ३ ॥ आदि अंतीं माझा असो नमस्कार। यावें सपरिवार भजनासी ॥ ४ ॥ हीच इच्छा माझी म्हणे रघुपति। गावी सद्गुरुकीर्ति वारंवार ॥ ५ ॥

श्रीरघुपति बडोद्यांत असतांना श्रीलक्ष्मणमहाराज यात्रा करीत येथें आले, ते बडोद्यास राहून लगेच डाकोरास गेले. तेथें त्यांस स्वप्न पडलें कीं, "माझा परमभक्त रघुपति बडोद्यास असतांना आपण त्यांस भेटल्यावांचून येथें आलां, तर तसें न करतां आपण रघुपतीस सत्वर भेटावें." लगेच लक्ष्मणमहाराज बडोद्यास रघुपतींचा तपास करीत आले. रघुपति आपल्या बाप्पाजीस निजवून दार बंद करून बाहेर येतात, तोंच श्रीलक्ष्मणमहाराज शोध करीत येत असल्याचें त्यांस समजलें. तावडतोब सामोरे जाऊन परस्परांस प्रेमानें भेटले व उभयतांस परम संतोष झाला.

लक्ष्मण महाराजांस उच्चासनीं बसवून रघुपति त्यांचेजवळ बसले. नंतर आपणास डाकोरास जें स्वप्न पडलें, तें लक्ष्मण महाराजांनीं रघुपतीस सांगितल्यावरून बाप्पाजींनीं हें नवल केल्याचें पाहून रघुपतीस आश्चर्य वाटलें. पुन्हां लक्ष्मणमहाराज म्हणाले, बाप्पाजींनीं तर शयन केलें. देवद्वारें बंद झालीं. आणि आम्हांस तर दर्शनेच्छा आहे.

हें ऐकून रघुपती बोलले कीं महाराज हें काय ? जरी बाप्पाजी निजले आहेत, तरी भक्ताकरितां ते जागृत असून देहोदेहीं नारायण सदैव जागृतच आहेत. ह्या बोलण्यानें उभयतांस खूण पटून उभयतांही एकमेकांचे हात धरून देवद्वाराजवळ आले. तों शिष्यानें देवद्वार उघडिलें. आंत जाऊन पहातात तों बाप्पाजी पालखींत उठून बसले असून पालखीस आपोआप झोके चालू आहेत हें पाहून उभयतांस बहुत आनंद होऊन नेत्रांवाटे प्रेमाश्रु चालले. लक्ष्मण महाराजांस प्रेम न आवरून त्यांनी बाप्पाजीस पालखींतून उचलून घेऊन हृदयाशीं धरून आलिंगन दिलें, व पूर्ववत् पालखींत ठेविलें, आणि रघुपतीकडे सद्गत् अंतःकरणानें पाहून ते प्रेमानें त्यांस कडकडून भेटले. नंतर लक्ष्मण महाराज कांहीं वेळ बसून मुक्कामीं गेले. पुढें तेही येथें मठ बांधून राहिले. तें संस्थानही बडोद्यास सुप्रसिद्ध आहे. दुसरा चमत्कार असा कीं, पूर्वीं सांगितलेले बेलापुरचे ब्रह्मसाक्षात्कार झालेले, केशव गोविंद यांचे समाधीपुढें एक ब्राह्मण आत्मप्राप्तीकरितां सतत सात दिवस अनुष्ठान करीत बसला. आठवे दिवशीं त्यास दृष्टांत झाला कीं, बडोद्यास रघुपति ईश्वराचे परमभक्त आहेत, ते तुझी इच्छा पूर्ण करतील, आणि तुझे आसनाखालीं चिठ्ठी आहे ती पहा त्याप्रमाणें तपास करितां आसनाखालीं त्यास चिठ्ठी मिळाली. ती घेऊन ब्राह्मण रघुपतीकडे आला. त्यास पाहतांच रघुपति उठून त्यांनीं त्यास आलिंगन दिलें, आणि म्हणाले कीं आपणास मिळालेलें पत्र मजकडे द्या. मी एक गरीब ब्राह्मण चार ठिकाणीं पुराण सांगून उदरनिर्वाह करितों, मला ब्रह्मज्ञान कोठचें ? असो. शिष्यमहिमा वाढविण्याकरितां त्यांनीं आपणास मजकडे पाठविलें असेल. आतां

आपण विश्रांति घ्या. हें ऐकून ब्राह्मण चकित झाला. मग त्यास कांहीं दिवस जवळ ठेवून कृतकार्य करून परत पाठविलें.

रघुपतींचा दर पौर्णिमेस डाकोरास जाण्याचा नियम असे. त्याप्रमाणें एका पौर्णिमेस ते डाकोरास गेले असतां, त्यांस स्वप्न पडलें कीं आतां येथें येणें बंद करा, व माझा एक भक्त पट्टण मुक्कामीं दोन मूर्ति घडीत आहे, त्या आणून त्यांची स्थापना करून तेथेंच भजन पूजन करून असावें. त्या भक्तास मी मूर्ति तुम्हांस देण्याविषयीं दृष्टांतानें सुचविलें आहे. त्याप्रमाणें रघुपतींनीं आपले शिष्य गोविंदराव फडनवीस यांस पट्टण येथें पत्र लिहून कळविलें. त्यावरून गोविंदराव त्या कारागिराकडे गेले, तेव्हां त्यानेंही आपणास झालेल्या दृष्टांताची हकीकत त्यांस कळविली. मग मोठ्या समारंभानें मूर्ति पट्टणाहून बडोद्यास आणून स्थापना केली, व मंदिर बांधिलें.

रघुपति कविता उत्तम करीत असत. त्यांची कविता रसाळ, प्रेमळ, सात्विक भाव उत्पन्न करणारी अशी असे. त्यांच्या कवितेच्या गाथा संस्थानामध्यें आहेत. रघुपति भजनांत आपलीच कविता म्हणत व त्या श्रोत्यास अगदीं तल्लीन करून सोडीत त्यामुळें महिमा फारच वाढत चालला. एका सौ. सगुणाबाई नांवाच्या बाईनें पुत्रेच्छेनें रघुपतीची फार दिवस एकनिष्ठेनें सेवा केली. एके दिवशीं नियमाप्रमाणें प्रातःकाळीं सगुणाबाई येऊन हात जोडून पुढें उभ्या राहिल्या. रघुपतीनें तिचा भाव व इच्छा जाणून तीस श्रीचा तांबूल दिला व इच्छा पूर्ण होईल म्हणून आशीर्वाद दिला. त्याप्रमाणें बाईस ४२ वे वर्षी पुत्र झाला. दुसरे, रा. बापुसाहेब नगदी पागेदार व त्यांचें कुटुंब सौ. म्हाळसाबाई यांनींही रघुपतीची एकनिष्ठेनें सेवा केल्यामुळें त्यांस रघुपतीनें विठ्ठलाचें तीर्थ दिलें त्यायोगें त्यांसही

पुत्र होऊन त्यांची इच्छा पूर्ण झाली. खानदेशांतील नामपूर गांवीं राहणार चिमणभट्ट हे आपलें कुटुंब सौ. रखमाबाईस अकरा वर्षें पोटांत सल राहिल्यामुळें पुष्कळ प्रयत्न केला तरी संतति होईना, तेव्हां बडोद्यास येऊन त्यांनीं रघुपतीची मनोभावें सेवा केल्यामुळें रघुपतींनीं संतुष्ट होऊन त्यांस श्रीविठ्ठलाचें तीर्थ दिलें. त्या योगानें सल वाढीस लागून सर्व गुणसंपन्न असा पुत्र झाला. हाच पुत्र पुढें विष्णुदास नांवानें प्रसिद्धीस आला व त्यास रघुपतीनें आपल्या मागें संस्थानची सर्व व्यवस्था सोंपविली. चिमणभट्टानें व रखमाबाईनीं कृतज्ञ बुद्धीनें रघुपतीची सेवा हयातीपर्यंत सोडिली नाहीं. त्यामुळें विष्णुदासास बाळपणापासून भजन—पूजनाचा अनायासें सहवास झाला. विष्णुदासाचा कंठ मधुर असून रागतालाचें ज्ञान त्यास उत्तम असल्या-मुळें रघुपतीस त्यांचें भजन फारच आवडे, व त्यांचे आंगचे इतर सद्गु-णांवरून आपल्या मागें श्रीची हा उत्तम प्रकारें व्यवस्था ठेवील असा भरंवसा पटला. विष्णुदास हिशेबी लिहिणार उत्तम निपजले. ते वयांत आल्यावर त्यांस फर्स्ट क्लास सरदार घोरपडे यांचे पदरीं दिवा-णगिरीची जागा मिळाली. व तें काम ते उत्तम प्रकारें चालवूं लागले. तेणेंकरून त्यांचे भजन—पूजन वगैरे सेवेंत अंतर पडूं लागलें. ही गोष्ट रघुपतीस न आवडून यांनीं विष्णुदासास जवळ बोलावून एके दिवशीं पुष्कळ उपदेश केला. तो ऐकतांच तत्काल विष्णुदासास उपरति झाली व अतःपर नोकरी करणार नाहीं अशी त्यांनीं शपथ घेतली व डोक्यास सांप्रदायी रुमाल बांधिला. ह्याप्र-माणें त्यांचा दृढनिश्चय पाहून रघुपतीनें तेच दिवशीं आपणास गुरु-परंपरेनेंच झालेला उपदेश विष्णुदासास देऊन कृतार्थ केलें. रघुप-तीचे सहवासानें व अनुग्रहानें देखील दूरदूरचे लोक ईश्वरभक्तीस

आपण विश्रांति घ्या. हें ऐकून ब्राह्मण चकित झाला. मग त्यास कांहीं दिवस जवळ ठेवून कृतकार्य करून परत पाठविलें.

रघुपतींचा दर पौर्णिमेस डाकोरास जाण्याचा नियम असे. त्याप्रमाणें एका पौर्णिमेस ते डाकोरास गेले असतां, त्यांस स्वप्न पडलें कीं आतां येथें येणें बंद करा, व माझा एक भक्त पट्टण मुक्कामीं दोन मूर्ति घडीत आहे, त्या आणून त्यांची स्थापना करून तेथेंच भजन पूजन करून असावें. त्या भक्तास मी मूर्ति तुम्हांस देण्याविषयीं दृष्टांतानें सुचविलें आहे. त्याप्रमाणें रघुपतींनीं आपले शिष्य गोविंदराव फडनवीस यांस पट्टण येथें पत्र लिहून कळविलें. त्यावरून गोविंदराव त्या कारागिराकडे गेले, तेव्हां त्यानेंही आपणास झालेल्या दृष्टांताची हकीकत त्यांस कळविली. मग मोठ्या समारंभानें मूर्ति पट्टणाहून बडोद्यास आणून स्थापना केली, व मंदिर बांधिलें.

रघुपति कविता उत्तम करीत असत. त्यांची कविता रसाळ, प्रेमळ, सात्विक भाव उत्पन्न करणारी अशी असे. त्यांच्या कवितेच्या गाथा संस्थानामध्यें आहेत. रघुपति भजनांत आपलीच कविता म्हणत व त्या श्रोत्यास अगदीं तल्लीन करून सोडीत त्यामुळें महिमा फारच वाढत चालला. एका सौ. सगुणाबाई नांवाच्या बाईनें पुत्रेच्छेनें रघुपतीची फार दिवस एकनिष्ठेनें सेवा केली. एके दिवशीं नियमाप्रमाणें प्रातःकाळीं सगुणाबाई येऊन हात जोडून पुढें उभ्या राहिल्या. रघुपतीनें तिचा भाव व इच्छा जाणून तीस श्रीचा तांबूल दिला व इच्छा पूर्ण होईल म्हणून आशीर्वाद दिला. त्याप्रमाणें बाईस ४२ वे वर्षी पुत्र झाला. दुसरे, रा. बापुसाहेब नगदी पागेदार व त्यांचें कुटुंब सौ. म्हाळसाबाई यांनींही रघुपतीची एकनिष्ठेनें सेवा केल्यामुळें त्यांस रघुपतीनें विठ्ठलाचें तीर्थ दिलें त्यायोगें त्यांसही

पुत्र होऊन त्यांची इच्छा पूर्ण झाली. खानदेशांतील नामपूर गांवीं राहणार चिमणभट्ट हे आपलें कुटुंब सौ. रखमाबाईस अकरा वर्षे पोटांत सल राहिल्यामुळें पुष्कळ प्रयत्न केला तरी संतति होईना, तेव्हां बडोद्यास येऊन त्यांनीं रघुपतीची मनोभावें सेवा केल्यामुळें रघुपतींनीं संतुष्ट होऊन त्यांस श्रीविठ्ठलाचें तीर्थ दिलें. त्या योगानें सल वाढीस लागून सर्व गुणसंपन्न असा पुत्र झाला. हाच पुत्र पुढें विष्णुदास नांवानें प्रसिद्धीस आला व त्यास रघुपतीनें आपल्या मागें संस्थानची सर्व व्यवस्था सोंपविली. चिमणभट्टानें व रखमाबाईनीं कृतज्ञ बुद्धीनें रघुपतीची सेवा हयातीपर्यंत सोडिली नाहीं. त्यामुळें विष्णुदासास बाळपणापासून भजन-पूजनाचा अनायासें सहवास झाला. विष्णुदासाचा कंठ मधुर असून रागतालाचें ज्ञान त्यास उत्तम असल्या-मुळें रघुपतीस त्यांचें भजन फारच आवडे, व त्यांचे आंगचे इतर सद्गु-णांवरून आपल्या मागें श्रीची हा उत्तम प्रकारें व्यवस्था ठेवील असा भरंवसा पटला. विष्णुदास हिशेबी लिहिणार उत्तम निपजले. ते वयांत आल्यावर त्यांस फर्स्ट क्लास सरदार घोरपडे यांचे पदरीं दिवा-णगिरीची जागा मिळाली. व तें काम ते उत्तम प्रकारें चालवूं लागले. तेणेंकरून त्यांचे भजन-पूजन वगैरे सेवेंत अंतर पडूं लागलें. ही गोष्ट रघुपतीस न आवडून यांनीं विष्णुदासास जवळ बोलावून एके दिवशीं पुष्कळ उपदेश केला. तो ऐकतांच तत्काल विष्णुदासास उपरति झाली व अतःपर नोकरी करणार नाहीं अशी त्यांनीं शपथ घेतली व डोक्यास सांप्रदायी रुमाल बांधिला. ह्याप्र-माणें त्यांचा दृढनिश्चय पाहून रघुपतीनें तेच दिवशीं आपणास गुरु-परंपरेनेंच झालेला उपदेश विष्णुदासास देऊन कृतार्थ केलें. रघुप-तीचे सहवासानें व अनुग्रहानें देखील दूरदूरचे लोक ईश्वरभक्तीस

लागले, रघुपतीचा शिष्यसमुदाय बराच वाढला. याप्रमाणें क्रम चालला असतां यद्दष्टं तन्नष्टं—या उक्तीप्रमाणें देह हा केव्हां तरी जाणार. रघुपतीनें आपल्या प्रयाणासाठीं शुभ दिवस पाहून कायम केला. तो दिवस येतांच पूर्व दिवशीं सर्व शिष्य सांप्रदायी व भक्त मंडळीस रघुपतीनें आज्ञा केली कीं, ' आज सर्वांनीं आपापला नित्य-क्रम आटोपून भजनास यावें व रात्रौ येथेंच शयन करावें ? ह्याप्रमाणें आज्ञा होतांच सर्व मंडळी घरोघर गेली. सायंकाळीं रघुपतीचे स्नेही सुगंधीबुवा त्यांचे भेटीस आले. साधूंच्या कृति साधूंनींच ओळखाव्या, या उक्तीप्रमाणें त्यांनीं त्या दिवशींचें रघुपतीचें वर्तन पाहून विचारिलें, कीं ' प्रयाणाचा विचार आहे कीं काय ? ' हें ऐकून रघुपतीनें सांगि-तलें कीं ' आपण याचा वाच्यांश करूं नये, केल्यास सर्वत्र व्यर्थ श्रम होऊन माझे जाण्यांत व्यत्यय येऊन मुहूर्त साधणार नाहीं.' हें ऐकून सुगंधीबुवा म्हणाले, ' ठीक आहे, आपण पुढें चला, आम्हीही मागा-हून येत आहों,' असें म्हणून ते परत गेले. हे सुगंधीबुवा त्या वेळचे चांगले साधु असून उत्तम योगाभ्यासी होते. त्यांची समाधि बडोदें येथें काळीयावाडींत आहे.

वर लिहिलेल्या उभयतांच्या गोष्टी विष्णुदासानें आडून ऐकिल्या होत्या. सुगंधीबुवा जातांच त्यांनीं रघुपतीचे चरण धरिले, आणि परम गहिंवर आला, तेव्हां रघुपतीनें त्याचें अनेक प्रकारें समाधान केलें, व ' आतां आमचे जाण्यास व्यत्यय आणूं नका, कारण मुहूर्तांत अंतर पडेल ' असें ते म्हणाले. त्यावरून विष्णुदासहि स्वस्थ राहिले. मग रात्रौ मंडळी आल्यावर सर्व रात्रभर प्रेमळ भजन करून दुसरे दिवशीं सकाळीं म्हणजे संवत् १९०१ चे चैत्र शुद्ध ६ रोजीं ८ घटका दिवस आल्यावर रघुपतीनें परलोकीं गमन केलें.

श्रीरघुपतिमहाराज हे जसे मोठे वैराग्यशील सत्पुरुष होते, तसेच ते प्रेमळ कवीही होते. त्यांच्या कवितेंत यमकांचा किंवा अलंकारांचा थाटमाट मुळींच नाहीं म्हटल्यास चालेल, परंतु पूर्ण अनुभवी सत्पुरुषाची अधिकारयुक्त वाणी या दृष्टीनें ती कविता कोणत्याही मुमुक्षूस अत्यंत आनंददायक वाटेल यांत संशय नाहीं. रघुपतिमहाराजांचीं कांहीं पदें मात्र उपलब्ध आहेत. त्यांतील कांहीं पदें, आमच्या विनंतीस मान देऊन बडोदें येथील प्रसिद्ध इतिहासकार रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए. यांनीं पाठविलीं, त्यांचा येथें संग्रह करून हा लेख पुरा करितों.

पद.

सद्गुरु सेवेविण साधन कांहीं ॥
नाहीं नाहीं शास्त्रें शोधुनि पाहीं ॥ धृ ॥
सद्गुरु सेवेविण कैंचारे मोक्ष ॥
गोरक्ष ज्ञानदेव एकनाथ साक्ष ॥ १ ॥
संदिपना घरिं देवें पहा केले कष्ट ॥
रात्रंदिवस शिरीं वाहिलें काष्ठ ॥ २ ॥
सद्गुरु सेवेसी जो का विन्मुख ॥
तया चांडाळाचें पाहुं नये मुख ॥ ३ ॥
सद्गुरुची आज्ञा जो का न मानी ॥
तो पापी पावे गर्धभ योनी ॥ ४ ॥
सद्गुरु देवा जो मनुष्य लक्षी ॥
म्हसणीहीवर होउनी बसती गीध पक्षी ॥ ५ ॥
सद्गुरुची निंदा करि ऐके श्रवणीं ॥
विष्ठा भक्षी नीच सूकर होउनी ॥ ६ ॥

सद्गुरु भजनीं घेति जे झोंप ॥
ते निर्जळ कूपीं होताती साप ॥ ७ ॥
सद्गुरु आश्रम उलंघुनि जाय ॥
तया पदोपदीं वालहत्या होय ॥ ८ ॥
गुरुद्रोह गुरुवंधु भगिनिसी द्वेष ॥
करिती त्यासी सदा रौरवीं वास ॥ ९ ॥
गुरुसी अनृत वदे जो करी कोप ॥
न चुके चौऱ्यायसी त्या होय वज्रलेप ॥ १० ॥
सद्गुरुशीं शरण म्हणे रघुपति ॥
जैसा ज्याचा भाव तैसी त्याला गती ॥ ११ ॥

पद.

घ्यारे सद्गुरु दिक्षा ॥ वापानो नका करूं उपेक्षा ॥ ध्रु ॥
आधी आचार्या शरण रिघावें ॥ आत्मोद्धारक गूज पुसावें
गुरुरायाची कृपा संपादुनि ॥ वहुतचि मर्जी रक्षा ॥ १ ॥
अध्यारोप अपवाद लक्षण ॥ श्रवण करावे एकांत मनन
मिथ्या काय काय सत्य ॥ गुरुपाशीं हीच मागावी भिक्षा ॥ २ ॥
ऐका दोर अहिशाणु पुरुष ॥ शुक्तीकेवरी रजता भास
कीर्णि उदक तसे ब्रह्मी दृश्य हे ॥ त्यजुनि अधिष्ठान लक्षा ॥ ३ ॥
घट मृत्तिका तंतु वसन ॥ हेमालंकार तरंग जीवन ॥
जसे तसे जिव शीव ऐक्य ॥ विना नाहि उपाय परमोक्षा ॥ ४ ॥
आस्ति भाति सच्चिद् रुप जें ॥ नामरूप आकार आदिजें ॥
आदि मध्यें व्यापक तेचि तूं ॥ ऐसी वेदाची शिक्षा ॥ ५ ॥
अथवा अष्टांग योग साधा ॥ चित्त रोधुनी तत्व शोधा ॥
किंवा भक्ति ध्यान उपासना ॥ धरा मनीं मुमुक्षा ॥ ६ ॥

म्हणे रघुपति गुरुपद सेवा ॥ तत्पद त्वंपद विचार करावा ॥
असनिं शंयनिं भोजनीं भजन करा ॥ राखा गुरुचा नक्षा ॥७॥

पद.

कृष्णा तुझ्या पाद पद्म पिंजऱ्या मधीं ॥
माझा मानस राजहंस वसेल हा कधी ॥ धृ ॥
प्राण प्रयाण समवात कफपित्त व्याधी ॥
कंठ रोध होइल मग तुझें स्मरण कधी ॥ १ ॥
आज उद्या उधार नाहीं मज अवधी ॥
चित्त स्थीर होइना नामीं मति नाहीं सुधी ॥ २ ॥
नारायणा करी दया दीन दयानिधी ॥
रघुपति समाचार घेत जावा अधी ॥ ३ ॥

पद.

ब्रह्मादिका ज्याचें ध्यान ॥ तोहा विठ्ठल निधान ॥ धृ० ॥
देवकीचे उदरीं जन्मुनि केलें ॥ यशोदेचें स्तनपान ॥ १ ॥
यमुना तट व्रजवासि गोपिसी ॥ क्रिडा करी भगवान ॥ २ ॥
पूर्ण ब्रह्म अवतार राधासवें ॥ हिंडत रानोरान ॥ ३ ॥
पंडुसुताचे साह्य करुनिया ॥ कौरवाचि केली घाण ॥ ४ ॥
रुक्मिणि करितां येउनि दिधले ॥ पुंडलिका वर दान ॥ ५ ॥
विटेवरि कटि कर उभा सावळा ॥ समपद ज्याचे ठाण ॥ ६ ॥
म्हणे रघुपति भेटेल केव्हा ॥ डोळा उरला प्राण ॥ ७ ॥

धांवा

नारायण गुरुराया धाव तूं अंत पाहसी किती ॥
अंतकाळींचा तारु सद्गुरु बोलति वेदश्रुति ॥ धृ० ॥

घोळूं लाटी हो ॥ २ ॥ झाडझूड करि नामदेवाघरीं भरुनि केराची पाटी ॥ म्हणे जनांसि कष्टि नको होऊं दळितां सांगे गोष्टी हो ॥ मिराबाईचें विष प्राशितां हात लावी हनुवटी हो ॥ श्रमलिस माय वहिणी माझा त्रास नको धरुं पोटीं हो ॥ ३ ॥ माधवदासा अतिसार होतां धुतो अंग लंगोटी हो ॥ सुरदासासी वाट दावाया हळुच धरी हातीं काठी हो ॥ दीन अनाथ अशक्त जाणुनि जवळ आले जगजेठी हो ॥ नारायण गुरु शरण रघुपति चरणीं घाली मिठी हो ॥ ४ ॥

## गणपतराव साधु

( लें० महादेव रामकृष्ण देशपांडे. )

धर्मार्थं यस्य वित्तेहा वरं तस्य निरीहता ॥
प्रक्षालनाद्धि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम् ॥ १ ॥

( हितोपदेश )

देवळी येथील कवींपैकीं, किंबहुना तेथील समाप्त झालेल्या सर्व साधुपुरुषांपैकीं हे कवि अगदीं शेवटचे होत. हे आश्वलायन शाखेचे ब्राह्मण असून यांच्या वडिलांचे नांव जागेश्वर बुवा, मातोश्रीचें नांव अन्नपूर्णाबाई, आडनांव मंगदे. वडिलांची वस्ती मूळची उमरावतीची, परंतु राजाश्रय मिळाल्यामुळें यांचे वडील मातोश्री नागपुरास येऊन राहिले. नागपुरास आल्यावर शके १७७१ या वर्षी शुभकालीं यांना पुत्ररत्न झालें. हेच आपले प्रस्तुत चरित्रनायक होत. जागेश्वरबुवांनीं पुत्राचे जन्मोत्सव कालीं यथाशक्ति पुण्यकृत्यें करून त्याचें नांव ‘ गणपति ’ असें ठेविलें. गणपतरावाचे

बालपणीं एके दिवशीं जागेश्वरबुवा त्यांस घेऊन नागपूरचे त्या वेळचे विद्यमान सत्पुरुष श्रीडोकेमहाराज यांच्या दर्शनास गेले व त्यांनीं महाराजांस साष्टांग नमस्कार करून मुलासही त्यांचे पायांवर घातलें. महाराजांनीं मुलास मोठ्या प्रीतीनें कुरवाळून आशिर्वाद दिला कीं हा पुढें चांगला बुद्धिमान रामभक्त होईल. यानंतर कांहीं दिवसांनीं सोनेगांवकर श्रीआबाजीमहाराजांचे विख्यात चिरंजीव श्री विठोबादादा ऊर्फ नानाजीमहाराज हे कांहीं कार्यानिमित्त नागपुरास गेले असतां शहरवासीय इतर लोकांप्रमाणें जागेश्वरबुवाही त्यांचे दर्शनास पुत्रासह गेले. त्या वेळीं नानाजीमहाराजांनींही मुलास मांडीवर घेऊन आशिर्वाद दिला कीं हा पुण्यपुरुष होईल. या प्रमाणें सत्पुरुषांचे आशिर्वाद मिळाल्यानंतर गणपतरावाच्या वयाचे पांचवे वर्षीं पित्यानें त्यांचें मौंजीबंधन केलें व गुरुगृहीं त्यांचेकडून यथोचित् विद्याभ्यास करविला. वयांत आल्यावर गणपतरावाचें लग्न श्रीक्षेत्र आदासें येथील विनायक पांडुरंग नामें एका वसिष्ठगोत्री गाणपत्याच्या सरस्वति नाम्नी मुलीशीं झालें. लग्नानंतर कांहीं काळ आनंदांत गेला.

'चाकाचे आरे जसे एकामागून एक फिरत असतात त्याप्रमाणें प्राणीमात्रास दुःखानंतर, सुख व सुखानंतर दुःख प्राप्त व्हावयाचेंच' असा सिद्धांत आहे. त्याप्रमाणें गणपतराव सोळा वर्षांचें झाल्यावर त्यांचे प्रिय तीर्थरूप परलोकवासी झाले, भोंसल्यांचे येथील आश्रय सुटला, चरितार्थाची पंचाईत पडूं लागली, व त्यामुळें त्यांनीं सरकारी पोलीस खात्यांत नोकरी धरिली. याच सुमारास त्यांनीं पौनीचे श्री आबाजी गाडगे यांचा महावाक्योपदेश घेतला. हे आबाजीमहाराज सोनेगांवकर आबाजीमहाराजांच्या नाताचे व्याही होत. पौनीकर आबाजीची कन्या सोनेगांवकर आबाजीमहाराजांचे हल्लीं विद्यमान

असलेले पणतु श्री दामोदरपंत दानी यांना दिली आहे. असो. गुर्वोपदेशाप्रमाणें गणपतरावांनीं श्रीरामचंद्राची उपासना चालविली व पोलीस खात्यांतील नौकरीसारखी कष्टप्रद नोकरी योग्य रीतीनें सांभाळून यथावकाश ब्रह्मकर्म व यथाशक्ति दानधर्म सुरूं ठेविला.

वर्धा जिल्ह्यांत ' चीफ कान्टेबल ' असतांना सालोडफकीर मुक्कामीं एका फौजदारीप्रकरणांत अपरिहार्य आळ आली त्यामुळें ते फार घाबरले व आपल्या उपास्य दैवतास त्यांनीं कांहीं नवस केला. नवसाप्रमाणें प्रभु रामचंद्रांनीं संकट निवारलें; तें पाहून त्यांना ईश्वराविषयीं प्रेम व या नश्वरसंसाराविषयीं वैराग्य उत्पन्न झालें आणि तत्क्षणींच त्यांनीं घरावर तुळशीदळ टाकून तें ब्राह्मणांकडून लुटविलें व नोकरीचा राजीनामा दिला. त्या दिवसापासून त्यांनीं उपवास करणेंही सुरूं केलें, तथापि देहनिर्वाहाकरितां अल्पसें दुग्ध मात्र घेत असत व अशा स्थितींत ते साष्टांग नमस्कार घालीत घालीत रामक्षेत्रांत[1] जावयास निघाले. मंडळीसहित मार्ग आक्रमण करीत असतां मध्यंतरी ते फाटक नांवाचे गांवीं वाट चुकले. इतक्यांत तेथें एक सोनार प्राप्त झाला व त्यानें त्यांस रामस्मरणयुक्त बोध करून रस्ता दाखविला. अकस्मात् प्राप्त होऊन बोधामृत पाजणारा हा पुरुष प्रभुरामचंद्रच सोनाररूपानें आला असावा असा त्यांचा दृढ समज झाला व ते अत्यंत सद्गदित होत्साते रामक्षेत्रीं प्राप्त झाले. त्यांची ती कडकडीत तपश्चर्या पाहून तेथील त्या वेळचे मालगुजार शिवराजसिंग यांनीं त्यांच्या पारण्यानिमित्त हस्तें परहस्तें बहुत अन्नदान केलें व ते ( गणपतराव ) रामटेकास होते तावत्कालपर्यंत अन्नदान अव्याहत चालू

१ रामटेकास.

ठेविलें. याप्रमाणें रामक्षेत्रीं प्रभुरामचंद्रदर्शन सुख घेतल्यानंतर गणपतराव तेथून निघाले तों महत्कष्ट सोसून ते सेतुबंधरामेश्वरास प्राप्त झाले व तेथें कांहीं दिवस राहून तेथील सेतु घेऊन देवळीस परत आले.

घरावर तुळशीदळ टाकल्यापासून आतांपर्यंतच्या कडकडीत वैराग्याकडे पाहून गणपतराव आतां देवळीकर कित्येक महानुभाव संतांप्रमाणें ' निरपेक्षं मुनिं शांतं ' या भागवतांतील श्रेष्ठतम श्लोकांतल्या पथ्याचें दृढावलंबन करून महानुभव संत होणार अशी सर्वत्रांची अपेक्षा होती परंतु तसें न करितां जनतेची कित्येकांशीं निराशा केली. रामेश्वराहून आल्यानंतर लागलीच त्यांनीं रामदासी दीक्षा धारण करून आपला शिष्यसांप्रदाय सुरू केला, कांहीं दिवस अयाचित् वृत्ति स्वीकारिली, कीर्तनाचा धंदा सुरू केला व अशाप्रकारें " गणपतराव साधु " या नांवानें प्रसिद्ध झाले. याप्रमाणें कांहीं दिवस क्रम चालला असतां ' देवळींत आपला एक मठ बांधावा ' असें त्यांच्या मनांत आलें, तत्प्रीत्यर्थ त्यांनीं स्वपरस्थळस्थ धनिक लोकांजवळ बरीच याचना केली, आणि त्यांच्या आंगच्या पूर्वपुण्याईप्रमुख कित्येक असाधारण गुणांमुळें त्यांचा हेतु अल्पावधींत तडीस गेला. या मठाचें वर्णन बडनेऱ्याचे रा० जगन्नाथ आत्माराम बिड यांनीं पद्यांत केलें आहे तें सर्वांशीं जरी नाहीं तरी कांहीं अंशीं वस्तुस्थितीस अनुसरून दिसतें करितां तेंच येथें देतों:—

ओंव्या.

**चौफेर मठ विस्तीर्ण ॥ मध्यें देऊळ शोभायमान ॥**
**चारी द्वारें शुभ्र सिंहासन ॥ वरी कळस विराजे ॥ १ ॥**

गुरुवार सुमुहूर्त पाहून ॥ श्रीराम बंधु लक्ष्मण ॥
भूमिकन्या सीता जाण ॥ त्रयमूर्ति स्थापिल्या ॥ २ ॥
गरुड हनुमंत वीर ॥ हस्त जोडोनि उभे समोर ॥
तेथील शोभा रमणीय फार ॥ किती म्हणोनी वर्णावी ॥३॥

पद.

देवळी स्थान, शुभग्राम, जेथ श्रीराम, घेति[1] विश्राम,
भक्तजन हृदयीं ॥ गुरुराय गणपती रामगुण गाई ॥ धृ० ॥
किति वर्णुं मठाचा थाट, मुक्तीची वाट, सभोंवती अफाट,
भिंति त्या पाही ॥ गुरुराय० ॥ १ ॥
पातालविवर जणुं विहीर, सुधेसम नीर, बाग गुलजार,
सरूच्या राई ॥ गुरुराय० ॥ २ ॥
किति फळें फुलें अर्पिती, वृक्षवेलि ती, नसे ज्या मिती,
सुखद जी होई ॥ गुरुराज० ॥ ३ ॥
चौघडा सदोदित झडे, नादरव अडे, रामपदिं जडे,
लक्ष्य त्या समयीं ॥ गुरुराय० ॥ ४ ॥
चैत्रांत शुक्ल पक्षांत, रामनवरात्र, नवमि अहोरात्र,
भक्तजन येई ॥ यात्रेस नुरे ती सिमा दाटि बहु होई,
भिक्षार्थि येति जे त्यांस आणिक यात्रेस, किं ते
भजनास येति सर्वांही ॥ घालिती भोजनें आग्रहें पाही ॥

---

१ हें पद तालांत म्हणतां येणें कितपत् शक्य आहे हें तज्ज्ञांस स्पष्ट दिसतेंच आहे. प्रस्तुत स्थळीं आपणास त्यांतील फक्त मजकुराची जरूरी आहे म्हणून इतर बाबतींत त्याचें विदारण करण्याचें प्रयोजन नाहीं.

असो. याप्रमाणें व्यवस्थेशीर मठाची रचना केल्यावर गणपतराव साधूंनीं आपला हरिदासपणाचा धंदा व तत्प्रीत्यर्थ दौरा झपाट्यानें चालू केला. आणि स्वरूप, पोशाख, थाटमाट, ऐट, गायन, वाद्यें, साथी, वक्तृत्व,मुत्सद्दीपणा,धूर्तता,समयसूचकता इत्याद्यनेक गोष्टी त्यांच्या चांगल्यापैकींच असल्यामुळें त्यांनीं या धंद्यावर द्रव्य व लौकिक चांगला संपादन केला. त्यांचें संस्कृताचें ज्ञान जरी यथातथाच होतें तरी मराठी व हिंदी भाषेंत ते उत्तम कथा करीत असत. कधीं कधीं मूळांत ज्याचा मागमूसही नाहीं असेंही एखादें स्वकपोलकल्पित चरित्र लावून ते एखादे प्रसंगीं श्रोतृवृंदाचें उत्कृष्ट रीतीनें मनरंजन करीत असत. अशा प्रकारच्या त्यांच्या आख्यानांपैकीं ' नागकन्या-स्वयंवर[1] ' म्हणून एक आख्यान सोनेगांव मुक्कामीं माझ्या ऐकण्यांत आलें होतें. त्याचें माझ्या स्मरणांतील सांप्रतचें अवशेष असें:—
" पौराणकाळीं एकेसमयीं नागकन्येचें म्हणजे आमच्या फणिंद्रपूरच्या (नागपूरच्या) मुख्य दैवताच्या कन्येचें स्वयंवर झालें. त्या समयीं स्वयं-वराकरितां आलेले पाहुणे जेथें जेथें बिऱ्हाड करून राहिले होते त्या त्या स्थळास त्या प्रसंगापासून त्या त्या पाहुण्याचें खालील प्रमाणें नांव देण्यांत आलें. शक्र ( इंद्र ) राहिला होता त्या स्थळास शक्रदरा ( हल्लींचा अपभ्रंश सक्करदरा ), हंसासहित ब्रह्मदेव राहिले होते त्यास

---

१. हें चरित्र त्यांचें स्वकपोलकल्पित आहे असें म्हणण्याचें जरी मीं येथें धाडस केलें आहे तरी तें उपलब्ध असल्यास कोणी शोधकानें प्रसिद्ध करण्याची अवश्य कृपा करावी म्हणजे आमच्या प्रांताच्या राजधानीची पौराणिक माहिती होऊन आम्हां मध्यप्रांतीयांस विशेष कौतुक वाटेल. माझ्या-मतें किंचित वस्तुस्थितीस गणपतरावांनीं मनसोक्त कथा सौंदर्याची जोड केली असावी असें वाटतें.

हंसापुरी, गणपतीबुवा राहिले होते त्यास गणेशपेठ, सीताबाई पाहुण्या म्हणून आल्या असतां जेथें राहिल्या त्या स्थळास सीताबर्डी, सीताबाईंच्या संरक्षणार्थ मारुतीराय येऊन राहिले होते त्या स्थळास शनिवार पेठ, मुख्य यजमानांचें म्हणजे नागराजांचें निवासस्थान सांप्रतचा आदिवार-दरवाजा व त्यांच्या एकंदर भागास आदितवार पेठ अशा अनेक प्रकारच्या संज्ञा व शिवाय आणखी विस्तृत अशी विविध प्रकारची माहिती अगदीं बरोबर बसवून देऊन त्यांनीं हें आख्यान रंगविलें होतें. याच-प्रमाणें एके प्रसंगीं देवळी मुक्कामीं श्रीमनोहरमहाराजांच्या देवळांत त्यांचें मनसोक्त कथा सौंदर्ययुक्त असें मुक्तेश्वरचरित्रही ऐकण्यांत आलें होतें. याही कीर्तनास सोनेगांवकर श्री गोविंद गुरुमहाराज व बाबा-साहेब देशमुख प्रभृति देवळीकर ठळक मंडळी हाजर होती. वर दर्शविलेल्या प्रसंगींच नव्हे तर बरींच वर्षें गणपतराव साधु सोनेगांव देवस्थानच्या महोत्सवांत नेमानें कीर्तन करीत असत व कार्तिकोत्स-वांतील एकादशीचे दिवशीं ते मोठी मेहनत घेऊन दिंडींतील मंडळी-सह सुश्राव्य असें भजन करीत असत. त्या दिवशीं रात्रभर नगर-प्रदक्षणेच्या वेळीं अनेक दिंडयांतील अनेक उत्तमोत्तम भजनपटूंच्या आवाजांतून फूटून अगदीं स्पष्ट ऐकूं येणारे निरनिराळ्या यथोचित् रागरागिण्यांतील त्यांचे कर्णमुधर आलाप कित्येक तज्ज्ञ जन अजूनही विसरले नाहींत हें खास !

गायन—वादन—वक्तृत्वादि कलांप्रमाणें गणपतरावांचे आंगीं कवित्व-शक्तीही बरी होती. गणपतरावांची बरीच कविता, वर्धा येथील वकील रा. तानबा रामचंद्र जबाडे बी. ए. बी. एल्. हे लवकरच छापून प्रसिद्ध करणार आहेत असें समजतें. गणपतरावजींची कविता अगदीं साधी परंतु भक्तिरसपूर्ण अशी आहे. श्रीसमर्थ आबाजी

महाराज यांजवरील त्यांचीं दोनच पदें येथें उतरून घेतों.

१

सद्गुरु गंगाधरनामा । जपति ज्या सिद्ध करी कामा ॥ ध्रु० ॥
भवसागरिंची ही नौका । भक्तिरस पाजी जो नव का ।
उरूं ना देई भव लव का । गंगाधर कर्णि पडे रव का ।
तुम्हि त्या जावें मुक्तिग्रामा ॥ १ ॥
भुक्ति मुक्ति सौख्य जया व्हावें । तयानें सुवर्णपुरिं जावें ।
गुरुपद तें अवलोकावें । आनंदा सांठवीत जावें ।
विषय सोडुनि घ्या विश्रामा ॥ २ ॥
असें हें रम्य स्थळ पाहीं । भुक्ति मुक्ति ही जागृत राही ।
यापरि भूवरि क्वचित् कांहीं । असो परि अनुभव या देहीं ।
दास गणपति ज्या निष्कामा ॥ ३ ॥

२

गंगाधर चतुराक्षरि मंत्र वदनीं उच्चारा ।
चार अक्षरें चार धामसम करिती भवपारा ॥ ध्रु० ॥
मद अघनाशा शक्ति असुनि तरि करि जो भवभंग ।
गजेंद्रसम जे नक्र कालमुखि सोडवि अनुराग ।
गर्जति गुणिगण मन आकर्षुनि निजपद दे सांग ।
गर्व सोडुनि शरण जाति जे चुकति काय सोंग ॥ १ ॥
गाढ असा वैराग्यशिरोमणि कोण दुजा सांगा ।
गात्र देहाचें पवित्राभ्यासें शुकमुनि हर जोगा ।
गाया गुण उत्सुक गंधर्वहि लाजवी अनंगा ।
गांजुनि षड्रिपु पळवुनि ब्रह्मचि होउनि निज अंगा ॥ २ ॥

धैर्यबळें वैराग्य जिंकुनी भूतदया सिद्ध ।
धनवंत आणि राजे शरण परि न करी मन बद्ध ।
धरणें घेति इहपर सुख द्याया करि कार्या सिद्ध ।
धन्य सद्गुरू निर्विकार जो त्रिजगतीं प्रसिद्ध ॥ ३ ॥
रंग भक्तिचा दावि जना परि उपाधिहुनि दूर ।
रमुनि निजपदीं समज देउनी मुकुटमणी शूर ।
रहिवास या सुवर्णग्रामीं उत्सव अति थोर ।
रमला निशिदिनिं गणपति गुरुच्या ठेवित पदिं शिर ॥ ४ ॥

वरील कवितांत कोठें कोठें जरी थोडेसे भाषादोष दिसून येतात, तरी करणारानें त्या भक्तियुक्त अंतःकरणानें केलेल्या असल्याकारणानें सद्गुरुनाथमाउलीस त्या

वालक बोवडा बोलीं । वेडाविचुका पाउलीं ।
परी ते चोज करूनि माउली । रिझे जेंवी ॥

या ज्ञानेश्वरोक्तीप्रमाणेंच प्रिय असल्या पाहिजेत. अस्तु.

वरीलप्रमाणें निरनिराळया विषयांवर त्यांच्या आणखीही बऱ्याच कविता आहेत, परंतु तो सबंध कवितासंग्रह देण्याचें हें स्थळ नव्हे. त्या कवितांचें एक स्वतंत्र पुस्तक होईल इतकी त्यांची संख्या आहे.

असो. आतांपर्यंत वर्णिलेल्या कृत्यांखेरीज गणपतराव साधूंनीं आणखीही कांहीं प्रशंसनीय अशीं पुण्यकृत्यें केलीं. पुढें त्यांनीं बराच पैसा व सामग्री मिळवून देवळी येथें आपल्या देवस्थानांत एक जंगी यज्ञ केला आणि या यज्ञाचा प्रांतांत मोठा लौकिक झाला. कांहीं द्रव्याची त्यांनीं देवाकरितां स्थावर मालमत्ता घेऊन ठेविली; त्यावर एक कमिटी नेमून दिली; कुटुंबाचा तेरा रुपये महिना ठरवून दिला व आपले समक्ष देवस्थानचा कारभार कमिटीचे ताब्यांत दिला.

याप्रमाणें व्यवस्था केल्यानंतर शके १८३० चे आषाढ शु० ११ दिवशीं रात्रौ १२ वाजतां देवळी मुक्कामीं आपल्या मठांत त्यांनीं आपला देह ठेविला. देह ठेवावयाचे आधीं सुमारें चार दिवस सरकारांत खटपट करून त्यांनीं आपली समाधि मंदिरांत श्रीरामचंद्रासमोर व्हावी यासंबंधानें परवानगी मागून ठेविली होती. परवानगी मिळाल्यावर त्यांनीं संन्यास घेतला व देहावसानानंतर त्यांचा देह सभामंडपांत रामासमोर पुरविण्यांत आला. रीतीप्रमाणें पुढें एक वर्षानें त्यांच्या पाषाणपादुकांची स्थापना करण्यांत आली.

एकंदरींत गणपतराव साधु पुण्यपुरुष होते व परमेश्वराचे ठिकाणीं त्यांची आवडी होती यांत शंका नाहीं. परंतु दुर्दैवानें प्रभुप्राप्तीचा आपला निर्मळ मार्ग चुकला हें पूर्णपणें उमजल्यावर " रखताहूं मै गरज तेरी, नमीबा आड आता है " हे त्यांनीं ' संदीप्ते भवने प्रकूप खनने ' या उक्तीप्रमाणें आपल्या आयुष्याचे अखेर अखेर सुज्ञपणानें काढलेले पश्चात्तापोद्गारही यथार्थच आहेत यांतही कांहीं शंका नाहीं.

# शिवकल्याण.

सुमारें तीनशें वर्षांपूर्वीं, अध्यात्मग्रंथरचनेवरच विशेष भर ठेवणाऱ्या मराठी कवींची जी एक पिढी होऊन गेली, तींत शिवकल्याणस्वामींचा समावेश प्रमुखत्वानें होतो. गीतार्णवाचे कर्ते दासोपंत, योगवासिष्ठाचे कर्ते माधव, चित्सदानंदलहरीचे कर्ते रंगनाथ मोगरेकर हे कवि शिवकल्याणांचे समकालीन होत. ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावर ' नित्यानंदैकदीपिका ' या नांवाची शिवकल्याणकृत टीका शके १८१० त,

कै० डॉ. कुंटे यांनीं प्रसिद्ध केली आहे. त्याच प्रमाणें श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधावर त्यांची एक मोठी विस्तीर्ण टीका आहे. तिची ओंवी-संख्या सुमारें ९०,००० होईल म्हणतात ! या ग्रंथाचीं, श्रीकृष्णजन्म, रासपंच्याध्यायी आणि ब्रह्मस्तुति अशीं तीन प्रकरणें मात्र छापून प्रसिद्ध झालीं आहेत. ह्या ग्रंथाशिवाय शिवकल्याणस्वामींचा महाभारतावरही एक प्राकृत ग्रंथ असल्याची प्रसिद्धि आहे, पण तो अद्याप उपलब्ध झाला नाहीं. प्रकृत कवीचे ग्रंथ पाहिले म्हणजे त्याची विद्वत्ता व वेदांतविषयांतील अधिकार, यांची ओळख अगदीं सकृद्दर्शनींच पटते.

श्रीकृष्णाच्या रासक्रीडेसंबंधानें कोणाचीं कशींही मतें असोत, पण सदर प्रसंगावरील शिवकल्याणस्वामींचें भाष्य एकवार अवश्य वाचून मनन करण्यासारखें आहे, यांत संशय नाहीं. रासक्रीडेचें समर्थन करतांना मुंबईकडील कांहीं थिऑसफिस्ट हल्लीं शिवकल्याणस्वामींच्या सदर भाष्याकडे बोट दाखवूं लागले आहेत, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

पुष्कळ महाराष्ट्र कवींप्रमाणें शिवकल्याणस्वामींच्या चरित्रासंबंधानेंही म्हणण्यासारखी विश्वसनीय माहिती उपलब्ध नसावी, ही खेदाची गोष्ट होय. अमृतानुभवावरील टीकेच्या शेवटीं शिवकल्याणांनीं आपली गुरुपरंपरा दिली आहे, ती येणेंप्रमाणें:—

१ आदिनाथ
- २ मत्स्येंद्रनाथ
  - ३ गोरख
    - ४ गैनीनाथ
      - ५ निवृत्तिनाथ
        - ६ ज्ञानदेव
    - ४ मुक्ताबाई
      - ५ वटेश्वर ( चांगदेव ? )
        - ६ चक्रपाणी
- चौरंगी

|
७ विमळानंद
|
८ चांगा केशवदास
|
९ जनकराज
|
१० नृसिंह
|
११ हृदयानंद
|
१२ विश्वेश्वर
|
१३ केशवराज
|
१४ हरिदास
|
१५ परमानंद
|
१६ नित्यानंद
|
१७ शिवकल्याण

शक १२१७ तल्या मुक्ताबाईपासून शके १५५७ तल्या शिवकल्याणापर्यंत १४ पुरुष झाले. वरील परंपरेंतील 'श्रीहरिदासस्वामीसंबंधानें शिवकल्याण म्हणतातः—

'तो मातापुरप्रदेशीं। प्रकट कैवल्याची राशी।
तेथं बहुतां मुमुक्षांसी। पावनता जोडे॥'

शिवकल्याणाचे गुरु नित्यानंद हे 'अंबानगर' (जोगाईचें अंबें) येथील रहिवासी होत. आमच्या महाराष्ट्र कवींच्या चरित्रांत ही अंबा नगरी फार प्रसिद्ध आहे. मुकुंदराज, श्रीमत्कृष्णदयार्णव व दासोपंत, हे तीन प्रसिद्ध कवि व संत याच नगरांत होऊन गेले. असो.

मुक्ताबाईंचे कांहीं अभंग प्रसिद्ध आहेत; त्यानंतर शिवकल्याणापर्यंत जे पंधरा पुरुष होऊन गेले त्यांपैकीं थाडे तरी पुरुष कवि असण्याचा संभव आहे, पण त्यांची कविता कोठें उपलब्ध नाहीं असें वाटतें.

शिवकल्याणाच्या घराण्याचें आडनांव 'नित्यानंद' होतें; व त्याच वंशांतले जे नित्यानंदस्वामी ते शिवकल्याणांचे तीर्थरूप असून गुरूही होते हें त्यांच्या पुढील ओंवीवरून उघड होतें:–

'ते गोडी मिया लाधोन । विसरोन गेलें देहभान ।
पिता होत्साता जाण । गुरुवर्य कीं ॥'

'अमृतानुभवा' वरील 'नित्यानंदैकदीपिका' ही टीका लिहिण्याची प्रेरणा आपणास कोणत्या कारणानें झाली, हें सांगतांना शिवकल्याण म्हणतात:—

'गोदातीर उत्तरभाग । देवगिरी नगर सुभग ।
धारा गिरी पर्वतेंसी योग । जया नगरासी ॥
तेथें याज्ञवल्कि श्रीमंत । श्रीगोपाळ श्रीकृष्णसुत ।
तपोयोगाचें अधिभूत । ज्ञानाधिष्ठान ॥
तयाचें सांगेन गुरुकुळ । तरी यती अच्युतागम मूळ ।
म्हणोन योगज्ञानें विशाळ । वेदसारभुक्त ॥
तयाची गोडी फळा आली । म्हणोनी विवरणा हांव जाली ॥
नाना ते हांव सामावली । विवरणीं इये ॥
असो तेणें मनोरथ केला । तो स्वामी माझेनि स्वीकारिला ।
स्वीकारूनि उल्लंडिला । हृद्भुवनीं माझा ॥'

या ओंव्यांवरून श्रीकृष्ण याज्ञवल्कीचे पुत्र श्रीगोपाळ याज्ञवल्कि यांच्या आज्ञेवरून व प्रसादानें प्रकृत ग्रंथ कवीनें लिहिला हें स्पष्ट दिसतें. प्रसिद्ध कथाकल्पतरु ग्रंथाच्या पहिल्या सात स्तबकांचे कर्ते श्रीकृष्ण याज्ञवल्कि, यांचे पुत्र हे गोपाळ याज्ञवल्कि होत; व तेही आपल्या तीर्थरूपांप्रमाणेंच मोठे व्युत्पन्न, योगज्ञ व अधिकारी पुरुष होते, असें वरील ओंव्यांवरून दिसतें. गोपाळ यज्ञवल्कींच्या आज्ञेवरून अमृतानुभवावर ही ओंवीबद्ध टीका शिवकल्याणांनीं लिहिली. त्यापूर्वीं त्याच ग्रंथावर त्यांनीं एक गद्य टीकाही ( गाथा ग्रंथ ) लिहिली असावी, असें त्यांच्या पुढील ओंवी-वरून दिसतें:—

'म्हणोनि पूर्वी वाखाणिलें । दुसरेन पत्रारूढ केलें ।
गाथा शब्दीं आथिलें । संक्षेपेंसीं ॥'

शिवकल्याणस्वामीचा हा गाथाग्रंथ म्हणजे मराठी भाषेंतला पहिला गद्य ग्रंथ होय. अमृतानुभवावरील ओंवीबद्ध टीका स्वामींनीं शके १५५७ त पंढरपुरांत पूर्ण केली. शिवकल्याणाच्या ग्रंथांत ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथांतले जुने शब्द, तत्कालीन इतर कवींच्या ग्रंथांपेक्षां अधिक सांपडतात व याचें कारण त्यांचा त्या ग्रंथांचा विशेष व्यासंग हेंच असलें पाहिजे.

शिवकल्याणकृत 'अमृतानुभवविवरण-नित्यानंदैक्यदीपिका' हा ग्रंथ कै० डॉ० अण्णा मोरेश्वर कुंटे यांनीं शके १८१० त, निर्णयसागर छापखान्यांत छापविला होता. या ग्रंथाची ओंवीसंख्या सुमारें ६४१० होईल. शिवकल्याणकृत ' भागवतदशमस्कंधापैकीं १ श्रीकृष्णजन्म २ रासपंचाध्यायी व ३ ब्रह्मस्तुति हे तीनच भाग प्रसिद्ध झाले असून, त्यांची ओंवीसंख्या १०१०७ आहे. यावरून समग्र दशमस्कंधाची ग्रंथसंख्या केवढी मोठी असली पाहिजे, याची सहज कल्पना करितां येईल. शिवकल्याणकृत प्राकृत महाभारत अद्याप उपलब्ध झालेलें नाहीं. शिवकल्याणाचे ग्रंथ पाहिले म्हणजे ते मोठे अधिकारी सत्पुरुष असले पाहिजेत, अशी वाचकाची भावना अगदीं पहिल्या प्रथमच होते. ज्ञानदेवकृत अमृतानुभवावर निरंजन, भय्याकाका, हंसराजस्वामी, प्रल्हादबाबा इत्यादि जुन्या व नव्या टीकाकारांच्या अनेक टीका आहेत, परंतु त्या सर्वांत शिवकल्याणाची नित्यानंदैक्यदीपिकाच अधिक विशद आहे. वरील ग्रंथांशिवाय आणखी कांहीं कविता शिवकल्याणस्वामींनीं केली आहे कीं काय, हें समजण्यास मार्ग नाहीं. शिवकल्याणस्वामीचे जे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, त्यांतील कांहीं वेंचे येथें देऊन हा संक्षिप्त लेख पुरा करितों. अमृतानुभवावरील टीकेच्या आरंभीं शिवकल्याणांनीं आपले गुरु नित्यानंद यांची स्तुति पुढील संस्कृत पद्यांनीं केली आहेः—

सद्गुरुं परमानंदं वंदे आनंदविग्रहं ।
यस्य सन्निधिमात्रेण चिदानंदायते तनुः ॥
नित्यानंदाय गुरवे शिष्यसंसारहारिणे ।
भक्तकार्यैकदेहाय नमस्ते चित्सदात्मने ॥

भजन पुजन स्तुति करितां श्रवण स्थीर होईना मति ॥
जपतप साधन कांहिंच नेणे क्षणांत पडति विस्मृति ॥ १ ॥
ब्रह्म कर्म मज किमपी न घडे कैंचि आत्मस्थिति ॥
शमपद शांति नास्ति तितिक्षा मनीं नाहीं उपरति ॥ २ ॥
गुरुमार्ग हा कलित बुडाला गुरुला न मानिती ॥
दिवस दिवस आस्था उडाली विषयीं जडली प्रिती ॥ ३॥
गुरुदर्शन गुरुसेवा त्रास बहु भजनीं झोप घेति ॥
कसा लागेल परिणाम शिव शिव निवृत्ति नाहीं स्थिति ॥ ४ ॥
पक्षहीन मी लोला झालों कैसी होइल मम गति ॥
शिष्य रघुपति वायां गेला यांत कोणाची फजिती ॥ ५ ॥

धांवा.

सद्गुरु रायारे दातारा ॥ दे दर्शन करि त्वरा ॥ धृ० ॥
भवसिंधूचा तूं तारुं ॥ उतरी पैल पारु ॥
देह जालारे जरत्कारु ॥ आस्थि नाडि जसे बरु ॥
पोटीं वायूनें केला थारा ॥ १ ॥
केश मस्तकींचे पिकले ॥ अन्न पाणी राहिलें ॥
निस्तुक दंतानीं सोडियले ॥ गळती नाक डोळे ॥
जीव होतो रे घाबरा ॥ २ ॥
आतां आलों मी हातघाई ॥ चैन पडेना कांहीं ॥
हाता पायासीं आली वाई ॥ बसल्या उठवत नाहीं ॥
काळचक्राचा आला फेरा ॥ ३ ॥
म्हणे रघुपति गुरु नारायणा ॥ चित्त स्थिर होइना ॥
शरीरयातना सोसवेना ॥ बोल स्पष्ट उमटेना ॥
अंतीं भरंवसा तुझा खरा ॥ ४ ॥

पद.

काय वाणू स्थिती गुरुरायाची ॥ धृ० ॥
अंतरिं ध्यान वदनीं नाम ॥ आवड मोठी भजनाची ॥ १ ॥
सुंदर कांती देह जयाचा ॥ हातवटि मृदु भजनाची ॥ २ ॥
आसन मुद्रा खुण दाउनि ॥ उठविलि भ्रांति मनाची ॥ ३ ॥
सोहं स्मरणी लीन मी होतें ॥ चमकलि दीप्ति सूर्याची ॥ ४ ॥
शरण मी आलें तुज रघुपति ॥ दे मति गुण गायाची ॥ ५ ॥

भजन.

विठ्ठल हरी विठ्ठल हरी ॥ गीता भागवत ज्ञानेश्वरी ॥ धृ० ॥
दर्शनमात्रें मोक्षच रोकडा ॥ एक पंढरपुरीं ॥ १ ॥
ज्ञानहीन जड अंगिकारितो ॥ ऐसी नामाची थोरी ॥ २ ॥
भजनिं संताच्या उभा पाठिसी ॥ नाचत टाळ धरी ॥ ३ ॥
ग्रंथत्रयिं बहु प्रीति अभंगीं ॥ आस्था हरिसी भारी ॥ ४ ॥
म्हणे रघुपति त्याविण मजला ॥ न गमे क्षणभरी ॥ ५ ॥

पद.

वैकुंठीचा सुभा तो हा उभा ठेउनि करकटी हो ॥ गोकुळ मथुरा यमुना ॥ द्वारावति गोमति त्यजुनियां आला भिवरेतटीहो ॥ धृ ॥ पंढरपुरनीवासी समपद ठाण जयाचें विटे हो ॥ जाला दिगंबर शीघ्र धांवला श्रमला रुक्मिणिसाठीं हो ॥ मातृभक्त पुंडलीक याच्या भेटिची आवड मोठी हो ॥ रात्रंदिवस भजनीं प्रीति फिरतो वाळवंटीं हो ॥ १ ॥ अंबऋषीकारणें दशविध स्वरूपाची राहटी हो ॥ भक्तछळक ह्मण दुर्वासाच्या लावि सुदर्शन पाठी हो ॥ ज्ञानेश्वरमहाराज याची भिंत अचेतन लोटी हो ॥ धना जाठाचे लोड बुर्णुसे घोळ

यस्यादर्शनमात्रतोखिलमिदं विश्वं समाभासते ।
यज्ज्ञानेन विलीयते मृदि यथा कुंभादयस्तन्मयाः ।
एवं नित्यमनित्य वाग्विलसितं दूरंतरंगादिवत् ।
नित्यानंदमहं भजामि सततं स्वानंदपूर्णं परं ॥

शिवकल्याण हे पंढरपूरच्या श्रीपांडुरंगाचे उपासक होते. वरील ग्रंथारंभीं श्रीविठ्ठलाचें वर्णन त्यांनीं येणेंप्रमाणें केलें आहेः—

" नीलोत्पलदलश्यामं पद्मपत्रनिभेक्षणं ।
ध्यायेच्छ्रीविठ्ठलं नित्यं जघनस्थ करद्वयम् ॥

" गुरुकृपेच्या योगानें माझ्या जीविताचें सार्थक झालें, आतां माझें कोणतें कर्तव्य उरलें आहे ? " असा प्रश्न स्वामींनीं आपल्या गुरुजींस विचारला, तेव्हां त्यांनीं जें उत्तर दिलें तें स्वामी वर्णितातः—

ओव्या

राजा राज्यपद पावला । छत्रचामरेंसी विलासला ।
परी राजाज्ञेन्ही नाहीं जाला । विस्तार जगीं ॥
आज्ञा जैं थोटावली । तैं राज्यपदवी हिणावली ।
म्हणोनि जगामाजी मोकळी । वर्तली पाहिजे ॥

तेवी चोजवलिया आत्मखूण । परि तेंचि सरळ दृष्टीवीण ।
सुखाचा पुंज जाण । नुतरे देखा ॥
तें आत्मदृष्टीसमोर । कांहीं नसावा हीर ।
विरोधाची कोर । उल्लंघून जावें ॥

किंवा आत्मकळेचे ठायीं । विरोधासीच जन्म नाहीं ।
म्हणोनि तिये दृष्टीसी कांहीं । अंतरावोचि नसे ।
तो स्वात्मानुभव रावो उदैला । तैं अंतराय
तस्कराचा ठावो पुरिला ।
ऐसें नव्हतां जाला । प्रत्ययोचि हीनु ॥

अहो राज्यपदवी जो पावे । तेणें विरोधी चोजवावे ।
नाहींतरी असावें । स्वाभाविक सुखें ॥
तिये चोजवे पेलीकडे । जरी उगाचि तो पहुडे ॥

तरी काळांतरीं घडे । अंतराय त्यासी ।
हें बहु काय बोलावें । जाणीवेवरी न जावें ।
जालेपणाचेनि नांवें । कैवल्यही नको ॥
मज एकासी प्रत्ययो जाला । येरु अज्ञानें असे नाशिला ।
हा जयाचा न उतरला । अहंकारसापु ॥
बोले प्रश्नेचीं उत्तरें । कवळिला आहे अहंकार अजगरें ।
जयाचें लाधलेपणाचें वारें । गेलेंचि नाहीं ॥

*　　*　　*　　*

नातरी आम्ही जालों ब्रह्मज्ञानी । एकात्मता अवघी जनीं ।
म्हणोनि यच्चावच्च करणी । संपादूं लागे ॥
अथवा आम्ही ब्रह्मज्ञानी । येर विश्व अवघें अज्ञानी ।
म्हणोनि जनाच्या झणी । स्पर्श होईल ॥
आम्ही ब्रह्मविद् ब्राह्मण । येर चांडाळ कीं अवघे जन ।
ऐसें जयाचें ज्ञान । हुंबत असे ॥
एवं दोहींही परी जाण । लाधली नाहीं खूण ।
एवं सरळ दृष्टिवीण । न जोडे शांति ॥
नातरी लाधलिया अवसान । विसर्जावें कर्माचरण ।
अहो या वाक्याचा अर्थ जाण । न कळेचि तया ।
कां जें कर्मासि सांडों जातां । तत्काळ जाला कर्ता ।
एवं आत्मखूणेसी नेणतां । मनोरथ करिती ॥ ”

श्रीज्ञानदेवासंबंधाचे शिवकल्याणस्वामीचे पुढील उद्गार किती यथार्थ आहेत !:—

अगा कलिकालें आकलितां जन । हातीं घेऊनि ज्ञानखड्ग जाण ।
अवतरला आत्मा पर्ण । ज्ञानेश्वर येथें ॥

अगा ज्ञानाज्ञानविहीन । निखळ ज्ञान मात्र संपूर्ण ।
म्हणोनि ज्ञानेश्वर ऐसी खूण । रूपा आली ॥
तेणें श्रीगीतालयाचें कपाट । उघडनि केली मोकळी वाट ।
गीतेश्वर प्रगट । दाखविला लोकां ॥

अमृतानुभव हा ग्रंथ फार गहन आहे; व त्यामुळें, शिवकल्याण स्वामी-सारख्या अधिकारी टीकाकारासही, तो ग्रंथ विशद करून सांगण्याकरितां सहा हजार ओव्या लिहाव्या लागल्या ! शिवकल्याण स्वामीच्या ओवीची रचना दासोपंती वळणाची दिसते. श्रीकृष्णजन्म, रासक्रीडा व ब्रह्मस्तुति हीं स्वामीचीं तिन्ही प्रसिद्ध प्रकरणें अत्यंत प्रासादिक अतएव अवश्य वाचनीय आहेत, परंतु ग्रंथविस्तारभयास्तव त्यांतील उतारे येथें दिले नाहींत, याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

REFBK-0001267